# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१४

## अंतरंग


**संपादकीय** (४)

**कथा**

सुहासिनी कीर्तिकर (५), सौ. उज्ज्वल ब्रह्मांडकर (३६), सौ. विजयश्री आनंदकुमार नवलकर (४२), सुबोध आनंद धैर्यवान (४४), सौ. जयमती जयपाल तळपदे (४६), सुबोध ग. प्रधान (१०८)

**व्यक्तिचित्रे**

नंदकुमार कृ. विजयकर (८), सौ. अलका मिनल तळपदे (२३)

**लेख**

सुजन राणे (११), डॉ. सुमन नवलकर (२६), सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर (२८), मृदुला प्रभुराम जोशी (३०), ऐश्वर्या वेलकर (८८), मोनिका रविकांत अय्यर (८९), ख्याती वेलकर (९१), तन्वी धुरंधर (९३), अनुप्रिता नायक भौमिक (९४), रिषी वेलकर (९६), सौ. स्वागता विजयकर (१००), बागेश्री परीख (१०४), अन्जोर कोठारे (१०२) ,

**बालविभाग**

इशान आनंद (७६), अतिया क्रिश्नन (७७), सौमिल कोठारे (७८, ८४), अपर्णा संगीत विजयकर (७९), आदिती सचिन विजयकर (८२-८३), अनिका जयदीप विजयकर (८३)

**रंगीत फूडीज कट्टा :**

*संकल्पना*- राजेश नवलकर , *सहभाग*- अस्मिता राणे, संचिता कोठारे, मोनिका राणे अय्यर, सौमित्र वेलकर, नीलम राणे पृष्ठ ५९ ते ६६

**चित्र हेच देखणे**

बागेश्री परीख (५१), आसावरी धुरंधर (५२),बन्सी धुरंधर (५३), शौनक कौशिक जयकर (५३), पुनम देसाई-कुर्डेकर (५४), शिल्पा वेलकर (५५), मिथिल वेलकर (५५), सुजन राणे (५६), जान्हवी कीर्तिकर (५७), मिलन राणे केसवाणी (५८)

**इतिहासाची उलटता पाने:**

विश्वास अजिंक्य (१७), दीपक घारे (६७)

**प्रवासवर्णन**

अपर्णा उदय कीर्तिकर (१४)
शुभदा आगासकर (९७)

**कविता :**

नलिनी तळपदे (१३), सौ. इना तळपदे (१९, २७, ४३, ७३), अरविंद प्र. धुरंधर (२५), सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर (३५, ४८, ६९), सौ. स्वागता विजयकर (७१), सौ. कल्पना सुभाष कोठारे (५०), शैलेश विजयकर (१०१) रंजन खंडेराव विजयकर (१०६)

**वात्रटिका :**

डॉ. सुमन नवलकर (१५, २४, २५, ३३, ३४)

**हास्यचित्रे :**

श्री. प्रदीप कोठारे (७,१२,१६,२९,६६,९२,१०३,११०)

**संकीर्ण :**

संस्थादखल, प्रभुतरुणास देणग्या, प्रभुतरुणाची डायरी (११०)

**मुखपृष्ठ :**

श्री. सुजन राणे

**मलपृष्ठ :**

संपादकांची छायाचित्रांसह माहिती

**भाऊबीज :**

पृष्ठ २ व १११

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

**www.prabhutarun.com**

कार्यकारी संपादक मंडळ :
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

**वर्ष ४८ वे)** **ऑक्टोबर २०१४** **(अंक ४**

# संपादकीय

**-सुहासिनी कीर्तिकर**

'नेमेचि येतो मग पावसाळा'प्रमाणे नेहेमीच दिवाळी दसरा येतो. 'आनंदा नाही तोटा' असे वाटायला लावणारा. का? तर या आनंदात भर घालणारा अक्षर आणि अक्षय असा दिवाळी अंक आपल्या सोबतीला असतो. 'प्रभुतरुण' दिवाळी अंक या सोबतीत कधीही मागे राहिलेला नाही. रसिकहो, तुम्हीही अखंड सोबत केली आहेत.

या वर्षीच्या प्रभुतरुण दिवाळी अंकाचे अक्षय, अक्षररूप आगळेवेगळे असेच. अनेक कथा, अनेक कविता, प्रवास वर्णने, अनेक लेख, बाल विभाग, इतिहासाची पाने उलटता, वात्रटिका, व्यंग्यचित्रे या अंकात आहेतच. पण खास विशेष म्हणजे 'फूडीज' हा रंगीत विभाग आणि ज्ञातीय चित्रकारांनी रंगविलेल्या सुरेख चित्रांचा या अंकात समावेश आहे. प्रभु तरुणाच्या मुखपृष्ठापासूनच याची झलक दिसते. श्री. सुजन राणे यांनी न्यूजर्सीहून आपली चित्रे आणि लेख पाठवले. सर्वदूर पसरलेला 'प्रभुतरुणा'चा वाचक, लेखक असल्यावर, आणखी काय पाहिजे हो? ही तर काळाची गरज आहे.

ही गरज ओळखूनच प्रभुतरुणाने आपल्या व्यवस्थापनात तरुणांचा अधिक समावेश करत नवीन आखणी केली आहे. जान्हवी कीर्तिकर, मिथिल नवलकर, मिहीका नवलकर, शिल्पा जयकर,परज धुरंधर, मोहनीश शेटये, ज्ञानदा प्रधान-पवार आणि कश्मिरा व्यवहारकर हे व्यवस्थापन समितीत आणि त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती प्रधान-शेटये ही संपादन समितीत नवीन भर आहे. व्यवस्थापकीय कार्याचा त्यांचा सहभाग हा उत्स्फूर्त आहे हे विशेष. आपल्या वर्धापनदिनी 'प्रभुतरुण' खऱ्या अर्थाने वाढला! या वाढीचे रसिकहो, तुम्ही केवळ साक्षीदार नाहीत. तुम्ही या वाढीस हातभार लावला आहे. नाहीतर दिवाळी अंकातही इतकी लेखकांची 'मांदियाळी' जमतीच ना! सर्व लेखकांचे, वाचकांचे, आश्रयदात्यांचे यासाठी आम्ही मनापासून ऋणी आहोत.

दिनी दिनी, प्रतिदिनी
'प्रभुतरुण' जोपासा मनोमनी
नवीन वर्षाच्या आणि दिवाळीच्या सणाच्या तुम्हा सर्वांना मंगलरूप शुभेच्छा!

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# कुरघोडी

## ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

चाळीच्या दीडखणी घरात सुषमा रहात होती. तिचा नवरा हरहुन्नरी होता. एलआयसीत नोकरीला. त्यामुळे पगाराची विवंचना नव्हती. शिवाय छोट्या मोठ्या दागिन्यांचा व्यापारही करायचा. हा व्यापार घरातच होता का? छे! रमेशराव - म्हणजे श्री. सुषम! त्यांनी हाताशी एक कारागीर बाळगला. सोनं घ्यायचं. घडवायचं, विकायचं. मग आसपासची इतरही काही माणसं असं जुनं मोडून नवं घडवून घ्यायला यायला लागली. रमेश प्रसन्न वृत्तीचा. सुषमा आल्यागेल्याला चहा द्यायचीच. मग या उद्योगी माणसाने विचार केला; या नोकरी धंद्याबरोबरच इतर उद्योगही करावेत. दैवज्ञ ब्राह्मण समाज-शाखा त्याने आपल्या घरीच उभी केली. शाखेची स्वतंत्र लायबरी उभी झाली. आपल्या घरापुढच्या चाळीच्या व्हरांड्यात तीन कपाटे त्याने लावली. संडासची व्यवस्था सामायिक असल्याने याच व्हरांड्यातून इतर चाळकरी सतत जायचे यायचे. प्रत्येकाच्या दारापुढे, व्हरांड्याच्या खाली एकेक मोठाले पाण्याचे पिंप असायचेच. पण रमेशरावांचा हा उद्योग चाळकऱ्यांना कसा चालणार? त्यांनी आधी गोडीगुलाबीने सांगून पाहिलं. ''अहो रमेशराव, तुम्ही नवं घरच उभं केलंय व्हरांड्यात. जाता येताना त्रास होतो ना!''

''शंकरराव, त्रास कसला होतोय? खालून जात जा ना!''

''वा! वा! म्हंजे व्हरांड्याची आणखी एक खोलीच करणार म्हणता का?'' - खवचटपणे शंकरराव म्हणाले. सुषमाताईंना हा मुद्दा पटत होता. त्या म्हणाल्या, ''अहो, ते म्हणताहेत तर आपण ही कपाटे आत आणू या का?''

''काय खुळीबिळी आहेस का? व्हरांडा काय त्यांच्या बापाचा आहे? आपण उद्या इथं झोपूसुद्धा!'' पण सुषमाताई रमेशराव ऑफिसला गेल्यावर घरात एकट्याच असायच्या. त्यांना वाटे की शेजाऱ्यांशी संबंध चांगलेच असले पाहिजेत. पण त्यांचे कोण ऐकणार?

मग एके रात्री त्या एका कपाटाची काच फुटली! म्हंजे कुणीतरी मुद्दाम फोडली. आवाज झाला. रमेशराव बाहेर आले तर; कुणी नाही! आवाज ऐकून शेजाऱ्यांनी बाहेर यायला हवं ना? दुसऱ्या दिवशी शंकरराव टमरेल घेऊन समोरून जात असताना सुषमाच्या डोळ्यासमोर कानावर जानवं ठेवून मुद्दाम आले. ''वहिनी! जऽऽरा पुस्तक घेऊन जातो हां!'' म्हणत त्यांनी फुटक्या काचेतून हात आत घातला. एक पुस्तक काढलं. संडासकर्म निवांतपणे उरकण्यासाठी तसेच ते पुस्तक घेऊन पुढे गेले. ही काय बोलणार? शंकररावांपाठोपाठ पुस्तक वाचत बराच वेळ आत काढण्यातलं सुख मग प्रत्येकजण घेऊ लागला. फुटक्या काचेतून पुस्तक काढायचे. निघायचे पुढे. बरं! ते परत करण्याची बात नाही. समाजशाखेची पुस्तकं म्हंजे रमेशरावांची स्वत:ची मालमत्ता नव्हती. त्यांना त्याचा जाब द्यावा लागला. पण तरीही ते ठाम राहिले. एका कपाटावर त्यांनी मोठ्ठी पाटी लावली- 'पुस्तकांची चोरी करू नका. ज्ञानाची करा.'' तसे शंकरराव बेरकेच. आणखी एक चाळकरी विश्वास कानिटकरांना रमेशरावांसमोर ते म्हणाले, ''काय हो! पाटी वाचलीत का? ज्ञानाची करा म्हंजे काय करा? हजामत करा?'' दोन्ही हातवारे हजामत केल्यासारखे. मग काय? कानिटकरांच्या चिंत्यानं एक दिवस सरळ त्या पाटीवर एक शब्द अधिकचा टाकला. 'ज्ञानाची हजामत करा'. जाणारी पुस्तके, हा चेष्टेचा मामला अन् सतत वादावादी यामुळे मग ही लायब्ररी

रमेशरावांनी बंदच केली. शाखासभेत त्यांच्यावर अनेक आरोप झाले. पण करणार काय? कपाटं विकली. पुस्तकं झोपडपट्टीतील एका समाजसेवी संस्थेला दान केली.

पण स्वस्थ बसवेनाच. शिवाय व्हरांडा सामायिक असला तरी पलिकडच्या नाराणभाईंनी चप्पलांचे खोके स्वत:च्या घरासमोर ठेवले होतेच. नवीन आलेल्या रानडेमास्तरांचे तर सकाळचे चहापाणीही व्हरांड्यातच व्हायचे. शेजारची मीरा पोनीटेल उडवून याच लॉबीतून लचकत फेऱ्या मारायची. प्रत्येकाच्या खिडकीतून त्यांची आयुष्ये हुंगत ती इथून तिथे, इथून तिथे चालत असायची. समोरचा दीपक मग व्हरांड्याच्या पायरीवर येऊन टपकायचाच. रमेशरावांना स्वस्थ बसवेना. त्यांना शंकररावांचं उट्टं काढायचं होतं. त्यांनी त्यांचा समेळ नावाचा वकील मित्र गाठला. ह्या व्हरांड्यातल्या 'प्रायव्हेट' प्रॉपर्टीबद्दल कायदेशीर काही करता येईल का? - प्रश्न होता. पुस्तकांचं कपाट चालत नाही; मग जोड्यांचे खोके कसे चालते? बायजा आजींचं कोळशाचं पिंप कसं बसतं यात? रानडेसरांचे व्हरांड्यातलं चहापान, पेपरवाचन कसं चालतं? शिवटेकाकूंचे कपडे व्हरांड्यातच दोरीवर लोंबतात. तो दीपक तर मीरेभोवती दिवेच ओवाळतोय. पण समेळ म्हणाले, 'ही कॉमन प्रॉपर्टी आहे. पण असं काही अजून तरी घडलेलं नाही. एक करता येईल. शंकररावांवर गुंड घालायचे. चार शब्द त्यांचे ऐकले की पुस्तकं येतील परत.'' पण असं गुंडागर्दीचं राजकारण रमेशरावांना नको होतं. मधल्या काळात सुषमा-रमेशचा संसारही फळला फुलला होता. त्यांचा एकुलता एक रोहन चांगला शिकला सवरला. इंजिनियरिंगला होस्टेलला होता म्हणा. रमेशराव म्हणायचेच. 'बरंय. तो बाहेर आहे तो. इथं काय? शेजारच अशा शंकररावांचा. पिंडीवरचा विंचू नकोच जवळ त्याच्या.'' पण मग रोहनचं शिक्षण पूर्ण झाले. तो परदेशात गेला असताना एक दिवस रमेश झोपेतच खल्लास झाले. चार दिवस लोटल्यावर शंकरराव खदखदलेच.'' घ्या म्हणावं, व्हरांडा आता. केस करत होता म्हणे. आमच्यापासून लपून नव्हतं राहिलं ते. आता समाजसेवा करा म्हणावं स्वर्गात! देव वाचतात का हो पुस्तकं? काय की!!''

शंकररावांचे हे खवट बोल त्या दु:खातही सुषमा वहिनींना काळजात घुसल्यासारखे वाटले. ही काय माणसं म्हणायची! त्यांना वाटून गेलं. दु:खाचा डोंगर कोसळला असतानाही मग त्यांच्या मनात तेच अन् तेवढंच घुमत राहिलं. अन् एक दिवस वाट सापडली! जुन्या भिंतीला आगंतुक रोपट्यानं फट पाडावी तशी! शंकररावांची विनिताही आता पदवीधर होऊन नोकरीला लागली होती. दु:ख गोंजारत गोंजारत सुषमावहिनी तिला संध्याकाळी सोबतीला बोलवू लागल्या. तिला कॉफी, एखादं दारचं कुंडीतलं फूल देऊ लागल्या. ''अगं, नानांचं (शंकररावांचं) नको मनात ठेवू. 'हे' गेले. संपलं वैर. आता मी अन् रोहनच घरात. पुढच्या महिन्यात तोही येईल परदेशातून. पण तू असलीस की कसं घरपण असतं गं. मी एकटी अशी.'' त्या विनितालाही आपल्या घरापेक्षा इथं शेजारी लाड करून घेणं आवडू लागलं होतं. ऑफिस झालं की घरी काय? शंकररावांचे हिशोबी वागणं. तिची आई तर दबूनच. ही एकुलती पोर. सुषमा वहिनींच्या घरी टी.व्ही. बघत, कॉफी घेत छाऽऽन टाईमपास व्हायचा तिचा.

सुषमावहिनीही मग कधी तिला पोहे करून देऊ लागल्या. एखाद्या सुट्टीच्या वारी दोघी सिनेमालाही जाऊ लागल्या. नानांना - शंकररावांना ही घसट अजिबात आवडत नव्हती. पण कमावत्या लेकीला ते अधिक कोंडू शकत नव्हते. त्यांचा पेन्शनीत चाललेला संसार विनितामुळे धकत होता. मग आला. ज्याची सुषमावहिनी वाट पहात होत्या; तो दिवस आऽऽला. त्यांचा रोहन आईपाशीच भारतात रहायचं ठरवून आला. रोहन आल्यावर विनिता येईनाशी झाली होती. पण सुषमावहिनींचा गुंता सुटला होता. रोहन असताना त्या तिला बोलवू लागल्या. ''अगं, तो आला तरी तू यायचं बंद करू नकोस. उलट तुम्ही दोघं असलात की माझं घर गजबजतं.'' त्या म्हणू लागल्या. हलके हलके मीरा दीपक सारखीच रोहन विनिताची जोडी जमली. सुषमा वहिनींना अगदी हवी होती तश्शी! ती दोघं असली की त्या मुद्दामच स्वामींच्या देवळात जाऊ लागल्या. त्यांच्या आवडीचं ताकातलं पिठलं तिलाही वाटीभर देऊ लागल्या. खमंगपणा वाढत चालला.

मग एकदाचं पिकलं पान गळून पडावं तसं झालं. शंकरराव अपघातात गेले. त्यांची बायको धसकली. खचत खचत अखेर तीही गेली. या दोन्ही वेळी सुषमा

आणि रोहन विनिताच्या पाठी भक्कम उभे राहिले. शंकररावांचा बँक व्यवहार, त्यांचे शेअर्स, त्यांचं ते दीडखणाचं घर... सगळं सगळं विनिताच्या नावावर करण्यात रोहननं पुढाकार घेतला. विनिता आता एकटी. तिला आधार द्यायचा म्हणून एक दिवस सुषमा वहिनींनीच प्रस्ताव मांडला.

''विनिता, पोरकं मानू नकोस गं. आम्ही आहोत ना? तू रोहनबरोबर लग्न केलंस तर मला मुलगी, मुलगा एकदमच मिळेल.'' रोहन होताही चांगला. विनिता कबूल झाली. लग्न लागलं अन् शेजारची हाडवैरी शंकररावांची कन्या सुषमा वहिनींच्या घरात सून म्हणून आली.

तिला आपलंसं केल्यावर शेजारच्या तिच्या घरावर एक दिवस रोहन/विनिताच्या नावाची पाटी लागली. आतली खोली त्यांची बेडरूम म्हणून सजली. पुढच्या खोलीत मात्र सुषमावहिनींनी चार कपाटं मुद्दाम करून घेतली. त्यात पुस्तकं भरली. रोहनला आक्षेपार्ह वाटलं नाही. अशी सुषमावहिनींनी चाळ समितीची लायब्ररी सुरू केली. शंकररावांच्याच घरात! त्यांच्या मुलीला फितूर करून!

तृप्त मनानं त्या रमेशरावांच्या फोटोसमोर उदबत्ती लावत म्हणाल्या, ''तुमच्या मनासारखं झालं ना? अहो, कशाला वकील बिकील हवा होता? त्या भांडणतेढीनं तुमचं आयुष्य संपलं. पण मी आहे. लक्षात ठेवा. मी आहे. आता शंकररावांनाही शोध घेऊच दे - देव पुस्तकं वाचतात की नाही त्याचा.'' फोटोतले रमेशराव त्यांना त्यावेळी हसल्यासारखे वाटले!



व्यक्तिचित्र

# बबनराव, बाबुराव आणि मी

★ नंदकुमार कृ. विजयकर ★

टेलिफोनची घंटा खणखणली. आम्ही नुकतीच जेवणं आटोपली होती. मी वॉशबेसिनवर हात धुवत होतो. रात्रीचे दहा वाजले होते. अशावेळी 'कोण तडमडला फोन करायला?' असं पुटपुटत मी नॅपकीनला हात पुसत दिवाणखान्यात धावलो. थोड्या त्रासिकपणे रिसिव्हर उचलला.

''हॅलो.''

''हॅलो, कोण विजयकर का?''

''हो बोलतोय.''

''अरे ओळख पाहू कोण बोलतोय तो?''

झालं! हा कोड्यात बोलायला लागला.

''अं..... तसा आवाज ओळखीचा वाटतो...' मी आपला उगाचच काहीतरी बोललो.

''अरे मी गोखले बोलतोय.''

आता गोखले नावाच्या कोणत्याही व्यक्तीस मी ओळखत नव्हतो. आणि हा तर बेटा साताजन्माची ओळख दाखवून अरे, तुरे करत होता.

''नाही ओळखलंस? अरे, पुण्याहून बोलतोय.'' त्याने एक 'क्ल्यू' दिला.

''नाही? अरे रविवार पेठ विसरलास काय?'' पुन्हा एक नवा क्ल्यू. रविवार पेठ? हो, मी आमच्या पुण्याच्या रविवार पेठ शाखेत कामाला होतो. पुण्यात माझं ४/५ वर्षे वास्तव्य होतं. पण पुणं सोडून दहा, बारा वर्षाचा काळ लोटला होता आणि या गोखलेला आता माझी आठवण झाली. रविवारपेठ... गोखले... म्हणजे हा बबनराव तर नाही?

''बबनराव?''

''बरोबर! अरे किती वेळ लावलात राव?''

''बरं मग, आज कशी काय आठवण काढली?''

''अरे काल लायब्ररीतून तुझा कथासंग्रह आणला. त्यात 'गुडमॉर्निंग बाबुराव' वाचलं आणि तडक स्कुटर काढून बाबुरावकडे गेलो. मी ओळखलं; हे आपले बाबुरावच. त्याला वाचून दाखवलं, म्हटलं बघ विजयकरांनी तुझ्यावर काय मस्त लेख लिहिला आहे.''

रविवारपेठला बबनराव आणि बाबुराव अशी जोडगोळी होती. दोघांचं खूप सख्य. दोघे जोडीने येणार. जोडीने जाणार. पुण्यात आमच्या ७/८ शाखा होत्या. आमच्या सर्व परिवारात ही जोडगोळी प्रसिद्ध होती. बाबुरावांच्याबद्दल तर काही विचारू नका. फावल्या वेळात विनोदी चुटके सांगणे, नकला करणे हा त्यांचा हातखंडा. लंचच्या वेळेत आमची हास्यमैफल बाबुरावांच्या भोवती जमत असे. आमचा एका सहकारी शानबाग याची ते उत्तम नक्कल करीत. ह्या शानबागला कोणी काहीही विचारलं तर तो सरळ उत्तर देत नसे. 'गुडमॉर्निंग शानबाग', लगेच शानबाग म्हणणार 'अरे ते सकाळ नेहमीच चांगली असते की रे.'' ''काय शानबाग काल आलात नाही?'' ''तुमचं काय गेलं, माझं एक सी.एल. गेलं.'' तब्येत ठीक नव्हती वाटतं?'' ''तुम्ही डॉक्टर आहात वाटतं?'' कोणी काही फर्माईश करण्याची खोटी. बाबुराव रंगात येऊन सगळ्यांचं मनसोक्त मनोरंजन करणार. याच बाबुरावांना मी माझ्या 'गुडमॉर्निंग बाबुराव' या कथेत आणलं. बाबुरावांचं स्वभावचित्र मी माझ्या कथेत रंगवलं होतं. इतक्या वर्षांने माझी कथा त्या कथानायकाच्या भेटीला जावी याचं मला अप्रूप वाटलं.

'अरे विजयकर, ऐकतोस ना?' मी भानावर आलो.

'हो बोल.'

'हे बघ बाबुरावला तुला भेटायचं आहे. कधी येतोस भेटायला?'

'पुण्याला... साधारण पुढच्या महिन्यात येईन.'

'ठीक आहे, मग माझा फोननंबर घेऊन ठेव. पुण्याला आल्यावर कळव. मग मी तुला बाबुरावकडे घेऊन

जाईन.'

महिन्याभरानं मी पुण्याला गेलो. पोहोचताचक्षणी मी गोखलेला फोन केला.

''साडेनऊ वाजता ये. पत्ता लिहून घे. 'चैतन्य' एरंडवणा, कर्वे रोड, लागुबंधुंच्या गल्लीत, पहिला मजला.'

दुसऱ्या दिवशी मी सांगितलेल्या पत्त्यावर पोहोचलो. 'चैतन्य' पहिल्या मजल्यावरची पाटी वाचली तसा मी जिन्याने वर गेलो. पाहतो तर तिकडे कसल्यातरी कार्यालयाचा भला मोठा हॉल होता. हे गोखलेंचं घर आहे की मी पत्ता चुकलो? गोंधळल्यासारखं झालं. हॉलमध्ये डोकावून पाहिलं तर पार एका टोकाला कोणाची तरी भव्य तसबीर होती. समोर एक गृहस्थ पितांबर नेसून वर उघडे असे पाठमोरे बसले होते. मी जरा दबकतच आत गेलो. 'अरे ती खुर्ची ओढून बस.' त्या गृहस्थाने थोडंसं वळून सांगितलं. हा गोखले का? आता इतक्या वर्षांनी त्याला प्रथमच पाहात होतो. चेहरा लक्षात होता. पण अशा ठिकाणी, अशा वेशात, मनात गोंधळ उडाला होता. थोडं पुढं जाऊन खात्री केली. ''उशीर झाला का मला?'' ''नाही रे. जरा थांब. पूजा आटोपतो. मग निघू.'' मी सभोवताली पाहिलं. त्या प्रचंड हॉलमध्ये प्रवेशद्वाराजवळ एकुलती एक खुर्ची होती. मी तिकडे जाऊन बसलो. मला कळेना हा बबनराव इकडे काय करतो? हा राहातो कुठे? का हा पुजारी म्हणून इकडेच राहतो? बबनरावची पूजा चांगली अर्धा तास चालली. शेवटी तो आरतीला उठला तसा मीही उठलो. हात जोडले... त्या ठिकाणी आम्ही दोघेच होतो. कसली आरती, कोणाची आरती, मला काहीच कळेना.. सर्व आटोपल्यावर मी तसबिरीकडे बोट दाखवून विचारलं, ''हे कोण?'' ''अरे हे श्री गोंदवलेकर महाराज'' मी आपले परत हात जोडले. बाबा, महाराज यांच्या वाटेला मी सहसा जात नाही. मी नास्तिक नाही, पण जास्त देव देव करणं माझ्या स्वभावात नाही. मी काही विचारायच्या आत बबनराव म्हणाला ''अरे इथले ट्रस्टी माझ्या ओळखीचे आहेत. त्यांना महाराजांची पूजा-अर्चा करण्यासाठी कोणीतरी हवं होतं. मी त्यांना म्हणालो, ''दुसरी कडे कशाला जाता? मीच रोज पूजा-पाठ करत जाईन'' तेवढाच परमार्थ, थोडसं अर्थार्जन आणि शंभर टक्के मन:शांती. रिटायर्ड झाल्यावर भरपूर वेळ होता. सत्कारणी लागला. चल वरच्या मजल्यावर जाऊ.'' एवढं सगळं बबनराव एका दमात म्हणाला आणि जीना चढू लागला. मीही त्याच्या मागोमाग गेलो. आत गेलो तर तिकडे पुस्तकांचे गठ्ठेच्या गठ्ठे लागले होते. बबनराव सांगू लागला ''ही महाराजांची ग्रंथसंपदा. प्रकाशन, वितरण, विक्री सगळी व्यवस्था मी पाहतो.'' मी त्या गठ्ठ्यातून फिरत होतो. पाहिलं तर मराठी भाषेव्यतिरिक्त इतर अनेक भाषांत पुस्तकं होती. हिंदी, इंग्लिश, मल्याळी, गुजराथी, कन्नड, शिवाय फ्रेंच, जर्मन भाषेतदेखील ग्रंथ उपलब्ध होते. महाराजांचा भक्तगण देश-विदेशामध्ये पसरलेला पाहून आश्चर्य वाटलं. इतक्यात बबनरावने एक पुस्तक मला भेटीदाखल दिलं. पुस्तक कसलं; भलामोठा जाडजूड ग्रंथ होता तो. एवढं जड आध्यात्म मला झेपेल की नाही; याबद्दल मी साशंक होतो. ''चल निघू या'' बबन म्हणाला. आम्ही निघालो. वाटेत बबनराव मला एका छापखान्यात घेऊन गेला. कुठल्यातरी पुस्तकाची नवीन आवृत्ती काढायची होती. त्याबद्दल बोलणी करून आम्ही बाबुरावांकडे जाण्यास निघालो. मला नवल वाटत होतं. माणसं अशी स्वत:ला झोकून कशी काय काम करू शकतात? एवढ्या निष्ठेने आणि निरलसपणे काम करायचे म्हणजे मोठी कठीण गोष्ट आहे. बबनराव हे सर्व मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने करत होता. कौतुक करण्यासारखी गोष्ट होती.

सदशिवपेठेमधील बाबुरावांच्या घरी आलो. बाबूरावांनी मला मिठीच मारली. मला पाहून बाबुरावांना खूपच आनंद झाला. त्यांच्या पत्नीने आमचं स्वागत केले. म्हणाल्या ''तुम्ही आलात. छान केलं आणि तुम्ही बघा याचं चित्र हुबेहूब रंगवलंय की हो.'' कानडी असल्यामुळे मराठी कानडी हेलमधून बोलत होती. बाबुरावदेखील मराठी नीट वाचू शकत नव्हते. माझी कथा बबनरावने त्यांना वाचून दाखवली. बऱ्याच गप्पा झाल्या. रविवारपेठच्या जुन्या आठवणी निघाल्या. जुन्या सहकाऱ्यांची चौकशी चालवली. म्हणजे बबनराव आणि मी, आम्ही दोघेच बडबडत होतो. बाबुराव शांतपणे ऐकत होते. त्यांचा फारसा सहभाग नव्हता. मला त्यावेळचे बाबुराव आठवले. सतत हसणं खिदळणं, येता जाता विनोदी चुटकुले सांगण्याची त्यांची सवय. मला आठवतं; एकदा असाच लंचटाईमला त्यांचा दंगा चालू होता. कोणीतरी त्यांची थट्टा केली. कां कोण जाणे; पण बाबुराव इतके भडकले, तरातरा बाहेर गेले. मी त्यांच्या मागोमाग गेलो. पाहातो तो काय; बाबुराव बाजूच्या चहाच्या दुकानाच्या पायरीवर बसले होते. वर तो 'अमृततुल्य' चहा गाळत होता आणि खाली दगडी पायरीवर बाबुराव

टिपं गाळत होते. मोठा मनस्वी माणूस. पण आज बाबुरावकडे पाहिलं तर हाच का तो, असा प्रश्न पडावा. मला ते गप्प गप्पसे वाटले. आमच्या बोलण्याकडे त्यांचं लक्ष नसावं. मी थोडा अस्वस्थ झालो. शेवटी माझ्या कथासंग्रहाची एक प्रत त्यांना भेटीदाखल दिली आणि निरोप घेण्यासाठी उठलो. ते पाहून वहिनी आतून लगबगीनं बाहेर आल्या. म्हणाल्या ''स्वयंपाक तयार आहे, जेवूनच जायचं बघा.'' मी बबनरावकडे पाहिलं तर तो आरामशीर बसला होता. म्हणजे त्याला याची कल्पना होती. मला काहीच म्हणाला नाही. त्यादिवशी वहिनींनी फार सुंदर स्वयंपाक केला होता. सारं काही साग्रसंगीत! शेवयाची खीर तर अप्रतीम. जेवण झाल्यावर वहिनींनी बाबुरावांच्या हातावर ४/५ गोळ्या ठेवल्या. मी ते पाहात होतो. इतक्यात त्याच म्हणाल्या'' विस्मरणाची व्याधी जडलंय. वैद्याची औषधं आठवणीने द्यावी लागतात बघा.''

आम्ही बोलत होतो आणि बाबुराव लगबगीने आत गेले ते बराचवेळ बाहेर आलेच नाही. मला कळेना काय झालं ते. थोड्यावेळाने ते बाहेर आले. हातात एक चोपडी होती, ती माझ्या हातात दिली. मी पाहिलं ते एक हस्तलिखित होतं. थोड चाळलं. सुंदर हस्ताक्षरात बऱ्याच कविता होत्या. मला हसू आलं कारण माझ्या कथेतदेखील थोडाफार असाच प्रसंग होता. पुण्याहून मुंबईला बदली झाली तेव्हा बाबूरावांनी निरोपादाखल मला एक भेट दिली. एक हस्तलिखित होतं. बाबूरावांनी त्यात असंख्य विनोदी चुटके, म्हणी, कथा स्वत: लिहिल्या होत्या. ''काय बाबुराव तुम्ही केल्यात या कविता?''

''या माझ्या मुलीने केल्या.''

''काय म्हणता? कोठे आहे ती, बोलवा पाहू तिला.''

''ती नाही.''

''म्हणजे?''

''तिनं सुसाईड केलं.''

मला काय बोलावं तेच कळेना. अनपेक्षित होतं हे. बाबुराव खाली मान घालून बसले होते. वहिनी पुढे आल्या. म्हणाल्या ''तेव्हापासून यांची तब्येत बिघडली बघा. एकदा असेच भल्या पहाटे न सांगताच घराबाहेर पडले. नाश्ता नाही, स्नान नाही, सूर्य डोक्यावर आला तरी यांचा पत्ता नाही.'' हो, बबनराव पुढे सांगू लागला. ''वहिनींनी फोन केला तसा ताबडतोब इकडे धावत आलो. बराच भटकलो. शेवटी पोलिसात कळवावं असा विचार करत होतो आणि हे महाशय शनीच्या पाराजवळ बसलेले आढळले'' सगळं ऐकून सुन्न झालो. मी बाबुरावांचा हात हातात घेतला. काय बोलावं तेच समजेना. ''चला येतो मी.'' वहिनींनी आल्याबद्दल आनंद व्यक्त केला. बाबुरावांनी परत भेटण्याचे निमंत्रण दिले. भरल्या मनाने आम्ही तेथून निघालो. वाटेत बबनरावांकडे काय झालं, कसं झालं याची मी चौकशी केली नाही आणि त्यानेही स्वत:हून काही माहिती दिली नाही.

मुंबईला परतल्यावर दोन तीन दिवसांनी मी बाबुरावला फोन लावला.

''हॅलो बाबुराव''

''कोण बोलतंय?''

''अरे मी विजयकर.''

''विजयकर? कोण विजयकर?''

''अरे मी...

''रॉंग नंबर'' असं म्हणून बाबुरावांनी फोन कट केला. कमाल आहे! पण नंतर लक्षात आलं, बाबुरावांना विस्मृतीचा झटका आला असावा. माझ्या कथेतील बाबुराव आनंदी होता, खेळकर दिलखुलास होता. पुण्यातील वास्तव्यात त्यांचा हाच स्वभाव मला परिचीत होता. कथेला एक नाट्यमय कलाटणी देण्याचं जे काय तंत्र आहे त्यानुसार मी आपलं असं दाखवलं होतं की, नेहमी आनंदी खेळकर असणारे बाबुराव आपल्या वैयक्तिक आयुष्यात खूप दु:खी होते. त्यावेळी त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीची काहीच कल्पना नव्हती. त्यांच्या घरीही कधी गेलो नव्हतो. एक विरोधाभास म्हणून माझ्या कथानायकाला अखेरीस दु:खी, असाहाय्य केलं होतं. बऱ्याच वर्षांनी मी त्यांच्या भेटीला गेलो तेव्हा ते फार अशक्त आणि आजारी होते. एकटेच होते आणि रोज सकाळी 'गुड मॉर्निंग'ला खोडकर प्रतिक्रिया देणारे बाबुराव आज नि:शब्द डोळ्यांनी 'गुड नाईट' म्हणत होते, अशा सुरावटीवर मी कथेचा शेवट केला होता. कविकल्पना प्रत्यक्षात उतरावी ही अपेक्षा नव्हती. मनाला उगाचच टोचणी लागल्यासारखं वाटत होतं. आयुष्यातील कटु स्मृती जेवढ्या लवकर विसरता येईल तेवढं बरं असतं. पण आपली प्रिय व्यक्ती अशी अकस्मात सोडून गेल्यावर असे विस्मृतीचे झटके येणं यासारखं दुसरं दु:ख नाही. बाबुरावांच्या वाटेला हे दु:ख येणं हा नियतीचा खेळ. दुसरं काय म्हणणार?

*

लेख

# कला आणि माणसाचं जीवन

**✶ सुजन राणे ✶**

माणसाचं जीवन अनेक घटकांनी घडलेलं असतं, त्यात कलेचा भाग प्रामुख्यानी असतो. किंबहुना त्याचं जीवन उल्हसित करण्यामागे कलेचा हात मोठा असतो. मग ती गाण्याची कला असो, चित्रकला असो, नृत्यकला असो, किंवा नाटकात अगर सिनेमात काम करण्याची असो. अशा कलांनी त्याच्या जगण्याला एक वेगळाच अर्थ प्राप्त होतो. अशा एखाद्या कलेचा आस्वाद दिवाळीसारख्या सणी आप्तांच्या बरोबर घेणं म्हणजे आपला आनंद द्विगुणीत होतो यात शंका नाही. भीमसेन जोशीसारख्या एखाद्या माणसाचं गाणं, झाकीर हुसेनचा तबला, किंवा एखादी चांगली सतार ऐकल्यावर किंवा दिलीप प्रभावळकरांचं एखादं विनोदी नाटक पाहिल्यानंतर आपल्या आनंदात नक्कीच भर पडते. परंतू आपली कला सादर करण्यात त्याला यश मिळावं म्हणून कलावंत किती झटत असतो ते त्यालाच समजते. त्याची कला लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी व त्याला काय सांगायचं असते त्याच्यासाठी तो अहोरात्र तळमळत असतो. ती परिसीमा गाठण्यासाठी तो प्रयत्नाची शिकस्त करत असतो. या त्याच्या प्रयत्नात त्याच्या कुटुंबीयांना किती यातना व दु:ख सोसावं लागते ते फक्त त्यालाच किंवा त्याच्या कुटुंबीयांना कळत असते. असो.

वरच्या विधानाच्या आधारासाठी काही कलावंतांच्या जीवनाकडे पाहण्याचा मोह टाळता येत नाही. विन्सेंट व्हान गॉघ ( १८५३ - १८९० ) हा प्रसिद्ध डच चित्रकार होऊन गेला. तो चित्रकलेत post-impressionist school साठी नावाजलेला होता. ह्या पद्धतीत त्याची चित्रं अगदी जीवंत वाटतात. त्याने दहा वर्षात एकंदरीत २१६० चित्रं काढली त्यात ८६० तैल व १३०० इतर होती. एक समकालीन चित्रकार म्हणून त्याने युरोपात भरपूर प्रसिद्धी मिळवली. पण दुर्दैवाने हा कलावंत अत्यंत दु:खी असून त्याला मानसिक क्लेश असे काही होत होते की शेवटी त्याने वयाच्या ३७ व्या वर्षी पिस्तुलाच्या गोळीने स्वत:चा जीव घेतला. एवढी प्रसिद्धी मिळवूनसुद्धा तो जीवनात का दु:खी होता हे चित्रकलेच्या इतिहासात अजून न सुटलेलं गूढ आहे.

कुंदनलाल सैगल (१९०४ - १९४७) याच्यासारखा गाणारा नट हिंदी चित्रपटसृष्टीत आजपर्यंत झाला नाही. त्यांनी १४ वर्षांत १८५ गाणी गायली. त्यापैकी १४२ फिल्मी व ४३ गैर फिल्मी असं इतिहासात नमूद केलं आहे. तो अशा आवाजात गायचा की चांगले चांगले गवयी त्याच्यापुढे हतबल व्हायचे. आग्रा घराण्याचे फैय्याज खान व किराणा घराण्याचे अब्दुल करीम खान या प्रसिद्ध गवयांनीसुद्धा त्याची मुक्त हस्ताने स्तुती केली होती. त्याने कोणाकडे गाण्याची तालीम घेतली नव्हती. तो जन्मजात अत्यंत सुरेल व तन्मयतेनं गाणारा होवून गेला. १९३३ ते १९४७ पर्यंत त्याने आपल्या दर्दभऱ्या आवाजाने सबंध हिंदुस्थानाला अक्षरश: वेड लावलं होतं. पहिल्या 'देवदास' चित्रपटात तो असा काही गायला की त्या वेळचे कलकत्त्यात कित्येक शिकलेले तरुण स्वत:ला देवदास समजून दारू पिवून वावरत असत. देवदासमधल्या गाण्यांनी त्याच्या आर्ततेचा आणि उदासीनतेचा उच्चांक गाठला होता. अशा ह्या अलौकिक गाणाऱ्या नटाला कुठल्या मानसिक वेदना अस्वस्थ करत होत्या की तो शेवटी शेवटी स्वत:ला दारूत कायमचा बुडवून ठेवायचा. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक नौशादने एकदा त्यांची दारू पिण्याअगोदर आणि दारू प्याल्यानंतर ध्वनिमुद्रिका




काढली व विचारलं ''सैगल साहेब, तुम्हाला यापैकी कुठली ध्वनिमुद्रिका आवडली?'' सैगलने दारू पिण्याअगोदरच्या ध्वनिमुद्रिकेवर बोट ठेवलं. त्यावर सैगल नौशादना बोलले, ''नौशादसाहेब तुम्ही मला ही गोष्ट मला दारूचं व्यसन लागण्याअगोदर का नाही सांगितली?'' जानेवारी १९४७ साली अशा ह्या अमर कलावंताने दारूच्या अती सेवनामुळे स्वत:चा अंत करून घेतली. त्याचं काय दु:ख होतं हे त्याच्याबरोबर निघून गेलं. (संदर्भ - कुंदनलाल सैगल, राघव मेनन)

तसंच बिस्मिल्लाखान (१९१३-२००६)- ह्या अद्वितीय शहनाईनवाजाने भारतीय जीवनात शहनाईला उच्च जागा मिळवून दिली आहे. पहिल्या स्वातंत्र्यदिनी त्यांना दिल्लीच्या लाल किल्ल्यावर शहनाई वाजवण्याचा बहुमान मिळाला होता. त्यांना 'भारतरत्न' देऊन भारत सरकारने भूषित केलं. पण शेवटी त्यांच्याकडे एक इलेक्ट्रिक पंखा घेण्याचीसुद्धा परिस्थिती नव्हती. ते गर्मीत एका पुठ्ठ्याने वारा घेत असत. कारण त्यांनी पैसा साठवण्याकडे कधी लक्ष दिलं नाही, ते कायमचे त्यांच्या कलेमध्ये रममाण असत. त्यांची सुखदु:खाच्या पलीकडे पाहण्याची वृत्ती होती. या संदर्भात दोन गाण्यांचा विचार फार मनात येतो. पहिले बालगंधर्व (१८८८-१९६७). त्यांच्या ५० वर्षांच्या (१९०५ ते १९५५) कारकिर्दीत त्यांनी मराठी माणसाच्या हृदयावर एवढं अधिराज्य केलं की त्याला इतिहासात तोड नाही. त्यांच्या गाण्यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात कित्येक तरुण शास्त्रोक्त गाणं शिकण्याकडे वळले. पण त्यांच्या व्यक्तिगत जीवनात डोकावून पाहिलं तर काय बोलावं कळत नाही. नाटकात काम करताना, अक्षरश: मंचावर असताना त्यांना त्यांच्या मुलीच्या मरणाची बातमी कळली, पण ते गातच राहिले. त्यांना श्रोत्यांच्या आनंदाला धक्का पोहोचवायचा नव्हता, स्वत:चं दु:ख गिळून ते श्रोत्यांना सुख द्यायच्या तळमळीत होते. केवढा मोठा हा त्याग! ''असा बालगंधर्व पुन्हा न होणे'' असे उद्‌गार प्रसिद्ध मराठी लेखक माडगूळकरांनी काढले असं कुठेतरी वाचल्यासारखं आठवते. असा दुसरा एक अद्वितीय कलावंत म्हणजे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी (१९२२ - २०११) यांच्या प्रतिभेचा विचार केला तर आपल्याला असं आढळून येते की हा कलावंत आपल्या कलेत इतका गर्क होता की त्यांना त्यांच्या पहिल्या बायकोची वेळोवेळी होणारी अवहेलना पहायला मुळीच वेळ नव्हता. कारण आपल्या कलेतून श्रोत्यांना जेवढा आनंद देता येईल तेवढा ते प्रयत्न करत होते. केवळ तेच त्यांचं उद्दिष्ट होतं. गाण्यासाठी ते जगत होते. तेच तेच राग गाऊन श्रोत्यांना जेवढं खुलवता येईल तेवढा त्यांचा सतत

ध्यास असायचा. अशा वेळी त्यांचं व्यक्तिगत जीवन त्यांना किती वेदना देत होतं हे फक्त त्यांनाच माहिती होतं. राघवेंद्र म्हणजे त्यांच्या पहिल्या बायकोच्या (सुनंदाच्या) मुलाने या परिस्थितीचं चित्र अतिशय निर्भयतेनं त्यांच्या नुकतंच छापलेल्या पुस्तकात रंगवलं आहे.

(संदर्भ - गाणाऱ्याचं पोर, राघवेंद्र जोशी)

चित्रपटसृष्टीच्या इतिहासाकडे आपण जर वळलो तर आपल्याला असं आढळते की गुरुदत्त (१९२४ - १९६४) हा असा काही नट व दिग्दर्शक होऊन गेला की या क्षेत्रात त्याची दुसऱ्या कोणाबरोबर तुलना करणं हे कठीण आहे. याचं मुख्य कारण त्यांनी हिंदी चित्रपटांना त्याच्या अगोदर कोणीही न दिलेली दिशा दिली. कागजके फूल, प्यासा व साहिब बीबी और गुलाम ह्या चित्रपटात त्यांनी चित्रपटशौकिनांना चित्रपट या माध्यमाकडे एका वेगळ्या दृष्टीने बघायला शिकवलं. चित्रपट हे केवळ वास्तवाची छाया आहे असं काहीतरी तो सतत सांगायचा प्रयत्न करत होता. त्याचं व्यक्तिगत जीवन अतिशय अस्वस्थ होतं. पार्श्वसंगीत गाणाऱ्या गीता रॉयशी त्याचं लग्न झालं होतं. पण वहिदा रहिमानच्या प्रेमात बेभान झाल्यामुळे तो जणूकाही ती मानसिक स्थिती त्याच्या चित्रपटात प्रतिबिम्बित करत होता असं राहून राहून वाटते. त्याला चित्रपट शौकिनांना जे काही सांगायचं होतं, ते सांगण्यात तो इतक्या टोकाला जातो की शेवटी अती मद्य आणि झोपायच्या गोळ्या घेऊन आत्महत्या करून घेतो व त्याच्या चाहत्यांना हळहळत ठेवतो.

वरच्या सर्व कलावंतांच्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचं विश्लेषण केलं तर आपल्याला असं सापडते की या कलावंतांना स्वतःच्या कलेपलीकडे जग नव्हतं. त्यांची सर्व उर्जा त्यांच्या कलेत केंद्रित झाली होती. मग, जग त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवते की नाही याची त्यांना यत्किंचितही चिंता नव्हती. त्यांचं चारित्र्य म्हणजे त्यांची कला. त्या माध्यमातून ते त्यांच्या चाहत्यांना आपलं दुःख किती यशस्वीरित्या सांगू शकत होते हीच त्यांची कायमची तळमळ असायची. या सर्व प्रवासात ते स्वतःचं दुःख गिळत गिळत लोकांना जितकं सुख आणि आनंद देता येईल यासाठी सतत प्रयत्नशील असायचे. तेव्हा कलेची कलाकाराच्या जीवनाची सांगड घालण्याचा आपण प्रयत्न केला तर तो फोल ठरेल असं वाटतं.

*

## पान पिकले पिकले

कळ्या फुलांत एकले
देठ तुटता तुटेना
फांदीवरूनी झुकले
पान पिकले पिकले
फांदीवरूनी झुकले
आला सुसाट वारा
ते किंचित वाकले
पान पिकले पिकले
किंचित वाकले
आल्या पाऊसधारा
ते थोडेसे थकले
पान पिकले पिकले
थोडेसे थकले
आली तिरीप उन्हाची
जे जरासे सुकले
पान पिकले पिकले
थकले सुकले
झुंज वादळवाऱ्यांशी
देऊनी टिकले
पान पिकले पिकले
त्याचे काही न चुकले
आयु उदंड ललाटी
विधिने रेखले
आल्या प्रसंगा सामोरे जाण्या ते शिकले
पान पिकले पिकले

**-नलिनी तळपदे**

प्रवासवर्णन

# स्पेन, पोर्तुगाल, मोरोक्को : एक हटके पर्यटन


✶ अपर्णा उदय कीर्तिकर ✶


युरोप, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, हाँगकाँग, भूतान ह्या सर्वमान्य सफरी करून झाल्यावर आता कोणती तरी हटके सहल करावी असे वाटत असताना तशी संधी आली.

शाळेत ३८ वर्षे भूगोल विषय शिकविताना भूमध्य सागरी हवामानाचे प्रदेश हे सौम्य हवामानाचे, फळाफुलांनी समृद्ध प्रदेश असून या देशांनी जगाला जगप्रवास करणारे धाडसी, दर्यावर्दी असे वास्को-द-गामा, ख्रिस्तोफर कोलंबस दिले आहेत. तसेच जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीबद्दल वाचले होते. नॅशनल जिऑग्राफीक चॅनेलवर अधून मधून हे प्रदेश पाहिले होते. त्यामुळे त्यापैकी स्पेन, पोर्तुगाल व मोरोक्को ह्या देशांना भेट देण्याची संधी मिळाली.

मुंबई-अम्मान-माद्रिद असा आमचा विमानाचा प्रवास होता. अम्मान माद्रिद हा प्रवास भूमध्य समुद्रावरून होता. एरवी विमानातून खालचे काही दिसत नाही. पण ह्या प्रवासात खाली निळसर हिरवट समुद्र, त्यातील मोठी हिरवीगार बेटे व खेळण्यातील बोटींप्रमाणे लहान लहान दिसणाऱ्या प्रवासी बोटी विमानातून दिसत होत्या.

माद्रिद ही स्पेनची राजधानी असून हे जुने ऐतिहासिक शहर मँझटनेस ह्या नदीकाठी उंचावर वसले आहे. १६ व्या १७ व्या शतकातील ह्या शहरातील रॉयल पॅलेस हा जुना भव्य राजवाडा अजूनही सुस्थितीत असून तेथील वस्तुसंग्रहालय सर्वांना पहाण्यासाठी खुले आहे.

माद्रिदमधील एका भव्य चौकातील ''सिबेलस कारंजे'' पहाण्यासारखे आहे. दोन सिंहांच्या रथावर आरुढ झालेल्या रोमन देवतेचे हे शिल्प अतिशय देखणे आहे. फुटबॉल हा स्पेनचा राष्ट्रीय खेळ असून 'रियल माद्रिद' ही त्यांची टीम खूप प्रसिद्ध आहे. स्पेनमधील 'बुल-फाईट' हा खेळही खूप प्रसिद्ध असला तरी थरारक असलेला हा जीवघेणा खेळ म्हणजे क्रूरतेचा अतिरेक आहे.

माद्रिदहून पोर्तुगालकडे बसने जाताना सरहद्दीवर फक्त तशा आशयाचा फलक व नकाशा तेवढा लावलेला आढळतो.

पोर्तुगालमधील पोर्टो हे शहर जुने असून दुसऱ्या मोठ्या क्रमांकाचे शहर आहे. जुने शहर असल्याने रस्ते आपल्या गिरगांवसारखे अरुंद. वाहतुकीसाठी अजूनही ट्राम वापरली जाते. रस्त्यावरच ट्रामचे रुळ. त्यावरून ट्राम, बाजुने बस व गाड्या यांची वाहतूक शिस्तीतच होते. हे पाहिल्यावर लहानपणी गिरगांवमधील ट्राममधून केलेला प्रवास आठवला.

कोईंब्रा हे शहर पोर्तुगालमधील तिसऱ्या क्रमांकाचे पण जुने शहर आहे. येथील कोईंब्रा हे विद्यापीठ जगातील पहिले विद्यापीठ असून त्याची स्थापना इ.स. १२९० साली झाली असून आजही ते पर्यटकांचे आकर्षण आहे.

कोईंब्रा येथून लिस्बन येथे जाताना वाटेत मेरी फातीमा हे ख्रिश्चन, मुस्लिम व ज्यू धर्मियांचे पवित्र स्थान लागते. आपल्या शिवाजीपार्कएवढ्या मोठ्या प्रांगणात पुढच्या बाजुला आधुनिक बांधणीचे भले मोठे Basillica असून खूप मागच्या बाजुला जुने चर्च आहे. चर्चमधील फातिमा ही देवी नवसाला पावते अशी लोकांची श्रद्धा आहे. नवस फेडण्यासाठी भक्तगण गुडघ्यावर चालत देवतेच्या दर्शनाला येतात. जसे आपल्याकडे भक्त लोळत किंवा लोटांगण घालत दर्शनाला जातात. जगात कुठेही जा, श्रद्धा सगळ्यांची सारखीच.

लिस्बन ही राजधानी टॅगस (तॅजो) नदी जेथे अटलांटिका महासागराला मिळते तेथील सात लहान

लहान टेकड्यांवर वसलेली आहे. (आपली मुंबई सात बेटांची मिळून बनलेली आहे हा भौगोलिक इतिहास आठवला)

जेरोनिमॉस हे वॉस्को-द-गामा मेमोरियल हे खूप मोठे चर्च असून तेथील उंचावरील असलेल्या स्टेनग्लास खिडक्यांतून येणाऱ्या सूर्यप्रकाशामुळे खूप विलोभनीय दृश्य दिसते.

आता पोर्तुगालमधून परत स्पेनमध्ये प्रवेश केला. सिविल ही स्पेनमधील दक्षिणेकडील आर्थिक व सांस्कृतिक राजधानी असून हे कलात्मक व ऐतिहासिक स्थळही आहे. स्पेनचा पारंपारीक नृत्य प्रकार म्हणजे 'फ्लेमिंको' हा ट्रॅप डान्स. हे नृत्य स्त्री-पुरुष मिळून करतात. पायात मजबूत टाचांचे बूट घालून पाय तालात रंगमंचावर आपटून हे नृत्य करतात. त्याच्या जोडीला हातानेही विविध नृत्याविष्कार केले जातात. स्त्रिया पायघोळ, घेरदार, फ्रीलवाले रंगीबेरंगी फ्रॉक घालतात तर पुरुष शर्ट, पँट, जॅकेट घालतात. टपटप आवाज करीत जोशपूर्ण असे हे नृत्य पहाताना आपणही नकळत पायाने ताल धरतो.

सिविल येथील अल्काझार हे जुने वस्तुसंग्रहालय एका राजवाड्यात असून तेथे सिरॅमिकच्या कलात्मक वस्तुंबरोबरच इतर वस्तुंचा संग्रहही पहाण्यासारखा आहे. पर्यटकांसाठी येथे रस्त्यावरून धावणारी व्हिक्टोरीया हे जुने वाहनही आढळते.

स्पेनचे केशर प्रसिद्ध असून 'पायेला' हा आपल्या बिर्यानीसारखा पदार्थ प्रसिद्ध आहे. चिकनबरोबरच काही भाज्याही त्यात घालतात. आपल्याकडे जसे हॉटेलमध्ये जेवणाबरोबर कांदा आणून ठेवतात तसे तेथे ऑलिव्हज् आणून ठेवतात.

आफ्रिकेच्या उत्तर भागात असलेला मोरोक्को हा मुस्लिमबहुल देश असून भूमध्य समुद्र व अटलांटिक महासागराच्या काठी वसलेला आहे. त्यामुळे तेथे जाण्यासाठी जिब्राल्टरची सामुद्रधुनी ओलांडून जावे लागते. मोठ्या फेरी बोटीची सोय असून भूगोलात शिकलेल्या जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीतून प्रत्यक्ष प्रवास करण्याची संधी मिळते. समोरच रॉक ऑफ जिब्राल्टर मोठ्या दिमाखात उभा असलेला दिसतो.

सुमारे १/१।। तासाचा प्रवास करून आपण मोरोक्कोच्या टँजर बंदरात पोहोचतो. मोरोक्को हा आफिक्रेच्या उत्तर टोकावरील देश त्याच्या भौगोलिक स्थानामुळे युरोपला जवळचा आहे आणि याचा प्रत्यय या देशात फिरताना येतो. युरोपियन देशांसारखी स्वच्छता, टापटीप, शिस्त सर्वत्र आढळते.

टँजर हे बंदर सामुद्रधुनीच्या तोंडावर वसलेले असून मुस्लिम, ख्रिश्चन व ज्यू समाजामुळे येथे बहुरंगी सांस्कृतिक वातावरण आढळते.

टँजर येथून फेस ह्या शहरी जाताना वाटेत मदिना हे जुने शहर लागते. तेथील जुने मार्केट आपल्या दादरच्या कीर्तिकर मार्केटच्या धर्तीवरचे पण खूप मोठे असे मार्केट आहे. अरुंद बोळाच्या दोन्ही बाजूला मटण, भाजी, फळे, सुका मेवा व इतर असंख्य वस्तूंची दुकाने ओळीने आहेत. एका दुकानाच्या बाहेर उंटाचे मुंडके लावून ठेवलेले होते. कारण ते उंटाच्या मटणाचे दुकान होते. येथील सुकामेव्याच्या मार्केटमध्ये खजूर, अक्रोड, सुके अंजिर, जर्दाळू यांच्या राशी विक्रीसाठी होत्या.

मर्राकेश हे मोरोक्कोमधील एक मोठे शहर असून तेथे जाताना इफ्रान युनिव्हर्सिटीचे शहर लागते. आफ्रिकन विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिकविणारे आफ्रिकेतील एकमेव विद्यापीठ आहे. मर्राकेश हे ऐतिहासिक शहर असून ॲटलास पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या त्या शहराच्या दक्षिणेला सहारा वाळवंट तर पश्चिमेला अटलांटिक महासागर आहे. येथील पालाईस (पॅलेस) बाहिम हा १९ व्या शतकाच्या अखेरीस बांधलेला राणीमहाल पहाण्यासारखा आहे.

स्पेन, पोर्तुगालमध्ये न आढळलेले दृश्य मोरोक्कोत सर्वत्र आढळले. ते म्हणजे दुतर्फा चेरी, संत्री लगडलेली झाडे. तसेच हायवेवर मोठमोठ्या चेरी, अंजिर, प्रचंड मोठी कलिंगडे इ. फळे राशींनी

## वात्रटिका

### पेग

एक दारूची बाटली झिंगून झिंगून झाली टाईट
गुंगीतच स्वप्नं म्हणते पडली वाईट-साईट
म्हणते, 'अर्धी संपलेय, तरी अर्धी आहे टिकून,
मोजता-मोजता जास्त पेग घेतले असणार चुकून!

**-डॉ. सुमन नवलकर**




विक्रीस ठेवलेली आढळली.

कासाब्लँका हे मोरोक्कोमधील सर्वात मोठे शहर असून ती देशाची आर्थिक राजधानी आहे. पश्चिमेकडील अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर वसलेले हे आधुनिक शहर आहे.

येथील 'द मासेक हसन २' ही प्रचंड मोठी मशिद असून अरबी व इस्लामिक वास्तुशास्त्राचा संगम येथे झालेला दिसतो. हिरव्या, निळ्या, पांढऱ्या रंगाच्या पोर्सलीनच्या टाईल्स व मोझॅक्सचा भरपूर, चांगला व कलात्मक वापर येथे केलेला आढळतो. मशिदीचा मनोरा ६८९ फूट उंच असून जगातील सर्वात उंच असा मशिदीचा मनोरा आहे. मशिदीचा प्रार्थना विभाग सुमारे २०,००० चौ. मीटर असून तेथे सुमारे २५,००० भाविक बसू शकतात. दोन्ही बाजूला स्त्रियांसाठी खास पोटमाळे बांधलेल्या गॅलऱ्या आहेत. तळघरात पारंपारीक स्नानगृह (हमाम) असून त्याचा तळभागही मोझॅक टाईल्सने सुशोभित केला आहे. स्वच्छ, संथ पाण्यातून दिसणारा त्याचा तळ व त्यात पडलेले दिव्यांचे प्रतिबिंब हा नजारा अतिशय सुंदर! ''अल्लाचे सिंहासन समुद्रात आहे'' अशी या लोकांची धारणा असल्याने समुद्रात भराव घालून या प्रचंड मशिदीची उभारणी केलेली आहे. मशिदीच्या पाठीमागे पश्चिमेस अटलांटीक महासागर आहे. रबात ही मोरोक्कोची राजधानी असून अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर वसलेली आहे.

आता परत स्पेनला जायचे असल्याने टँजर बंदरातून Algesiras बंदरात जाऊन मलगामार्गे ग्रॅनाडाला गेलो. हा रस्ता अतिशय सुंदर असून समुद्रकाठाकाठाने गेलेला आहे. इमारती लक्षवेधक असून शहर अतिशय सुंदर आहे.

स्पेनमधील ग्रॅनाडा हे शहर बैरो, डारो आणि जोनिल ह्या नद्यांच्या संगमावर वसलेले असून येथील 'ख्रिस्तोफर कोलंबस मेमोरीयल' प्रसिद्ध आहे. स्मारकाची इमारत व प्रांगण अर्धवर्तुळाकार व खूप मोठे असून इमारतीच्या प्रांगणाकडील बाहेरील भिंतीवर कोलंबसच्या सफरीविषयी विविध चित्रे रंगीत मोझॅकमध्ये बनविलेली आहेत.

बार्सिलोना हे स्पेनमधील ऐतिहासिक शहर आहे. त्याची स्थापना इ.स.पू. २३० मध्ये झाली असून ऐतिहासिक महत्त्वाच्या गोष्टींचे चांगले जतन केले आहे. ऐतिहासिक व आधुनिकतेचा सुंदर मिलाफ झालेला आढळतो.

येथे छोट्या छोट्या टेकड्या असून त्यापैकी एका मोठ्या टेकडीवर (आपल्या मलबार हिलसारख्या) 'ऑलिम्पिक स्टेडियम' उभारलेले आहे. मुख्य व मोठ्या स्टेडियमच्या मध्यभागी फुटबॉल, हॉकी या खेळांसाठी हिरवळीचे मैदान व बाजूने धावण्यासाठी tracks आहेत. याच्या बाजुला जिम्नॅस्टिक स्टेडियम व स्विमिंग पूल आहे. त्या टेकडीवरून बार्सिलोना शहराचा परिसर व बार्सिलोना बंदर दिसते.

आपल्या दादरमधील रानडे रोड किंवा पुण्यातील लक्ष्मीरोडसारखी 'रामब्लास-दि-बार्सिलोना'' ही सुप्रसिद्ध walking street shopping साठी प्रसिद्ध आहे. ही walking street कायम पर्यटकांनी फुललेली असते. जगातील Top Ten देशांमध्ये स्पेनचा क्रमांक तिसरा असून बार्सिलोना हे स्पेनमधील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे.

अशी ही आमची स्पेन-पोर्तुगाल-मोरोक्कोची एकूण बारा जणींनी केलेली १५ दिवसांची खाजगी पण हटके सहल!

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## इतिहासाची उलटता पाने-

# भाऊच्या धक्क्याचे शिल्पकार

# लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य

* विश्वास अजिंक्य *

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀



ब्रिटीशकालीन मुंबई शहराच्या आधुनिकीकरणाच्या वाटचालीत ''भाऊचा धक्का' हा माईलस्टोन आहे. आजच्या मुंबईकरांना लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य हे नाव कदाचित अपरिचित असेल. पण या शहरातील प्रत्येकाला 'भाऊचा धक्का' तर माहीत असेलच. तर याच लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य उर्फ ''भाऊ रसूल'' या पाठारे प्रभु गृहस्थाने ''भाऊचा धक्का' बांधला आणि मुंबईच्या जडण-घडणीत मोठे योगदान दिले.

लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य उर्फ भाऊ रसूल यांचा जन्म उरण येथील करंजा या गावी १७८८ साली झाला. करंजास त्यांचा जमीन जुमला होता. नशीब काढण्यासाठी लक्ष्मणजींचे वडील १८०१ साली कुटुंबासह मुंबईत आले. परंतु थोड्याच दिवसात लक्ष्मणजींच्या वडिलांचे निधन झाले. अगदी लहान वयातच, वयाच्या बाराव्या वर्षी आईची व दोन लहान भावंडांच्या पालन पोषणाची जबाबदारी लक्ष्मणवर पडली. त्याचे इंग्रजी भाषेचे ज्ञान चांगले होते. अक्षर वळणदार. त्याच्या जोरावर कोणा नवलकर कुटुंबाकडून ओळखपत्र घेऊन तो ईस्ट इंडिया कंपनीच्या 'गन कॅरिएज' फॅक्टरीत नोकरीस लागला व लवकरच स्वकर्तृत्वावर हेड-क्लार्क झाला.

गन कॅरिएज फॅक्टरी १८२३ मध्ये धाकट्या कुलाब्यात सुरू झाली होती. या कारखान्यात तोफा, गोळे, तोफांचे गाडे बनविले जात. तिथे वाफेची यंत्रे बसविली होती व अनेक तऱ्हेचे लोखंडी तसेच पितळी ओतीव काम चालत असे. तिथे शेकडो लोक काम करीत. कॅप्टन रसेल हे युरोपियन गृहस्थ तोफखाना विभागातील नामांकित अधिकारी. लक्ष्मणचे वरिष्ठ. या कॅप्टन रसेलचा लक्ष्मणवर विश्वास तर होताच पण त्यांना लक्ष्मणबद्दल आपुलकीसुद्धा होती. त्यामुळेच कारखान्यात लक्ष्मणच्या शब्दालासुद्धा किंमत होती. त्यांच्या विभागातील एका मराठी माणसाने एकदा एका क्षुल्लक गोष्टीची चोरी केली. चोरी ती चोरीच. त्याला लष्करी शिस्तीनुसार फटक्यांची शिक्षा सुनावण्यात आली. एका गरीब मराठी तरुणाला क्षुल्लक चोरीसाठी सर्वांसमक्ष फटके मिळून त्याची बदनामी होणार त्यामुळे लक्ष्मण अस्वस्थ झाला. त्यावेळी लक्ष्मणने स्वत: हस्तक्षेप करून रसेल साहेबांकडे कामगाराच्यावतीने क्षमायाचना केली व रसेल साहेबांनी ती रद्द केली. स्वत: देशाभिमानी असणाऱ्या कॅप्टन रसेलना, स्वदेशाचा विचार करून एका कामगाराचे फटके वाचविणाऱ्या हेडक्लार्क

लक्ष्मणविषयी आदर निर्माण झाला. कॅप्टन रसेलनी लक्ष्मणला मिठी मारून ''यु आर माय ब्रदर'' असे उद्‌गार काढून त्याची पाठ थोपटली. या प्रकाराने त्यांची कारखान्यातील कामगारांपुढील प्रतिमा उजळली व सर्वजण आदराने त्यांना 'भाऊ' म्हणून हाक मारू लागले; ते कायमचे.

त्यावेळी मुंबई म्हणजे मोठा कुलाबा, धाकटा कुलाबा, माझगांव, परळ, वरळी, माटुंगा, माहीम अशी ७ वेगवेगळी बेटे होती. लोकवस्ती वेगवेगळ्या दिशेला फैलावली होती. वाहतुकीचीही फारशी सोय नव्हती. कारखान्यातील दूरवर रहाणारे कामगार पायपीट करून चिखल व दलदल तुडवत कामावर येत. वेळेवर कामावर हजर रहाण्यासाठी त्यांना पहाटे लवकर घर सोडावे लागत असे. त्यामुळे बहुसंख्य कामगारांना दुपारच्या भोजनासाठी चटणी-भाकरी घेऊन कामावर येणे अशक्य होत असे. कामगारांची अडचण समजल्यावर भाऊंनी कामगारांसाठी कारखान्यातच न्याहारीची व्यवस्था करण्याची परवानगी मागितली. कॅप्टन रसेलनी परवानगी तर दिलीच; पण न्याहरीसाठी उपहारगृह भाऊंनी स्वत:च चालवावे असे सुचविले. भाऊंनी कामगारांसाठी कारखान्यातच उपहारगृह सुरू केले. कामगारांना कारखान्यातच ताजी चटणी भाकरी मिळू लागली. यामुळे भाऊंना लोकप्रियतेबरोबरच थोडाफार पैसा मिळाला आणि इथेच भाऊंच्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

ते धाडसी व व्यापारी मनोवृत्तीचे होते. कॅप्टन रसेलनी भाऊंना व्यापारी क्षेत्रात शिरण्यास उद्युक्त केले. त्यामुळे नोकरीत असतानाच मुंबईत तयार होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कामे त्यांनी सरकारकडून मिळवली. कालांतराने त्यांना कचरा पट्टीचा मक्ताच मिळाला. मग मात्र त्यांनी गन फॅक्टरीतला कारकुनीपेशा सोडला आणि पूर्ण वेळ व्यावसायिक झाले. मुंबईत असलेली डबकी आणि सांडपाणी असलेले तलाव बुजविण्याचे काम त्याकाळी सुरू झालेले होते. त्याचे कंत्राट भाऊंना मिळाले. ईस्ट इंडिया कंपनीने स्थानिक लोकांना लीजवर जागा द्यायला सुरूवात केल्यावर त्यांनी रस्ते बांधणीच्या व्यवसायात उतरायचे ठरविले. त्यासाठी चिंचबंदरपासून मशिदबंदरपर्यंत आणि मशिदबंदरपासून क्रॉफर्डमार्केटपर्यंतची १०-१५ फूट खोल पाण्याखालची सर्व जागा स्वखर्चाने भराव टाकून रस्ता बांधण्यासाठी त्यांनी सरकारकडून परवानगी मागितली. सरकारनेसुद्धा समुद्रकिनाऱ्यावरील तस्करीला आळा बसेल या हेतूने रस्ते बांधण्याची परवानगी दिली आणि बघता बघता लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य मोठा बिल्डर बनला.

इंग्रज त्यांचे मुंबई येथील स्थान पक्के करण्याच्या उद्योगाला लागले. पुष्कळ वर्षापर्यंत लढायांमुळे मुंबईच्या आजूबाजूच्या खेड्यातील जमिनी ओस पडल्या होत्या. पशुसंवर्धन, अन्नधान्य, भाजीपाला याचे उत्पादन व्हावे तेवढे होत नव्हते. मुंबईची बेटे कब्जात आल्यावर इंग्रजांनी धार्मिक छळाचे धोरण बाळगले नाही. त्यामुळे येथे सर्व धर्माच्या लोकांची वस्ती वाढतच होती. त्यांनी शेलक्या प्रतिष्ठित नागरिकांना काही गावे वहिवाटीसाठी देण्याचे ठरविले. वहिवाटदार त्या गावचे स्वामी. त्यांनी विहीरी बांधून ओसाड जमिनी लागवडीखाली आणावयाच्या व गावची सुधारणा करावयाची. या वहिवाटदारांना खोत असे म्हणत. खोती हक्क देण्यासाठी सरकारने अर्ज मागविले. लक्ष्मण अजिंक्य उर्फ भाऊ पहिले अर्जदार. कॅप्टन रसेलनी सरकार दरबारी शिफारस केली. लक्ष्मण हरिश्चंद्र यांनी आकुर्ली (कांदिवली पूर्व), चिंचवली (मालाड पश्चिम), व दिंडोशी (गोरेगाव पूर्व) या तीन गावांचे खोती हक्क ईस्ट इंडिया कंपनीकडून घेतले व या गावांचे खोत झाले.

मुंबई बेटावर मालाची वाहतूक जलमार्गे मचवे व गलबतांनी फार पूर्वीपासून होत असे. पण १८३६ पर्यंत मुंबईच्या किनाऱ्यावर माल उतरविण्यासाठी किंवा उतारुंसाठी धक्का असा नव्हता. मुंबई किनाऱ्यावर मचव्यांनी व गलबतांनी येणाऱ्या एतद्देशीयांचे बोटीतून जमिनीवर पाय टेकेपर्यंत खूप हाल व्हायचे. रात्रभर प्रवास करून आलेली बोट समुद्रात लांब कोठेतरी नांगर टाकायची. मग छोट्या हिंदकाळणाऱ्या होड्यांमधून प्रवासी खच्चून भरून, चिखलाने भरलेल्या मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावर पाऊल ठेवायचे. त्यात बंदराकडून जाणारे-येणारे रस्ते मातीचे. माल वाहून आणण्यासाठी बैलगाड्यांचा उपयोग. यामुळे मालाची ने-आण भराभर होत नसे. इंग्रजांची मूळची संस्कृती व्यापारीच. इंग्रज राज्यकर्त्यांना मुंबईतून व्यापार करताना बंदरातील संरचनात्मक उणिवांची जाणीव होऊ लागली. व्यापार जितक्या प्रमाणात

वाढण्याची गरज होती तितक्या प्रमाणात वाढत नव्हता. त्यामुळे त्यांनी मुंबई शहराला व्यापारी स्वरूप देण्याचे ठरविले. स्थानिक तसेच परदेशी बोटीतून माल चढविणे उतरविणे यासाठी, प्रवाशांच्या सोयीसाठी पूर्व किनाऱ्यावर समुद्र हटवून बंदरे बांधण्याचे ठरविले. पण सरकारचा खजिना रिकामा. पैशाचा खडखडाट. सरकारने निर्णय घेतला. ज्या नागरिकांची ऐपत असेल त्यांना मालकी हक्काने बंदरे बांधण्याची परवानगी देणे. सरकारने अर्ज मागविले. ''साहस शून्य तर हाती शून्य. साहसे श्री प्रतिवसती'' हे संस्कृत वचन भाऊंच्या मनावर बिंबलेले असावे. बंदर बांधण्याच्या परवानगीकरता त्याने अर्ज ठोकला. त्यांचे समकालीन म्हणजे कावसजी जहांगीर, बैरामजी जीजीभाई, नाना शंकरशेट, कावसजी फ्रामची. पण बंदरे बांधण्यासाठी अर्ज करणारे एकमेव लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य.

हा समुद्र हटवायला अथांग सागराशी झुंज द्यायला निघाला म्हणून भाऊंच्या मित्रमंडळींनी त्यांना वेड्यात काढले. सग्या-सोयऱ्यांची धाबी दणाणली. सरकारने बंदराचा आराखडा मागितला. भाऊने तहान-भूक विसरून रात्रंदिवस भरती-ओहोटीचा अभ्यास केला व बंदर बांधण्यासाठी सर्वात सोयिस्कर असे स्थान निश्चित केले. त्या स्थानाचे महत्त्व पाऊणशे वर्षानंतर पोर्टट्रस्टच्या इंजिनियर्सना उमगले. त्यांना त्या स्थानाच्या दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे विस्तार करणे अगदी सुलभ गेले. इथेसुद्धा कॅप्टन रसेल भाऊंच्या मदतीला धावून आला. त्यांच्या मदतीने व शिफारसीने बंदराचा आराखडा सादर केला गेला. संमती मिळाली. बंदर बांधण्याचे काम झपाट्याने सुरू झाले.

मातीची भरणी घातली तर ती वाहून जाईल. तेव्हा कचऱ्याची भरणी घालण्याचे त्यांनी ठरविले. कचरा भिजून त्याचा लगदा झाला की तो जमिनीला चिकटून बसेल ही त्यामागील कल्पना. त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला. कचरापट्टीचा मक्ता त्यांच्याकडे होताच. त्यांनी शहरातील सर्व कचरा या बंदराच्या खाडीत घालून ती भरून काढली. तेव्हापासून आजतागायत मुंबईत भराव घालताना कचऱ्याचा सर्रास उपयोग केला जातो. कचरा टाकून भराव घालण्याच्या कमी खर्चाच्या पद्धतीचा उपयोग केल्यामुळे बंदर बांधण्याचा खर्च लाखांनी कमी झाला. त्यांचे काम सुरळीत चालले होते असे नव्हे. आजुबाजूला त्यावेळीही झोपडपट्टी होतीच. बहुतेक वस्ती मुसलमानांची. त्याकाळात किनारपट्टीवरच बांधलेली घरे एकमेकांस चिकटलेली असत. दाट लोकवस्ती असल्यामुळे सीमाशुल्क चुकवून आखाती देशातून चोरटी आयात व येथून चोरटी निर्यात करणाऱ्या तस्करांचा धंदा जोरात चालत असे. त्यांनी विरोध केला. पण त्यांचे काहीही चालले नाही. कारण मूळ योजनाच मुळी सरकारची होती. त्याकाळी वीज नव्हती. बांधकामासाठी अजस्त्र

## सजणा येणार

सजणा येणार तू आज घरी।
घेशील का मज उरी।

रातराणीचा गंध दरवळतो।
झाडामागून चंद्र पाहातो।

तुझेच स्वप्न रात्रंदिनी पाहाते।
मेंदीनी हात रंगविते।

चाफ्याचे फूल केसात माळते।
सजणा येणार तू आज घरी।

हळूच बिलगून तुझ्या कुशीत।
पाखरू बनून राहीन ह्रदयात।

गुणगुणते तुझीच गाणी।
मोगऱ्याची बेधुंद वाणी।

तुला आठवते का हे सारे।
केतकीच्या बनातले सुगंध वारे।

सारे आठवून उगाच हसते।
तुझेच स्वप्न रात्रंदिनी पाहाते।

सजणा येणार तू आज घरी।

**- सौ. इना तळपदे**

यंत्रसामुग्री नव्हती. मालवाहू मोटारी आल्या नव्हत्या. अशा कठीण परिस्थितीत भाऊंनी काम केले. त्यात इंग्रज सॉलीसिटरनी लीज करारांमध्ये वारंवार बदल केले. नवीन लीज करारांमुळे कामे अवाढव्य वाढली. पण वाढीव बांधकाम पूर्ण करण्यासाठी चार वर्षांच्या मूळ मुदतीत मात्र वाढ करण्यात आली नाही. नव्या करारातील नव्या अटींमुळे लक्ष्मण हरिश्चंदजी त्यांच्याकडच्या मर्यादित गंगाजळीतून काम पुरे करू शकणार नाहीत हे जाणून गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रांटनी त्यांनी दीड लाखाचे कर्ज खुषीने मंजूर केले. कर्जादाखल ६ टक्के चक्रवाढ व्याज आणि आठ वर्षात कर्जफेड. स्वतःचा जमीनजुमला गहाण; अशा अनंत अडचणींना तोंड देत शेवटी ४-५ वर्षांनी एकदाचे बंदर तयार झाले. येणारा जाणारा माल सुरक्षित ठेवण्यासाठी बंदरात वखारीची व्यवस्था केली होती. हिंदुस्थानातील वखारीयुक्त हे पहिले बंदर. कलकत्याला पुढे जेव्हा बंदरे बांधण्यात आली. तेव्हा तेथेसुद्धा या धर्तीवरच वखारींची सोय करण्यात आली. सागरी वाहतुकीसाठी हे बंदर खुले झाले. दाणा, फळफळावळ, लाकडे, गवत व इतर अनेक प्रकारचा माल देशी-परदेशी बोटींतून जाऊ-येऊ लागला. भाऊंना स्थापत्यशास्त्राची चांगली जाण होती. त्यामुळेच त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली बोटीतून माल चढविण्या-उतरविण्यासाठी, प्रवाशांच्या सोयीसाठी हे बंदर, गटारे, रस्ते व तटबंदीसह बांधले. त्यामुळे दळणवळण सुखरूप होऊ लागले. बऱ्याच लोकांना रोजगार मिळाला.

या बंदराला 'भाऊचा धक्का' म्हणून तमाम लोक ओळखू लागले. पण सरकारी कागदोपत्री मात्र हे बंदर लक्ष्मणजींचे बंदर म्हणून ओळखले जात होते. गव्हर्नरपदी सर जेम्स कारनॅक यांची नेमणूक झाल्यावर भाऊने सरकारकडे विनंतीवजा अर्ज केला, ''मी बांधलेल्या बंदरास गव्हर्नर कारनॅक यांचे नाव देण्याची परवानगी देण्यात यावी. तेव्हापासून ती जागा कारनॅक बंदर म्हणून प्रसिद्धीला आली. पण ''भाऊचा धक्का'' हे नाव जनतेच्या मुखात बसले होते. त्यानंतर भाऊंनी क्लेअर व क्लर्क बंदर अशी आणखी दोन बंदरे बांधली. ही सर्व बंदरे बांधण्यासाठी ८-९ लक्ष रूपये खर्च झाला. त्यावेळी शहरातील सर्व कचरा या बंदरांच्या खाडीत घालून ती भरून काढल्यामुळे हे काम त्यांना स्वस्त पडले. अन्यथा ही बंदरे बांधण्यासाठी त्यांना १८-२० लाख रूपये खर्च झाला असता. ही बंदरे मुंबईतील पहिली विकसित बंदरे. या बंदराच्या वखारीच्या भाड्याबद्दल व माल उतरवण्याच्या हक्काबद्दल वार्षिक सुमारे एक लाख रूपये त्यांना त्याकाळी मिळत होते. काही रोख तर; काही चांदीच्या स्वरूपात मिळत. आरमाराच्या बळावर इंग्रजांनी साम्राज्य उभारले असल्यामुळे अन्य वसाहतीप्रमाणे भारतातही बंदरांच्या, गोद्यांचा विकास करण्यास ईस्ट इंडिया कंपनीने तसेच १८५८ पासून इंग्रज सरकारने अग्रक्रम दिला. नेव्हल डॉकयार्ड १७३५ साली बांधला गेला. पण तो ड्रायडॉक होता. भाऊंनी सर्व प्रथम १८४१ साली १०-१२ बोटी आत येऊ शकतील असा 'वेट डॉक' बांधला. ही कामे लक्षावधी रुपयांची होती. त्यायोगाने भाऊंना विपुल द्रव्य मिळाले. पण विपुल द्रव्य मिळविताना जे धोके उद्‌भवतात त्या धोक्याच्या कटकटीत भाऊ सापडले. वेळोवेळी बदलत गेलेले लीज करार, वाढीव बांधकाम, सरकारी कर्ज, त्यावरील चक्रवाढ व्याज, कर्जाची परतफेड अशा चक्रव्यूहात ते अडकले होते. कायद्याच्या कचाट्यातून भाऊ सुटला; पण कॅप्टन रसेलला मात्र नोकरीतून बडतर्फ केले गेले.

गन फॅक्टरीत नोकरीत असताना कॅप्टर रसेल हा भाऊंचा बॉस होता. पण नंतर तो जिवलग मित्र झाला. त्यावेळी भाऊ आणि रसेल ही जोडगोळीच होती. रसेलचा अपभ्रंश रसूल आहे. कालांतराने सर्वजण भाऊंना 'भाऊ रसूल'' म्हणूनच ओळखू लागले. 'भाऊ रसूल'' हा शब्दप्रयोग रूढ असल्याने रसूल हे भाऊचे आडनाव असावे असा समज रूढ होतो. भाऊ रसूल हे ठाकूरद्वारच्या काळाराम मंदिराचे पहिले मॅनेजिंग ट्रस्टी होते. भाऊच्या धक्क्याचे शिल्पकार असलेल्या लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य उर्फ 'भाऊ रसूल' यांचे १९ ऑक्टोबर १८५८ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची सर्व मालमत्ता बंदरांसहीत त्यांचे एकुलते एक पुत्र रामचंद्र लक्ष्मणजी यांच्याकडे आली. रामचंद्र लक्ष्मणजी हे कस्टम्समध्ये असिस्टंट कलेक्टर या हुद्यावर होते. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील मीरे, भाईंदर, घोडबंदर या गावांचे खोती हक्क राणी सरकारकडून घेतले होते. बंदरांची देखरेख भाऊ स्वतः करीत तसे रामचंद्र लक्ष्मणजी करत नव्हते. त्यावेळी मुंबईतल्या काही धनाढ्य, व्यापारी व प्रतिष्ठित मंडळींनी मुंबईचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ''एल्फिन्स्टन लँड अँड

प्रेस कंपनी'' काढली होती. रामचंद्र लक्ष्मणजींनी बंदरांच्या देखरेखीचे काम या कंपनीस दिले होते. ही कंपनी त्यांना दर तीन महिन्यांना २८ हजार रुपये हक्कापोटी देत होती.

१८६१ साल उजाडले. इंग्लंडमधील कापसाच्या गिरण्यांना अमेरिकेतून कापूस जायचा. तेथे त्याचे तलम धोतरजोड्यात रुपांतर होऊन त्या भारतात विकावयास येत असत. गुलामगिरी बंद करण्याच्या निमित्ताने अमेरिकेच्या उत्तरेकडील संस्थानांची दक्षिणेकडील संस्थानांशी लढाई सुरू झाली. त्यामुळे अमेरिकेतील कापूस इंग्लंडला जाईनासा झाला. त्यामुळे भारतात पिकलेल्या कापसाला एकदम इंग्लंडवरून मागणी येऊ लागली. मुंबईचे नशीब उघडले. हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत कापूस येऊ लागला. कापसाला खूप मागणी असे व किंमतसुद्धा चांगली मिळे. मुंबईत पैशाच्या प्रवाहाने व्यापारी लोकांना वेडे करून सोडले. मुंबईत जास्त कापूस गुजरातवरून येत असे. त्यावेळी टाऊन हॉल समोरील सर्व जागा मोकळी होती. तेथे कापसाच्या गठड्या ठेवत. त्याचबरोबर चर्चगेट जवळील मोकळ्या जागेत कापसाचा साठा केला जात असे. १८६४ मध्ये मुंबईतील कापसाच्या व्यापाऱ्यांची भरभराट शिगेला पोहोचली होती. कापसाची निर्यात चौपट झाली होती. तर कापसाचा भाव दसपट झाला होता. अमेरिकेतील यादवीने मुंबईच्या कापसाचा भाव वाढून श्रीमंतीचा महापूर आला होता. लोकांनी आपल्या घरातील गाद्या, उशा, तक्के, लोड जिथे जिथे कापूस मिळेल तो सारा इंग्लंडच्या मागणीत घातला. १८६१ ते १८६४ या काळात येथील धनिकांनी अमाप धन मिळविले व ते मुंबई घडविण्यासाठी खर्च केले. त्या ४-५ वर्षात जवळपास ७० ते ८० दशलक्ष स्टर्लींग पाऊंड कापसाच्या मोदबल्यात मुंबईत आले. १८६४ ला मुंबईत दणक्यात दिवाळी साजरी करण्यात आली. व्यापाऱ्यांनी 'अत्तराचे दिवे जाळणे' ही म्हण प्रत्यक्ष आचरणामध्ये आणली होती. या वैभवाच्या दिवाळीत ओव्हल मैदानावर फटाक्यांच्या आतषबाजीचा प्रयोग झाला होता. त्यासाठी मुंबईतल्या साऱ्या सरकारी, बिनसरकारी, काळ्या-गोऱ्या प्रतिष्ठीत नागरिकांना पाचारण केले होते. बेसुमार पैशाच्या उलाढाली होत होत्या. घोड्यांना चांदीचे दागिने, तर घोड्याच्या बग्गीला जेथे पितळेचा वापर तेथे चांदी वापरून श्रीमंतीची प्रदर्शनं होत.

त्यावेळी प्रेमचंद रायचंद या शेअर ब्रोकरला लोक ''कापसाचा राजा'' म्हणत. पैसा हाती खेळू लागल्याने बॅकबेचा समुद्र हटविण्याच्या संकल्पाच्या कितीतरी कंपन्या निघाल्या होत्या. जनतेचा त्यावेळी प्रेमचंदवर इतका विश्वास होता की त्याने कंपनी काढली की मागचा पुढचा विचार न करता लोक त्या कंपनीचे शेअर्स खरेदी करीत. शेअर्सना तुफान मागणी असे. आज १०० रु., उद्या १२५ रु. तर परवा १५० रु. असे होत गेले. जे अल्पसंतुष्ट होते ते पैसा कमावून गप्प् बसले. लढाई आणखी काही वर्षे चालेल या अंदाजाने व्यापाऱ्यांनी साठवून ठेवलेल्या कापसाचे भाव १८६५ मध्ये अमेरिकेतील युद्ध थांबताच कोसळले. शेअर बाजारही आपटला. मुंबईतील व्यापारीवर्ग दिवाळखोरीच्या खड्ड्यात पडला. कापसाच्या व्यापारात अनेक धनिक रसातळाला गेले. भाऊच्या धक्क्याचे व्यवस्थापन पहाणाऱ्या व्यापारी, शेठ, सावकार आणि प्रतिष्ठीत मंडळींच्या 'एल्फिन्स्टन लँड अँड प्रेस कंपनी'' वर अनेक लोक दिवाळखोर झाल्यामुळे गंडांतर आले. सरकारने ही कंपनी ताब्यात घेतली. ''पोर्ट ट्रस्ट'' ची स्थापना केली. रामचंद्र लक्ष्मणजी यांनी सर्वप्रथम आपली कारनॅक बंदर व क्लेअर बंदर ही दोन बंदरे पोर्ट ट्रस्टच्या हवाली केली. मुंबईत पायर बंदर, आर्थर बंदर, कासारा बंदर, मॅलेट बंदर, चिंच बंदर, वाडी बंदर अशी अनेक लहान-मोठी बंदरे कार्यरत होती. कालांतराने मुंबईतील सर्व बंदरे पोर्ट ट्रस्टच्या व्यवस्थापनाखाली आली.

या रामचंद्र लक्ष्मणजींच्या हातून एक घोडचूक झाली आणि भाऊ रसूलांच्या मालमत्तेला भले मोठे खिंडार पडले. रामचंद्र लक्ष्मणजींचे 'आत्माराम माधवजी' नावाचे चुलत बंधू होते. ठाकूरद्वारचा सरकारी तबेला एकेकाळी त्यांच्या मालकीचा होता. हे जरी चुलतभाऊ होते तरी सख्ख्यासारखे एकत्रच रहात होते. मुंबई सरकारच्या माझगाव येथील जागेत दारूगोळ्याचा व शस्त्रास्त्रांचा प्रचंड मोठा साठा ठेवलेला होता. ती जागा 'गन पावडर वर्क्स' नावाने ओळखली जायची. कापसाचा भूकंप होण्यापूर्वी आत्माराम माधवजी तेथे नोकरी करायचे. सैन्याच्या सोयीसाठी दारूगोळा निर्मिती व शस्त्रास्त्रांचा साठा अन्यत्र हलवून सरकारने माझगावची जागा विकायला काढली. आत्माराम माधवजींना ही बातमी लागली.

त्यांनी नोकरी सोडली व एका गृहस्थाच्या भागीत ती जमीन ८ लाखाला विकत घेतली व ताबडतोब शेअर ब्रोकर असलेल्या प्रेमचंद रायचंदला ४० लाखांना विकली. प्रेमचंद पक्का व्यापारी. त्याने ती जमीन विकसित करण्यासाठी लिमिटेड कंपनी काढली. प्रवर्तक प्रेमचंद, आत्माराम माधवजी, ख्रिश्चन डॉक्टर. प्रेमचंदवरील लोकांच्या विश्वासामुळे या त्रिकुटाने काढलेल्या कंपनीचे शेअर्स हातोहात खपले. मग काय प्रेमचंद निरनिराळ्या कंपन्या काढू लागला. आत्माराम माधवजी त्याला सामील झाले. या धामधुमीत मुंबई सरकारने कायद्यात बदल करून स्थावर जंगम मालमत्तेच्या तारणाखेरीज, प्रतिष्ठीत व्यक्तीच्या फक्त हमीवर बँकेतून कर्ज घेण्याची सवलत ठेवली. प्रेमचंद आणि कंपनीने या सवलतीचा फायदा उचलला. आत्माराम माधवजींना शेअर्स मॅनिआमुळे हाव सुटली. त्यांना त्याकाळी ९९ लाख रुपये मिळाले होते. पण त्यांना कोट्याधीश व्हायचे होते. ही मत्ता सर्व कागदीच! १८६५ साली युद्ध थांबले. शेअर्स गडगडले. आत्माराम माधवजींची मत्ता व अब्रू धोक्यात आली. रामचंद्र लक्ष्मणजी त्यांना जामीनदार होते. रामचंद्र लक्ष्मणजींनी आपल्या बंदरांचे अर्धे हक्क ११ लाख रुपयांच्या मोबदल्यात सरकारला परत केले. तर अर्धे हक्क गहाण ठेवून त्यावर ६ लाख रुपये कर्ज घेतले व हे सर्व पैसे आत्माराम माधवजींच्या कर्जफेडीसाठी दिले. आत्माराम माधवजी बचावले. पण काही वर्षातच प्रथम रामचंद्र लक्ष्मणजी, नंतर आत्माराम माधवजी कालवश झाले. रामचंद्र लक्ष्मणजींच्या एकुलत्या एका मुलाला  करावा लागला ठणठणपाळ - जय गोपाळ! काही वर्षांनी बंदराचे गहाण ठेवलेले अर्धे हक्क रामचंद्र लक्ष्मणजींच्या मुलाने, विनायक रामचंद्र लक्ष्मणजींनी कावसजी जहांगिरला विकले. हे विनायक रामचंद्र लक्ष्मणजी मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाल्यावर पहिल्या तुकडीचे नामनियुक्त नगरपिता होते. भाऊने स्वखर्चाने धक्का बांधला म्हणून ईस्टइंडिया कंपनीने धक्क्याचा वापर व माल चढविण्या-उतरविण्यासाठी कराराप्रमाणे ५० वर्षांचा मक्ता मोफत उपभोगण्यास दिला होता. जवळपास २८-३० वर्षे कारनॅक बंदर व क्लेअर बंदर ही दोन बंदरे अजिंक्य कुटुंबाच्या ताब्यात होती. या बंदराचा विस्तारीत भाग १९१० साली पंचम जॉर्जच्या काकांनी हिंदुस्थानला भेट दिली त्या स्मृत्यर्थ बांधलेला आहे. मूळचा भाऊचा जुना धक्का इंदिरा गोदीच्या पूर्वेस आहे. नवीन विस्तारीत बंदराला भाऊंचेच नाव दिले. याचं कारण ते नाव जनतेच्या मुखात बसले होते. त्यावेळी भाऊंचे नातू विनायक रामचंद्र लक्ष्मणजी हे हयात होते. त्यावेळेचे मुंबईतील अनेक प्रतिष्ठीत मान्यवर नागरिक भाऊंच्या कुटुंबाला व विनायकरावांना व्यक्तिशः ओळखत होते. त्यापैकी काही मंडळींनी, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी इत्यादींनी तर भाऊंना प्रत्यक्ष पाहिले होते. ह्या मंडळींनी नवीन विस्तारीत बंदराला भाऊंचेच नाव देण्याबाबत पोर्ट ट्रस्टच्या कार्यकारी मंडळावर दबाव आणला व भाऊंच्या स्मरणार्थ नवीन विस्तारीत बंदरला 'भाऊचा धक्का' हेच नाव देण्यात आले. तर नवा अद्ययावत धक्का १९६९ साली बांधण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिकेने देखील भाऊंच्या स्मरणार्थ कारनॅक बंदरकडे जाणाऱ्या रस्त्यामधील चौकाचे 'भाऊ लक्ष्मण अजिंक्य चौक' असे नामकरण केले आहे. भाऊच्या धक्क्याची ऐतिहासिक कागदपत्रे महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागात उपलब्ध आहेत.




गेल्या पिढीतील कोकणी माणसांचे भाऊच्या धक्क्याशी अतूट नाते होते. कथा, कादंबरी, नाटके, तमाशा सर्वात भाऊच्या धक्क्याचा संदर्भ असायचा. मुंबईतून निघताना श्रीवर्धन ते गोव्यापर्यंतच्या सर्व माणसांचे दर्शन इथे एकत्र होत असे. याच धक्क्यावरून मराठी माणसाने आपल्या आप्तांची वाट पाहिली, अनेकांना प्रेमळ निरोप दिले. मुंबईच्या उभारणीत मोलाचा हातभार लावणाऱ्या मुंबईच्या एका शिल्पकाराचे 'भाऊचा धक्का' हे जणू एक स्मारकच आहे.

*

व्यक्तिचित्र

# अशी पाखरे येती

**★ सौ. अलका मिनल तळपदे ★**

मानवाचे जीवन हा एक प्रवासच असतो. जसा रेलगाडीचा दूरचा प्रवास. फरक एवढाच की रेलगाडीचा प्रवास आपण ३-४ महिने अगोदर प्लॅनिंग व बुकींग करून करत असतो, पण आयुष्याचा प्रवास मात्र आपल्या जन्माबरोबर प्लॅनिंग-बुकिंगसह आपल्या ललाटावर न दिसणाऱ्या शाईने लिहून घेऊनच येत असतो. त्यानुसार मग कधी आवडीने तर कधी मनाविरुद्ध आपला हा प्रवास चालू रहातो. ह्या प्रवासात अनेक स्टेशन्स येत जात असतात, अनेक सहप्रवासी भेटत असतात. काहींचा सहवास दीर्घकालाचा असतो तर काहींचा अल्प. तरी त्या सर्वांची नोंद आपल्या मेमरी-कार्डात होत असते. मग कधीकाळी एखादं बटण चुकून दाबले जाते आणि मेमरी कार्डात बंदिस्त असलेलं एखादं पाखरू फडफडू लागते बाहेर यायला.

आज असंच झाले. रद्दीवाल्याला साचलेली पेपरची रद्दी घेऊन जायला बोलावले होते. पेपरबरोबर साचलेले प्लॅस्टीकचे डबे व बाटल्याही काढल्या होत्या. त्यातल्यां दोन काचेच्या बाटल्या बाजूला काढत तो म्हणाला, ''बाई! आम्ही फक्त प्लॅस्टीक घेतो. ह्या काचेच्या बाटल्या ठेऊन घ्या.''

असं म्हणत पेपर व प्लॅस्टीकचे वजन करून पैसे देऊन निघून गेला. पण त्याने बाजूला काढलेल्या काचेच्या बाटल्या पहात असताना माझ्या डोळ्यासमोर उभं राहिले ५०-६० वर्षापूर्वीचे खार...

गर्द झाडीत विसावलेली कौलारु लहान घरे, भोवताली मोठे अंगण, अंगणात फोफावलेली विविध फळा-फुलांची झाडे, मिणमिणत्या दिव्यांच्या प्रकाशात शांत सुमसान वाटणारे अरुंद रस्ते, आणि सर्व वाड्यांतून फुललेल्या रातराणीचा दरवळलेला मंद सुगंध. आजही हे सर्व मनाला भावून जाते. त्याकाळी सकाळ कोंबड्याच्या आरवण्याने होत असे. आज कोंबड्याची जागा मोबाईल कंपन्यांनी घेतली आहे आणि त्यांच्या आरवण्याला इलेक्ट्रॉनिक भाषेत 'वेक अप कॉल' असे म्हणतात. बिचारा कोंबडा, गेली हजारो वर्षे हे काम फुकटच करत होता आणि ह्याच कामासाठी ह्या मोबाईल कंपन्या हजारो कमावत असतात.

असो! त्याकाळी सकाळ झाली की ओटीवर सहप्रवाशांची ये-जा चालू व्हायची. दूधवाला, पेपरवाला, इस्त्रीवाला, भाजीवाला, अंडीवाला असे अनेक. ह्यातलीच एक होती बाटलीवाली, जी आता त्या दोन काचेच्या बाटलीतून डोकावत होती. सुरकुतल्या चेहऱ्याची, हातापायांच्या काड्या, पाठीला टेकलेलं पोट, चीपाड शरीर, त्याला गुंडाळलेली जुनाट साडी आणि डोक्यावरून पदर अशी ही कधी बाटलीवाली, कधी अवसवाली तर कधी 'शनिवार वाडाई' होऊन येत असे. त्याकाळी श्रावण महिन्यात प्रत्येक शनिवारी एका थाळ्यात मूठभर तांदूळ, डाळ व वाटीत थोडं तेल आणि त्यात पैसा असे काढून ते घरातल्या सर्वांच्या डोक्यावरून ओवाळून, त्या तेलात चेहरा पाहून मग ते दान त्या 'शनिवार वाढा' ओरडत येणाऱ्या बाईला दिले जायचे.

खरं सांगायचे म्हणजे आजच्या पिढीला 'फालतूगिरी' वाटणारी ही गोष्ट कधीकाळी मीही किती श्रद्धेने करीत होते ह्याचं आज मलाही आश्चर्य वाटते. आज पाठी वळून पहाता मनात येतं, घराघरातून

## वात्रटिका

### अभ्यासाची तऱ्हा :

राजू आपला अभ्यास करतो टी.व्ही. पाहत- पाहत,
वीजकपात असली तरी फरक नाही पडत.
इनव्हर्टरवर टी.व्ही. तेवढा चालू ठेवा म्हणतो,
मेणबत्तीच्या उजेडात मग अभ्यास मजेत करतो.

**-डॉ. सुमन नवलकर**

---

मिळणाऱ्या मूठभर डाळ-तांदूळ व वाटीभर तेलाने काय होत असेल? कदाचित त्यातून २-४ दिवसांची भूक भागत असेल. पण त्यावेळी आपल्यालाही कधी तिला जास्त द्यावे असे वाटले नाही आणि तिनेही कधी जास्त मागीतले नाही. दर अमावस्येला येऊन २५ पैसे तर कधी ५० पैसे घेऊन जात असे. मधल्यावारी कधीतरी गोणता घेऊन डबे-बाटल्या न्यायला यायची. तोही एक मोठा कार्यक्रम असायचा. तिच्यापुढे जमवलेल्या डबा-बाटल्यांची टोपली उपडी व्हायची. मग ती लहान-मोठ्या आकारावरून त्यांचे वर्गीकरण करीत असे. लहान १०-१२ बाटल्यांचे पंचवीस पैसे, मोठ्या बाटल्यांचे पन्नास पैसे आणि मोठ्या डब्याचा एक रुपया असा तिचा तीच हिशोब करायची आणि कमरेला खोचलेल्या चंचीतून २।। रुपये काढून द्यायची. त्यातही सासूबाई 'बारगेनींग' करून अडीचचे तीन रुपये करून मागायच्या. आज हास्यास्पद वाटणारी ही गोष्ट त्याकाळचे सत्य होतं आणि मुख्य म्हणजे ह्या व्यवहारात सासूबाई आणि बाटलीवाली दोघींनाही आनंद मिळायचा. कारण सासूबाई ५० पैसे जास्त मिळाल्याच्या आनंदात बाटलीवालीला जुनी साडी, दारच्या शेंगा, नारळ द्यायच्या. हे सर्व गोणत्यात कोंबूनही वाकडं तोंड करून म्हणायची, ''दोन दिस झाले, पोटात दानं नाही.'' ते ऐकून सासूबाईंना दया यायची. मग बाटलीवाली चपाती-भाजी खाऊन पोटभर आशीर्वाद देत निघून जायची. कित्येक वर्षे हा सहप्रवास काडीमात्र बदल न होता चालू होता. पुढे वयोमाने सासूबाईंनी सीट बदलली, आणि माझी बदली तिच्या समोरच्या सीटवर झाली. सासुबाईंचा वारसा मी काही महिने चालू ठेवला. पण एक दिवस तिच्या बरोबर एक लहान मुलगा आला. प्रत्येक डब्यावरची व बाटलीवरची लेबलं आवडीनं वाचत होता. मी विचारले -

''हा कोण?''

''माझ्या लेकाचा लेक.''

''शाळेत जात असेल नं?''

''जात व्हता, ह्याच महिन्यात सोडली.''

''का?''

''पोटाला भेटता भेटता मारामार. ह्याला कुठून शिकवू?''

''तुझा लेक काय करतो?''

''मेला तो, दारूनी समधं वाटोळं केलं.''

''आणि ह्याची आई?''

''ती कशापाई राहील मार खायला? आपलंच नाणं खोटं. लई आवड आहे ह्याला शिकायची. पण काय करू?''

''त्याला शाळेत जाऊ दे. मी देईन त्याला शिकण्यासाठी लागेल ते. आज हे शंभर ठेव.''

''नको! नको! एवढे काय करायचे? पन्नास पुरेत.''

''नाही घे! परत येशील तेव्हा हिशोब सांग.''

त्या दिवसापासून मी तिला डबे-बाटल्या फुकट, वर नातवाच्या शाळेसाठी पैसे देऊ लागले.

हा प्रवास काही महिने, वर्षे चालू राहिला, पण एकदा नेहमीप्रमाणे आली तेव्हा म्हणाली -

''डबे - बाटल्या नेते पण पैसे नको.''

''का ग?''

''सून येऊन लेकाला घेऊन गेली.''

म्हातारीच्या सुकलेल्या डोळ्यात गाळायला अश्रूही शिल्लक नव्हते. पण मला त्यात प्रामाणिकपणाची चमक दिसली. आमचा सहप्रवास असाच चालू होता. बऱ्याच दिवसांनी आली तर उजवा हात प्लॅस्टरमध्ये होता. डाव्या हाताने कसाबसा गोणता ओढत पाय रेटत आली. मी विचारले -

''काय गं! काय झालं?''

''लेकानं मारलं. आता बसलाय जेलात.''

हे सांगताना म्हातारीच्या चेहऱ्यावरची एकही सुरकुती हलली नाही पण तिच्या त्या निर्विकार मुद्रेने मला बाकी गदगदून हलवले. माझे हात नकळत

जोडले गेले आणि तिच्यासाठी दुआ मागून गेले.

त्यानंतर बरेच महिने ती आली नाही. माझं मन मला खाऊ लागले. माझ्या प्रार्थनेचा वेगळाच अर्थ देवानं घेतला तर नसेल? म्हातारी मेली तर नसेल?

म्हणतात नं! मन चिंती ते वैरी न चिंती. पण बऱ्याच महिन्यांनी ती आली. स्वच्छ नवीन साडी नेसून. डोळ्याला चष्मा होता. मी विचारले -

''काय गं! कुठे होतीस?''

''दोनी डोळ्यांचे आपरेसन केलं. लेकाचा लेक आलाय नवं, तेनीच मोफत आपरेसन शिबिरात नेलं व्हतं. सून बी आली. लई ग्वाड पोर हाय, संभाळतो मलापन.''

''आता काय करतो?''

''१० वीची परीकसा पास झाला. म्हनला अगूदर ताईंना पेढा नेऊन दे. घ्या, तुमच्यामुळं आजचा दिस दिसला मला.''

एवढ्या वर्षांच्या सहप्रवासात आज प्रथमच मला तिच्या तोंडावर आनंद दिसत होता. मी नकळत हात जोडले आणि देवाला म्हणाले -

''देवा! हा आनंद हिच्या तोंडावर सदैव राहू दे.''

त्यादिवशी हसऱ्या चेहऱ्याने ती जी गेली ती परत कधीच आली नाही. कदाचित आमचा सहप्रवास संपला होता. एका अनोळखी स्टेशनवर ती उतरून गेली होती.

आज बरीच स्टेशनं मागे सुटली आहेत. थ्रो अवे चं प्लॅस्टीक युग सुरू झालंय. माझी ती बाटलीवाली आणि तिची ती 'बाटली बायेऽऽऽ' अशी हाक दोन्ही इतिहास जमा झाली असली तरी कधी कुठे काचेची बाटली दिसली की ती आठवते आणि तिच्याबरोबर आठवतात गाण्याचे ते बोल...

''अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती.''

✳

## वात्रटिका

### भांडण

खिडकी होती नाजूकशी, दरवाजा होता आडदांड,
खिडकी वाऱ्यावर झुलायची, दरवाजा आपटायचा धाडधाड.
खिडकी आणि दरवाजाचं आपापसातही भांडण,
वाऱ्यालाच ठाऊक त्यांच्या भांडणाचं कारण.

**-डॉ. सुमन नवलकर**

---

## ।। अहं ब्रह्मासी ।।

मीच होतो देणाऱ्याचे हात हजार, अन काढून घेतो मुखीचा घास ही,
होऊन महाप्रलयंकारी फक्त एकच लाट त्सुनामि।। अहं ब्रह्मास्मि।।
मीच मरतो नित्य अन जन्मतो पुन्हा पुन्हा,
उत्तर ही माझे, प्रश्नही माझाच, ''कोहं? कोहं? ।।अहं ब्रह्मास्मि।।
कधी होतो बाबा आमटे, कधी मदर तेरेसा
घेतो सेवा करून मीच माझी, होऊन मीच दीनदु:खी
आहे पूर्व नियोजित आरंभ विश्वाचा, अन् अंतही.
तरीही तुझ्या वेड्या मनाला वाटतेच ना? की तू मनावर घेतलेस म्हणूनच सर्व घडले.
विसरलास का? माझे ब्रह्मवाक्य ''कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेशु कदाचन.''
तुझ्या स्व:कर्तृत्वावर एकदाच निशंकपणे म्हण, ''श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु''
नाद झंकारेल अंतर्यामी।। अहं ब्रह्मास्मि।।

**-अरविंद प्र. धुरंधर**

लेख

माणूस म्हणून

# कॉम्प्लेक्स

**★ सुमन नवलकर ★**

एरव्ही तर शाळेतून आलं, गृहपाठ केला, बाकी अभ्यास झाला की खेळणं 'मस्ट' आणि 'मस्त'! तास-दीड तास खेळलं की अगदी ताजं-तवानं. पण परीक्षा असली की आई खेळायला पाठवत नसे. कुठे पडलं, लागलं तर परीक्षा बुडेल. मेहनतीवर पाणी. मग अशा वेळी ताजंतवानं व्हायला काय करायचं? गॅलरीत जाऊन उभं राहायचं. तेव्हापासूनची ही रेवतीची सवय आहे ती आजपर्यंत. फक्त लग्न झाल्यावर जन्मापासूनचा सवयीचा देखावा बदलला आणि नवं दृश्य डोळ्यांपुढे रेखलं गेलं. मग नव्या माणसांप्रमाणे या नव्या दृश्याचीही तिने सवय लावून घेतली. कपडे सुकत घालताना, सुकलेले कपडे गोळा करताना, कंटाळा आला की विरंगुळा म्हणून, कधी काही जिव्हारी लागलं तर मन रिझवायला, उन्हाळ्यात वाऱ्याची झुळूक अंगावर घेण्यासाठी आणि प्रथमेशच्या जन्मानंतर त्याला कडेवर घेऊन बाहेरच्या गमती-जमती दाखवताना बाहेरचं दृश्य तिला अगदी सुपरिचित होऊन गेलं. शाळेत शिकवून थकून आल्यावर थोडा वेळ गॅलरीत उभं राहिलं की बरं वाटतं तिला.

तसं पाहिलं तर गॅलरीतून दिसणारं दृश्य काही फारसं मोहून टाकणारं वगैरे नाहीये. डावीकडे बैठ्या चाळी, पलीकडे झोपड्या आणि त्या पलीकडे उघडा बोडका डोंगर आणि उजवीकडे दूरवर दिसणारी रेल्वेलाईन. पण यातूनही रेवतीला चंदनाची शीतलता आणि रजईची ऊब अशा परस्परविरोधी संवेदना मिळत राहिल्या. सकाळी उठल्या-उठल्या गॅलरीत यावं, तर खालच्या बैठ्या चाळीच्या नळावर पाण्यासाठी रांग लागलेली दिसे. आधी रांगेत फक्त बालद्या हंडेच दिसत. पण पाणी आलं रे आलं की एकेका बालदीशेजारी, एकेका हंड्याशेजारी एकेक व्यक्ती कधी येऊन उभी राहायची हे रेवतीला समजायचं नाही. मग कधी सुरळीतपणे पाणी भरणं चालू राहायचं, तर कधी कचाकचा भांडल्याचे आवाज यायचे. माणसं हमरी-तुमरीवर यायची. ते पाहणं नकोसं वाटून आत वळताना रेवतीच्या मनात यायचं, ''किती सुखी आहे मी. घरात नळांना चोवीस तास पाणी आहे. मनाला येईल तेव्हा आणि लागेल तितका पाण्याचा वापर सहज-सुलभ आहे. पाण्यासाठी रांगेत उभं राहण्यात, पाणी भरण्यात या माणसांचा बहुमोल वेळ फुकट जातोय. शरीरातली ताकद खर्ची पडतेय. आपण त्यांच्या जागी असतो तर नोकरी कशी केली असती आपण? प्रथमेशचा अभ्यास कधी घेतला असता?''

शाळेत शिक्षिका आहे रेवती. त्यामुळे घरासाठी बराच वेळ देऊ शकते ती. शिवाय स्वावलंबी असल्याचं समाधान मिळतं ते वेगळंच. या नोकरीत रजाही भरपूर. कधी सुट्टीच्या दिवशी दुपारीही गॅलरीत जाणं होतं. अशा वेळी सकाळी पाण्याच्या रांगेत कचाकचा भांडणाऱ्या बायका कोणाच्या ना कोणाच्या दारात बसून गप्पा मारताना दिसतात. 'कसा काय यांना इतका वेळ मिळतो? कसं काही यांना चांगलं करावंसं वाटत नाही?' रेवतीच्या मनात प्रश्न उमटतात. दुपारी शाळेतून आली की वह्या तपासणं, परीक्षेचे पेपर तपासणं, प्रथमेशचा अभ्यास घेणं असा सगळ्यातून वाचलेल्या वेळातही रेवतीचे काही ना काही तरी उद्योग चालूच असतात. कधी नवा पदार्थ बनवणं, इस्त्री, अधिकची साफसफाई याव्यतिरिक्त वाचनाची अतिशय आवड आहे तिला. शाळेतून येता-येता वाचनालयातून बदलून आणलेलं पुस्तक कधी वाचतेयसं होऊन जातं तिला. संध्याकाळी गॅलरीतले

सुकलेले कपडे काढून आत नेताना या बैठ्या चाळी आणि पलीकडच्या झोपड्यांशी तुलनेत स्वतःचं आयुष्य खूप-खूप चांगलं वाटून रेवती अगदी तृप्त.

मग अचानक उजवीकडच्या रेल्वेलाईनच्या अलीकडच्या भल्या मोठ्या रिकाम्या प्लॉटमध्ये बांधकाम सुरू झालं. पाहता-पाहता तेवीस मजल्यांचं टोलेजंग कॉम्प्लेक्स उभं राहिलं. वीज, अंतर्गत सुविधा, पाणी, सुशोभीकरण असं सगळं होऊन दोन-तीन वर्षात माणसं राहायला आली.

ही माणसं कोण-कशी हे कधी समजायचंच नाही. ती गाड्यांमधून इमारतीत शिरत आणि गाड्यांमधून बाहेर पडत. त्यांचे फ्लॅट ए.सी., गाड्या ए.सी., सगळं कसं काचबंद. त्यांचे कपडे क्वचितच बाहेर सुकत. पण ते सुकवायचं, आत घेऊन जायचं काम नोकर माणसंच करत. या कॉम्प्लेक्सचं स्वतःचं जिम, स्वतःचा स्विमिंगपूल, प्लेग्राऊंड, गार्डन. त्यामुळे तिथली मुलं घेऊन तिथल्या आया पलीकडच्या सार्वजनिक बागेतही येत नसत.

या कॉम्प्लेक्समुळे पलीकडची रेल्वेलाईन दिसेनाशी झाली. पण तरीही गॅलरीत आलं की या काचबंद कॉम्प्लेक्सकडे रेवतीचं लक्ष जायचं. तिथल्या माणसांच्या आयुष्याशी स्वतःच्या कुटुंबाचं आयुष्य तुलनेत कोतं वाटून मन विषण्ण व्हायचं. हल्ली रेवती प्रसन्न राहीनाशी झाली होती. उदास राहायला लागली होती. नवरे गाड्यांमधून गेल्यावर बायका आणि मुलं तरी दिसावी ना जाता येता? या प्रश्नावर उत्तरही लगेचच सापडलं होतं तिला, की बायकांच्याही स्वतंत्र गाड्या असणार आणि मुलंही तिसऱ्या 'शोफर ड्रिव्हन' कारमधून जात असणार. स्वैंपाक, भांडी, जमीन, कपडे, इस्त्री, बाजारहाट सगळी कामं करायला नोकर माणसं असणार. नोकऱ्या धंद्यांमधून मोकळी झाल्यावर सुट्टीच्या दिवशी किंवा मोठी सुट्टी घेतल्यावर ही माणसं काय बरं करत असतील? घरातलं कुठलंच काम करणं नाही, म्हटल्यावर वेळ कसा घालवत असतील?

हं! त्यांच्या किटी पार्टीज, क्लबमध्ये जाऊन ब्रीज-रमी, जिममध्ये जाऊन स्लीम होणं, चॅट, फेसबुक, व्हिडिओचॅट अशा कशा-कशात घालवत असणार त्या वेळ. त्यांच्या पर्सेसमध्ये निरनिराळी क्रेडिट-डेबिट कार्डस् अडकवण्यासाठी वेगळी वॉलेटस् असतील. त्या शॉपिंग करून आल्यावर आणलेल्या वस्तू जागच्या जागी ठेवायलाही नोकरमाणसं असतील त्यांच्याकडे.

स्वतःच केलेलं जेवणही मग रेवतीला गोड लागेना. शाळेत मुलांना, घरी प्रथमेशला शिकवताना मन भरकटायला लागलं. राघवशी ऑफिसच्या आणि तिच्या शाळेच्या गप्पा-टप्पा गंमती असं संभाषण मिथ्या वाटू लागलं. आलटून पालटून त्याच साड्या, ड्रेसेस घालताना मनावर ओरखडे यायला लागले. गॅलरीत गेलं की लक्ष उजवीकडे जायचं. मग काय एके दिवशी राघवला सांगून, माणसं बोलावून तिने गॅलरी कव्हर करून गॅलरीची स्टोअर रूमच करून घेतली. पाठल्या गॅलरीत कपडे सुकत घालायला सुरुवात केली. हळुहळू रेवती शांत झाली. पूर्वीसारखी हसू बोलू लागली. स्वाद घेत जेवू खाऊ लागली. पण आता पाठच्या बाजूलाही पाया खणायचं काम सुरू झालंय. तिथेही मोठं कॉम्प्लेक्स उभं राहणार आहे म्हणतात, मग काय?

*

## फुलांचा महिमा

फुलामध्ये फूल नाजूक बकुळीचे।
काय दिसते बाई मोतिया रंगाचे।
मधुर वास त्याचा दिसते मौजेचे।
फुलामध्ये फूल नाजूक शेवंतीचे।
सोनेरी पिवळ्या रंगाचे।
हजार नाजूक पाकळ्यांचे।
फुलामध्ये फूल रंगिबेरंगी गुलाबाचे।
राजा म्हणूनी गुलकंद गोड पाकळ्यांचे।
माळ्याच्या बागेत हिरवा नाजूक दवणा।
धुंद करी पिवळा केवडा।
जाई जुई मोगरा मालती ललना।
रातराणी धुंद करी प्रेमिकांना।
फुलामध्ये फूल नाजूक बकुळीचे।।

**-सौ. इना तळपदे**

लेख

# मनाची दिवाळी

**✶ उज्ज्वल र. ब्रह्मांडकर ✶**

सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा! दिवाळी म्हटली की प्रथम आठवते ती रोषणाई. दीपावली म्हणजेच दीपांची 'आवली' किंवा 'रांग' पूर्वी पणत्यांनी घर सजवलं जाई. आता हरतऱ्हेच्या इलेक्ट्रीकच्या माळांनी घरात रोषणाई केली जाते.

दिवाळीच्या स्वागताच्या तयारीची सुरुवात होते ती घराच्या साफसफाईपासून. घरात जमलेली जळमटं, धूळ शोधून शोधून साफ केली जाते. शक्य असेल तिथं साबण, पाणी वापरून सर्व वस्तू किंवा घराचे दरवाजे, खिडक्या स्वच्छ केल्या जातात. पूर्वी पितळी किंवा चांदीच्या समया, लामणदिवे, पितळेची तसेच चांदीची निरांजनं, कंदिल, फाणस सगळंच स्वच्छ केलं जायचं. त्यावरची काजळीची पुटं काळजीपूर्वक काढून टाकली जात. दिवली अमावस्येच्या आधीच दीपपूजनाचीही तयारी केली जायची. जे दिवे आपल्याला प्रकाश देतात, अंधाराला दूर ठेवतात त्या दिव्यांची आवर्जून पूजा करणं, त्यांचा मान ठेवणं ही कल्पनाच किती सुयोग्य व छान आहे. आताही विजेचे दिवे, बल्ब, ट्यूब्ज स्वच्छ केल्या जातात व त्यांनाही फुलांचे छोटे हार किंवा गजरे घातले जातात.

जीर्ण कपडे कपाटातून काढून टाकणं व दिवाळीसाठी नवे कपडे घेणं, नवे दागिने घेणं, लक्ष्मीपूजन करणं हे दिवाळीचं आपल्या व्यक्तिगत आयुष्यामधील प्रतीक. आता शोभिवंत कंदिलांनी, नवीन पडद्यांनी, विजेच्या तऱ्हेतऱ्हेच्या माळांनी घर सजविलं जातं. उत्तमोत्तम रांगोळ्या प्रवेशद्वारासमोर घातल्या जातात. हे सगळं करून व बघून मन प्रसन्न ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. पण हे सगळं फक्त दिवाळी पुरतंच होतं. त्यानंतर घर पुन्हा ''जैसे थे'' परिस्थितीत येतं. नवीन कपडे, पडदे, दिव्यांच्या माळा कपाटात बंदिस्त होतात व पुढच्या सणाची किंवा दिवाळीची वाट पाहत राहतात.

पण ज्या मनाला प्रसन्न ठेवण्यासाठी आपण हे सगळं करतो, त्या मनाचं काय हो? ते तर आपण कधीच साफ करीत नाही. त्यात खूप घाण कायमची बसलेली असते. दुसऱ्याबद्दलचा राग, तिरस्कार, हेवा, द्वेष, दुर्गुण, दुसऱ्याच्या संपत्तीचा हव्यास यांची जळमटं नेहमीच मनात ठाण मांडून बसलेली असतात. आपणच केलेल्या आपल्या मानापमानाच्या कल्पना आपण कधीच मोडीत काढत नाही. कुठच्यातरी, तेव्हा खूप मोठ्या वाटलेल्या कारणाचा दुसऱ्याबद्दलचा राग मनात मूळ धरून बसतो. बागेचा माळी किंवा आपणही सुंदर फुलांच्या कुंडीत वाढू पाहणारं तण उपटून झाडाभोवतालची माती त्या झाडाच्या निकोप वाढीसाठी नित्यनेमानं साफ करीत असतो. मात्र हे रागाचं तण आपण मनात खुशाल वाढू देतो. त्याची पाळंमुळं मनात खूप खोलवर रुजत जातात. त्याचा खूप मोठा वृक्ष फोफावतो व त्याला अत्यंत विषारी फळं लागतात. जेव्हा एखाद्याच्या मनातला हा वृक्ष खूपच मोठा होतो तेव्हा ही विषारी फळं फुटून त्यातल्या विद्वेषाच्या बिया दूरवर पसरतात व समाजावर त्याचे हिंसक परिणाम दिसू लागतात. वेळोवेळी जर ते तण उपटून फेकून दिलं तर परिसर नेहमीच स्वच्छ राहील. तीच गोष्ट हेव्याची. दुसऱ्याचा हवा करण्यापेक्षा दुसऱ्याशी निकोप स्पर्धा केली तर त्यातून स्वत:चीच प्रगती साधली जाईल ही गोष्ट कुणाच्या लक्षातच येत नाही. कारण आपण नेहमी दुसऱ्यावर वर्चस्व मिळविण्याच्या नादात असतो. दुसऱ्याच्या कर्तृत्वाच्या रेषा पुसण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वत:च्या कर्तृत्वाची रेघ नेहमी दोन्ही बाजूंनी खूप मोठी करण्याचा प्रयत्न करावा नी फक्त हे आणि हेच करावं. तरच स्वत:ची सर्वांगीण प्रगती

शक्य होते. मन जर आपण घासून पुसून लख्ख ठेवलं तरच त्यात चांगल्या, सुंदर विचारांची बैठक आणखीन खुलून दिसेल. मनात विश्वामधल्या सर्व वातावरणाचं, सुविचारांचं सुरेख प्रतिबिंब सतत पडेल. घराबरोबरच मनही चकाचक दिसेल आणि मन परोपकार, सहिष्णु वृत्ती, मानवता यांसारख्या लख्ख प्रकाश आसमंतात फैलावणाऱ्या दिव्यांनी सजवलं जाईल. समाजासाठीचं उत्तरदायित्व आपल्याला पार पाडता येईल. पन्नास वर्षांपूर्वीपासून घट्ट मैत्री असलेल्या एका मैत्रिणीनं मला कालपरवा जेव्हा सांगितलं की ती इतकी वर्षं सदोदित माझा हेवा करीत आलीय तेव्हा माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाहीच; पण मला तिची कीव आली. ही एवढी वर्षं तिनं जर स्वत:च्या प्रगतीचा मार्ग शोधण्यात खर्ची पाडली असती तर ती आयुष्यात समाधानी झाली असती.

शांत व समाधानी माणूसच कर्तृत्वाच्या नवनवीन पायऱ्या लीलया शोधून काढू शकतो. कारण त्याच्या मनात चांगल्या मार्गाचं प्रतिबिंब आपोआपच उमटत जातं व तो त्या प्रतिबिंबाबरहुकूम प्रत्यक्षात तो मार्ग अंमलात आणू शकतो. पुढच्या दिवाळीपर्यंत खूप वेळ आहे. आत्ताच मन चकचकीत करायला सुरुवात करूया व सतत करीत राहूया. तरच पुढच्या वर्षी घराबरोबरच मनाची दिवाळीसुद्धा सुरेख रीतीनं साजरी होईल.

*



लेख

# संहिता संपादन : स्वरूप आणि पथ्ये

**✶ मृदुला प्रभुराम जोशी ✶**

(मराठी अभ्यास परिषद, पुणे, यांच्यातर्फे आयोजित सत्त्वशीला सामंत स्मृतिव्याख्यान (पहिले पुष्प) पुणे, दि. २२ फेब्रुवारी २०१४, आपल्या वाचकांसाठी प्रकाशित करीत आहोत **-संपादक)**

सत्त्वशीला सामंत स्मृति-व्याख्यानासाठी आज आपण मला इथं बोलावलं आहे यासाठी मी आपले मन:पूर्वक आभार मानते. आपलं निमंत्रण हा मी माझा बहुमान समजते, कारण सत्त्वशीला ही माझी जीवश्च कंठश्च सखी तर होतीच पण अनेक वर्षं आम्ही दोघींनी पुस्तकांच्या संपादनाच्या क्षेत्रात जोडीनं काम केलं होतं, वेळोवेळी ह्या विषयावरचे एकमेकींचे विचार समजून घेतले होते आणि विचारांचं आदानप्रदानही केलेलं होतं. एका दृष्टीनं ती माझा मोठा आधार होती. काहीही अडचण आली की पटकन फोन उचलायचा, सत्त्वशीलाला आपली शंका विचारायची आणि तिनं त्याचं तत्काळ निरसन करायचं हा आमचा नेहमीचा परिपाठ होता. आता तिच्या नसण्यामुळे मला निराधार वाटतं ते एवढ्यासाठीच. आज तिला ह्या निमित्तानं श्रद्धांजली वाहण्याची संधी आपण मला देऊ केलीत याबद्दल मी आपली कृतज्ञ आहे.

आपण मला 'संहिता संपादनः स्वरूप आणि पथ्ये' या विषयावर बोलायला सांगितलं आहे. या विषयाचे वेगवेगळे पैलू आहेत हे आपल्यासारख्या जाणकार, अभ्यासू, चिकित्सक श्रोत्यांना सांगायला नकोच. एखादा वाचक पुस्तकावर धावती नजर टाकतो तेव्हा तो जर विचक्षण वाचक असेल तर त्याच्या लगेच लक्षात येतं की ह्या पुस्तकाचं सर्वांगीण संपादन झालं आहे की नाही. मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत पुस्तकाची मांडणी कशी आहे, पुस्तकाच्या वाचकाला आकर्षित करून घेण्यासाठी काही खास प्रयत्न केलेले आहेत का, मजकूर सुलभतेनं वाचता यावा असा टाइप निवडलेला आहे का, चित्रं, आकृत्या सुस्पष्ट आणि आकर्षक आहेत का अशा अनेक अंगांनी वाचक विचार करू शकतो आणि प्रथमदर्शनी मत बनवू शकतो आणि जर या सर्व प्रश्नांची उत्तरं समाधानकारक असतील तर तो उत्साहानं मजकुराच्या वाचनाकडे वळतो. थोडक्यात, पुस्तकाच्या निर्मितीत त्याच्या अंतरंगाइतकंच बहिरंगही महत्त्वाचं असतं आणि त्यासाठी लेखकाइतकाच संपादकही जबाबदार असतो. पण आज आपल्याला पुस्तकाच्या अंतरंगाविषयीच चर्चा करायची आहे, कारण अंतरंगाचा संबंध संहितेशी आणि तिच्या संपादनाशी असतो.

'संहिता म्हणजे काय? 'संपादन' म्हणजे काय? आणि 'संहितेचं संपादन' म्हणजे काय? अशा निरनिराळ्या प्रश्नांची उत्तरं यात शोधावी लागतील. आपण प्रामुख्यानं मराठी पुस्तकांविषयी बोलतो आहोत.

मी मराठी पुस्तकांच्या संपादनक्षेत्रात सुमारे पंचेचाळिसांहून जास्त वर्षं काम करत आहे. हा माझा दीर्घ अनुभव प्रामुख्यानं पॉप्युलर प्रकाशनात काम केल्यामुळे मिळालेला आहे. तिथेही मुख्यत: रामदास भटकळ यांच्याबरोबर आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना तो प्राप्त झालेला आहे. त्यामुळे ह्या दीर्घ अनुभवाचं सार असावं असं एक पुस्तक आम्ही दोघांनी मिळून लिहिलेलं आहे. त्याचं नाव आहे 'प्रकाशनाचे रीतिपुस्तक' म्हणजेच इंग्रजीत ज्याला 'मॅन्युअल ऑफ स्टाईल' असं म्हणतात ते. सर्वसामान्यपणे इंग्रजी प्रकाशनगृहांत किंवा वृत्तपत्रांच्या कार्यालयात अशी मॅन्युअल्स आवर्जुन वापरली जातात, परंतु मराठीत निदान अजूनपर्यंत तरी असं सर्वसमावेशक पुस्तक उपलब्ध झालेलं नाही. नुसतं शुद्धलेखन, नुसतं मुद्रितशोधन अशा विषयांवर मराठीत आजवर अनेकांनी पुस्तकं

लिहिली आहेत. माझे गुरू यशवंत एकनाथ धायगुडे यांचं 'मुद्रित-शोधन' किंवा मो. रा. वाळंबे यांचं अरुण फडके यांनी संपादित केलेलं 'मराठी - शुद्धलेखन - प्रदीप', सत्त्वशीला सामंत यांचं 'व्याकरणशुद्ध लेखनप्रणाली, द. न. गोखले यांचं 'शुद्धलेखनविवेक' तसंच अलिकडच्या काळात खूप उपयुक्त ठरलेला अरुण फडके यांचा 'मराठी लेखन-कोश' आणि 'शुद्धलेखन ठेवा खिशात' यांसारखी सुटसुटीत पुस्तकं ही कुठल्याही संपादकाच्या टेबलावरची आवश्यक गोष्ट ठरलेली आहे. शरद गोगटे, यास्मिन शेख, वसंत दावतर यांनी या यादीत अतिशय मोलाची भर टाकलेली आहे. परंतु तरीही लेखक, संपादक, मुद्रक आणि प्रकाशक या चौघांनाही एकाच वेळी, एकाच पुस्तकातून योग्य असं मार्गदर्शन मिळू शकेल असं पुस्तक अजून उपलब्ध झालेलं नाही. ही उणीव भरून काढण्याचा एक प्रयत्न आम्ही ह्या रीतिपुस्तकाच्या रूपानं करत आहोत.

'संहितेचं संपादन' या विषयाकडे वळण्यापूर्वी आपण स्वत:ला एक प्रश्न विचारला पाहिजे - संहितेचं संपादन करण्याची प्रकाशकांना गरज वाटते का? प्रकाशनगृहात प्रकाशकाव्यतिरिक्त केवळ पुस्तकांचं संपादन करण्यासाठी स्वतंत्रपणे संपादक नेमण्याची आवश्यकता पूर्वी कुणाला जाणवत होती का? आपला असा अनुभव आहे की बहुसंख्य प्रकाशकांकडे संपादक तर नसतोच, पण संपादन म्हणजे काय हेही त्यांना माहीत नसावं अशा पद्धतीनं पुस्तकं काढली जातात. पूर्वी सर्वसाधारणपणे अनुभव असाच असे की लेखकानं आपण लिहिलेल्या पुस्तकाचं हस्तलिखित प्रकाशकाकडे आणून दिलं की प्रकाशक ते तसंच्या तसं मुद्रकाच्या हाती सोपवत असे आणि मग पुस्तकाचा आकार कसा असावा, त्यासाठी टाइप कोणता वापरावा, मुखपृष्ठासाठी कोणतं चित्र घ्यावं असे निर्णय मुद्रकच घ्यायचा. कित्येक वेळा प्रकाशकानं ती संहिता वाचलेलीही नसायची आणि त्यामुळे कधीकधी अवघड परिस्थितीही निर्माण व्हायची. आज जरी इतकी परिस्थिती नसली तरी सरसकट सगळ्या मराठी प्रकाशकांकडे संपादक नोकरीवर ठेवले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अजूनही बहुतांश प्रकाशक 'संहितेचं संपादन' करून ते मुद्रकाकडे पाठवत नाहीत. त्याचं एक कारण म्हणजे 'संपादन कसं करावं' हे शिकवण्याच्या शाळा नाहीत. काम करताकरता अनुभवातून शिकण्याची ती बाब आहे असंच समजलं जातं. मी देखील अशीच शिकले. मौज, पॉप्युलर, राजहंस, मॅजेस्टिक अशांसारख्या काही मोजक्याच प्रकाशनांनी संपादक ह्या व्यक्तीला एक प्रतिष्ठा देऊन स्वत:चा दर्जा सांभाळलेला आहे.

आता आपण संहिता संपादनाकडे वळू या. संहिता संपादन या शब्दाचे दोन अर्थ आहेत. प्रा. वसंत दावतर यांनी लिहिलेलं 'संहिता समीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा' हे पुस्तक पाहिल्यावर संहितेचा एक अर्थ लक्षात आला. जुन्या पोथ्या आणि हस्तलिखितं यांची चिकित्सक आवृत्ती तयार करणं म्हणजे 'संहिता संपादन' - या संपादनात संपादकाला वेगवेगळी कौशल्यं वापरावी लागतात. गूढ लिपी किंवा सांकेतिक लिपी वाचणं आणि तिचा अर्थ लावणं, टिपा लिहिणं, हस्तलिखितावरून कालनिश्चिती करणं वगैरे भाग त्यात येतात. वसंत दावतरांनी ह्या प्रकारच्या संहिता संपादनाचा फार सूक्ष्म विचार त्यांच्या पुस्तकात केला आहे.

यापूर्वी अ. का. प्रियोळकर यांनी ह्या विषयावर विस्तृत लेखन केलं आहे आणि ते 'रघुनाथ पंडित विरचित दमयंती स्वयंवर' ह्या त्यांच्या ग्रंथात उपलब्ध आहे.

माझ्यापुढे असलेला दुसरा अर्थ म्हणजे आपण नेहमी जी पुस्तकं बघतो, वाचतो त्या पुस्तकांच्या संहितेचं संपादन. लेखकानं स्वत:हून आणून दिलेलं किंवा त्याच्याकडून मागवून घेतलेलं, मुद्दाम विषय देऊन लिहवून घेतलेलं असं हस्तलिखित प्रकाशकाकडे येतं आणि प्रकाशक आपल्या ध्येयधोरणात ते बसत असेल तर प्रकाशनासाठी स्वीकारतो. हे हस्तलिखित किंवा अलिकडच्या काळात कंप्यूटरवरची सॉफ्ट कॉपी म्हणजे पुस्तकाची संहिता. पूर्वी लेखक पुस्तकाचा मजकूर हाती लिहीत असत किंवा क्वचित टंकलिखित करून देत असत. कधी मुद्रित कात्रणांच्या स्वरूपातही पाठवत असत. वर्तमानपत्रांत लिहिलेल्या सदरांची कात्रणं जोडून अनेक पुस्तकं तयार झालेली आपल्याला माहीत आहेत. हस्तलिखित असो, टंकलिखित असो किंवा सॉफ्ट कॉपी असो, संहितेच्या संपादनाची गरज असतेच, कारण त्याशिवाय पुस्तकाला चांगला घाट येऊ शकत नाही.

संहितेच्या संपादनाला सुरुवात करण्यापूर्वी संपादकानं संहिता एकदा संपूर्ण वाचून काढावी लागते. याला 'फर्स्ट रीडिंग' असं म्हणतात. या पहिल्या वाचनामुळे संपादनात नेमकं काय केलं पाहिजे ते लक्षात येतं. संपादनाचं धोरण ठरवण्याच्या दृष्टीनं काही निर्णय घ्यावे लागतात. संहितेतील निवेदन हे बोली भाषेत ठेवावं की ग्रांथिक भाषेत ठेवावं ते ठरवावं लागतं. काही विशिष्ठ ग्रंथांसाठी शुद्धलेखन जुनं ठेवावं की नवीन हे ठरवावं लागतं. ह्या दोन्ही प्रकारांची उदाहरणं म्हणजे पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या गंगाधर गाडगीळांच्या 'लिलीचं फूल' ह्या कादंबरीत आधीच्या आवृत्तीत संपूर्ण निवेदन लेखी पद्धतीनं छापलं होतं (म्हणजे 'त्याने असे केले') परंतु नंतरच्या आवृत्तीत ते संपूर्ण बोली पद्धतीनं बदलण्यात आलं (म्हणजे 'त्यानं असं केलं'). त्याचप्रमाणे डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या 'भारतीय साहित्यशास्त्र' ह्या ग्रंथाचा विषय लक्षात घेतला तेव्हा त्यात जुनं शुद्धलेखन असणं आवश्यक वाटलं आणि त्यासाठी तज्ज्ञांची मदत घेऊन संपूर्ण पुस्तकाचं जुन्या शुद्धलेखनात रूपांतर करून घ्यावं लागलं. हे त्या त्या विशिष्ट पुस्तकाच्या प्रकृतीच्या दृष्टीनं आवश्यक वाटलं म्हणून अशा प्रकारे करण्यात आलं.

पहिल्या वाचनानंतर जे धोरणात्मक निर्णय घेतले जातात त्यात संपादकीय संस्कारांचं स्वरूपही ठरवलं जातं. हे संस्कार कोणत्या प्रकारचे असावेत आणि ते कितपत आवश्यक आहेत हे ठरवताना मजकुराचं स्वरूप, तसंच डोळ्यांसमोर असलेला वाचकवर्ग आणि मुद्रणप्रत तयार करण्यातील लेखकाचं कौशल्य या सर्व बाबी लक्षात घेतल्या जातात. त्याशिवाय लेखकाचा आणि प्रकाशकाचा झालेला पत्रव्यवहार, करारपत्र आणि हे हस्तलिखित यापूर्वी कुणा तज्ज्ञाला (एक्सपर्ट) दाखवलेलं असल्यास त्याचा अहवाल ह्या सर्व गोष्टी तपासून त्यात संपादनाला उपयुक्त असे काही मुद्दे असल्यास त्यांची नोंद करावी लागते.

मुद्रणप्रतीसाठी संपादनाला सुरुवात करण्यापूर्वी लेखकाकडून काही प्रश्नांचा खुलासा मागवून घ्यावा लागतो. संहितेत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याची आवश्यकता वाटल्यास आधी लेखकाची परवानगी घ्यावी लागते.

संपूर्ण मजकूर काळजीपूर्वक वाचून त्यात पृष्ठक्रमांक दिले आहेत किंवा नाही, एकाच प्रकारचं शुद्धलेखन वापरलं आहे किंवा नाही, ज्या शब्दांची वैकल्पिक रूपं आहेत तिथे सर्वत्र एकच रूप वापरलं आहे किंवा नाही, विरामचिन्हांचा उपयोग हा सर्वत्र एकाच पद्धतीनं केला आहे किंवा नाही असे सर्व तपशील नोंदवावेत म्हणजे मग संपादकीय कामाची रूपरेषा ठरवता येते. वैकल्पिक रूपांचं उदाहरण म्हणजे जर 'प्राध्यापक' हा शब्द वापरायचा असेल तर काही ठिकाणी नुसतं 'प्रा.' किंवा काही ठिकाणी संपूर्ण 'प्रध्यापक' तर काही ठिकाणी 'श्रीयुत' किंवा 'श्री.' असं लिहून लेखनाची घडी बिघडवली जाते. म्हणून ही रूपं सगळीकडे सारखीच आली पाहिजेत याचं भान ठेवावं लागतं.

संहितेच्या संपादनाचे दोन भाग पडतात. एक म्हणजे 'साहित्यिक संस्कार' ज्याला इंग्रजीत 'सब्स्टँटिव्ह एडिटिंग' (substantive Editing) म्हणतात आणि दुसरं म्हणजे 'तांत्रिक संस्कार' म्हणजेच ज्याला इंग्रजीत 'कॉपी एडिटिंग' (copy editing) असं म्हणतात. कुठल्याही संहितेचं ह्या दोन प्रकारांनी संपादन करावं लागतं.

सर्वसामान्यपणे आपण ज्याला 'संपादन' असं म्हणतो त्यात मजकुराचं पुनर्लेखन, पुनर्रचना किंवा विषय वेगळ्या प्रकारे मांडण्याच्या सूचना यांचा समावेश होतो. हे करताना संपादकाच्या कौशल्याचा कस लागतो. ह्या प्रकारचे संपादकीय संस्कार किती प्रकारचे आणि कोणत्या प्रमाणात असावेत याविषयी संपादकाला अंगभूत समज असावी लागते, किंवा ती अनुभवानं वाढवावी लागते. संपादकीय कात्रीचा उपयोग जबाबदारीनं पण तितकाच हळुवारपणे करावा लागतो. प्रत्येक संहिता ही वेगळी असते, त्या त्या लेखकाच्या स्वभावाला अनुसरून लिहिलेली असते, त्यामुळे हे साहित्यिक संस्कार सरसकटपणे सर्वांना सारखेच लावता येत नाहीत. त्याचे नियमही ठरवता येत नाहीत. या ठिकाणी मला 'स्नेहांकिता' या पुस्तकाचं उदाहरण द्यावंसं वाटतं.

माझ्या कामाच्या अगदी सुरवातीच्या दिवसांत माझ्याकडे स्नेहप्रभा प्रधान यांनी लिहिलेलं 'स्नेहांकिता' हे हस्तलिखित आलं. हे एका वेगळ्या प्रकारचं आत्मचरित्र होतं. त्यात ४७५ हस्तलिखित पानं होती आणि ती स्नेहप्रभाबाईंनी एका दुःखाच्या

आवेगात लिहिलेली होती. त्या आवेगामुळे पुस्तकाचा घाट काहीसा विस्कळित झालेला होता. ह्या पुस्तकाचं संपादन वेगवेगळ्या पद्धतीनं करावं लागलं. त्याच्यात पुनरुक्ती आणि पाल्हाळ खूप होता; एकच प्रसंग वारंवार सांगितला जात होता. त्यांचं अशा प्रकारचं हे पहिलंच लेखन असल्यामुळे त्यांना आपल्या मनातला विचार कसा मांडावा याची पुरेशी कल्पना नव्हती. तसंच त्यांचं मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती या सर्व भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे त्या भाषांची आणि वाक्प्रचारांची सरमिसळ झालेली होती. त्या सर्वांमधून एक सलग, सुसूत्र संहिता तयार करण्यात जवळजवळ सहा महिने गेले. त्यासाठी वारंवार स्नेहप्रभाबाईंशी चर्चा करणं, आपला मुद्दा पटवून देणं, मला काय हवंय ते समजावून देणं, त्याला अनुसरून त्यांच्याकडून पुनर्लेखन करून घेणं, काही उताऱ्यांची किंवा परिच्छेदांची निर्दयपणे काटछाट करणं - अर्थात त्यांची अनुमती घेऊनच. असा त्या संहितेसाठी खूप खटाटोप करावा लागला. शेवटी आम्ही ती संहिता ४७५ पानांवरून २४० पानांचं पुस्तक होईल इतक्या आकारात संपादित केली. संपादकाला ह्या सर्व गोष्टींचं भान ठेवावं लागतं. तरच पुस्तक वाचनीय होऊ शकतं हा मुद्दा मांडण्यासाठी हे उदाहरण दिलं.

पुण्याच्या कल्पना प्रेसमध्ये आमची पुस्तकं छापून घेण्यासाठी मी नेहमी येत असे तेव्हा चिं.स. ऊर्फ अण्णासाहेब लाटकर यांच्याशी परिचय झाला आणि पुढे संबंध घनिष्ठ झाले. त्यांचं नेहमी सांगणं असे की कुठल्याही लेखकाला आणि लिहून दिलेल्या मजकुरात काटछाट किंवा फेरबदल करायला आवडत नाही कारण आपण लिहिलं आहे ते सर्व ‘अक्षर वाङ्मय’ आहे अशी त्याची ठाम समजूत असते. बदलाला नकार देणारा तोच लेखक प्रत्येकवेळी त्याच्याकडे प्रुफं तपासायला गेली की मात्र आधीच्या मजकुरात अधिक भर घालतो आणि मुद्रकाचं काम कठीण करून ठेवतो. अशा वेळी संपादकाची जबाबदारी फार वाढते. प्रत्येक लेखकाला वेगवेगळ्या पद्धतीनं चुचकारून घ्यावं लागतं आणि आपल्याला आवश्यक वाटतील ते बदल त्याच्याकडून करून घ्यावे लागतात. परंतु त्याच वेळेला हे ही भान राखावं लागतं की लेखकानं जो आशय व्यक्त केला आहे त्यात फार काटछाट करता

## वात्रटिका

### गळती

झोपडीमध्ये पाऊसपाणी टप-टप होतं गळत,
सखूबाईने त्यातच बालदी लावली होती भरत.
रात्रभरात एकेकाने आंघोळ घेतली करून,
उजाडायच्या आत कपडे सुकत पडले धुवून.

**-डॉ. सुमन नवलकर**

कामा नये. म्हणजे लेखक हा प्रथम महत्त्वाचा तर संपादक हा दुय्यम महत्त्वाचा आहे.

अशा प्रकारचे साहित्यिक संस्कार करताना संपादकाला मजकुराशी संबंधित वेगवेगळ्या पैलूंचं भान ठेवावं लागतं. एक म्हणजे त्यात क्लॅरिटी किंवा स्पष्टता आहे की नाही; दुसरं म्हणजे प्रिसीजन किंवा नेमकेपणा आहे की नाही; तिसरं म्हणजे बॅलन्स किंवा समतोल आहे की नाही हे ही बघावं लागतं. एका प्रकारे संपादक हा साक्षेपी समीक्षक असावा लागतो. तो लेखकाच्या कृतीतला योग्य तो अर्थ शोधून काढतो आणि तो अर्थ वाचकापर्यंत अधिक चांगल्या रीतीने पोचवण्यासाठी त्यावर मेहनत घेतो. त्यासाठी मूळ मजकूर पुन्हा पुन्हा वाचतो आणि तो तर्काच्या कसोटीवर घासून पाहतो. तसंच त्याची मांडणी आणि रचना योग्य रीतीने झाली आहे की नाही हे पारखून घेतो.

संपादनाच्या तांत्रिक संस्कारांना सुरुवात करण्यापूर्वी एक महत्त्वाचं काम संपादकाला करावं लागतं ते म्हणजे त्या विशिष्ट संहितेसाठी स्टाइल-शीट किंवा विशिष्ट सूचनापत्रक तयार करणं. ही एक अतिशय महत्त्वाची आणि आवश्यक अशी बाब आहे. सगळेच संपादक करतातच असं नाही पण करावं असा आमचा आग्रह आहे. प्रत्येक संहितेत संपादनाची सुसूत्रता राखली जावी म्हणून आणि संपादकाच्या स्मरणशक्तीवर अवलंबून राहावं लागू नये म्हणून असं स्टाइलशीट करणं आवश्यक आहे. यामध्ये अनेक मुद्दे येतात. त्या विशिष्ट संहितेतले विशिष्ट शब्द कसे लिहिले जावेत उदा. जोतीराव की ज्योतीराव, कुलकर्णी की कुळकर्णी, ब्रेइट की ब्रेख्ट, शेक्सपीयर की शेक्सपिअर यांचा नीट विचार

## वात्रटिका

### वेळापत्रक

दिवसभर उनाडक्या, रात्री जागून अभ्यास,
आई म्हणते, ''किती याच्या अभ्यासाचा त्रास.
उजेडाची येते तिरीप कसं झोपायचं?''
संजू म्हणतो, ''आई काम रात्रीचं उरकून घ्यायचं.

**-डॉ. सुमन नवलकर**

---

करून नोंद करावी. हे शब्द मुद्रणप्रतीत कुठे येतात, निदान त्यांचा पहिला उल्लेख कोणत्या पानावर येतो त्याची नोंद करावी. मुद्रणप्रत तयार करत असताना ह्या सूचनापत्रकाचा वारंवार उपयोग करावा. टिपा आणि तळटिपा, आकृत्यांचे वर्णन (फिगर लेजंड्स), नकाशांतली नावं, तक्ते आणि या प्रकारचा मजकूर तपासताना ह्या सूचनापत्रकाचा जरूर उपयोग करावा.

ह्या विशिष्ट सूचनापत्रकाचा उपयोग फक्त मुद्रणप्रत तयार करतानाच होतो असं नाही. संपादकाला किंवा प्रकाशकाला एकाच पुस्तकावर सलग काम करणं शक्य होत नाही. मुद्रणाच्या वेगवेगळ्या अवस्थांत असलेल्या अनेक पुस्कांवर एकाच वेळी काम करावं लागतं. मुद्रणप्रतीवर संस्कार केल्यानंतर मुद्रितं तपासणं, सूची तयार करणं वगैरे अवस्था अनेक महिन्यांनंतर येण्याची शक्यता असते. शिवाय हे काम एकाच संपादकाकडे चालू राहील याची खात्री नसते. त्यामुळे विशिष्ट सूचनापत्रकाची प्रत ही त्या त्या पुस्तकाच्या फाइलमध्ये पुस्तक तयार होईपर्यंत राहणं आवश्यक आहे. या सूचनापत्रकाची एक प्रत मुद्रितशोधकालाही द्यावी लागते.

तांत्रिक संस्कारांचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे मजकुराच्या मांडणीत व्याकरणाच्या किंवा भाषेच्या चुका झालेल्या असल्यास त्याकडे लेखकाचं लक्ष वेधणं हा आहे. तसंच लेखकाच्या मनातला भाव किंवा अर्थ वाचकापर्यंत योग्य रीतीनं पोहोचवण्यासाठी योग्य त्या सूचना करणं हेही संपादकाचं महत्त्वाचं काम आहे. एखादं वाक्य किंवा परिच्छेद मागेपुढे करणं, अनावश्यक मजकूर गाळणं किंवा एखाद्या वाक्याची जोड देणं, द्विरुक्ती किंवा पाल्हाळ टाळणं ह्या प्रकारच्या सूचना कराव्या लागतात. काही गृहीत बाबींचा खुलासा केल्याशिवाय वाचकाला बोध होत नाही असं लक्षात आल्यास त्याचा खुलासा करावा लागतो. व्यक्तिविषयक उल्लेख मजकुरात पहिल्यांदा येतात तेव्हा संपूर्ण नाव द्यावं - असं श्री. पु. असं न म्हणता श्री. पु. भागवत, जी. ए. असं न म्हणता जी. ए. कुलकर्णी किंवा मास्तर असं न म्हणता मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, नुसतं पटेल असं न म्हणता वल्लभभाई पटेल की विठ्ठलभाई पटेल याचा खुलासा करावा.

मजकुरात उपशीर्षक असल्यास ती एकमेकांशी सुसंगत आणि अर्थपूर्ण आहेत की नाही हे तपासावं लागतं. याच पद्धतीनं अन्योन्य संदर्भ, तपशिलांची पुनरुक्ती हे बारकाईनं तपासून मांडणी मुद्देसूद करावी. अवतरणे दिली असल्यास अवतरण चिन्हं आणि अवतरण देण्याची पद्धत सुसंगतरीत्या वापरली आहे की नाही हे तपासावं.

वाचकाला वाचन सुकर होईल हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संपादकाने ही काळजी आधीच घेतली पाहिजे. मुद्रणप्रत तयार करताना, संहितेचं संपादन करताना वाचकाला डोळ्यांसमोर ठेवून संपादकानं ही काळजी घेतली पाहिजे.

शास्त्रीय पुस्तकांमध्ये, इतिहासाशी किंवा समाजशास्त्राशी संबंधित पुस्तकांमध्ये टिपा आणि तळटिपा यांचं संपादन हाही एक महत्त्वाचा भाग आहे. त्यात संदर्भ, संदर्भांतील सारखेपणा, संदर्भ देण्याची पद्धत, मुख्य मजकूर आणि टिपा यांमधील सुसूत्रता अशा अनेक बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावं लागतं. मजकुरात दिलेले टिपांचे संदर्भाचे क्रमांक आणि प्रत्यक्ष टिपा या संपादकाने अतिशय काळजीपूर्वक ताडून पाहायला हव्यात. त्याच्यात क्रमांकाचा घोटाळा झाला तर त्यामुळे तो संदर्भही चुकीचा लागू शकतो आणि त्यामुळे वाचकाच्या ज्ञानात फरक पडू शकतो. टिपा आणि ग्रंथसूची यांचा अन्योन्य संदर्भ संपादकाने ताडून पाहावा आणि काही शंका आल्यास लेखकाला विचारून सुधारणा करावी. संपादक हा सर्वज्ञ असू शकत नाही पण संपादकाला अनेक विषयांचं ज्ञान असणं आवश्यक आहे. याच पद्धतीनं ग्रंथसूची, तक्ते, आकृत्या आणि त्यांची शीर्षकं यांचंही संपादन अत्यंत काळजीपूर्वक करावं.

संपूर्ण हस्तलिखितातील / संहितेतील मजकुराचं

शुद्धलेखन तपासणं ही संपादकाची फार मोठी जबाबदारी आहे. त्यासाठी त्याचं व्याकरणावर प्रभुत्व असणं आवश्यक आहे, आणि जरूर तिथे संदर्भग्रंथांचा वापर करणंही आवश्यक आहे. मराठी व्याकरणासाठी शब्दकोश, तसंच संदर्भासाठी इंग्रजी-मराठी शब्दकोश, संस्कृत-मराठी शब्दकोश, विश्वकोश, संस्कृतिकोश यांचा नियमित उपयोग करावा. या कोशांमध्ये आता सत्त्वशीला सामंत यांच्या 'शब्दानंद' या कोशाचाही अंतर्भाव करावा लागेल. आधी म्हटल्याप्रमाणे अरुण फडके यांचा 'मराठी-लेखन कोश'. मो.रा. वाळंबे यांचं 'मराठी शुद्धलेखन प्रदीप', एस. व्ही. सोहोनी यांची डिक्शनरी, गीर्वाण लघुकोश, अभिनव शब्दकोश अशा पुस्तकांचा संपादकाने आवर्जून उपयोग करावा. आता त्यात आमच्या 'रीतिपुस्तका'चाही समावेश करावा असं मी आग्रहानं सांगेन.

आपण मला जो विषय दिलेला आहे. त्यात संहिता संपादनाचं स्वरूप आणि पथ्ये असं म्हटलेलं आहे. ही पथ्ये काय असावीत असा विचार करताना लक्षात आलं की संपादकानं लेखकाच्या संहितेच्या मूळ आशयाला धक्का न लावता पुस्तकाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवण्याच्या दृष्टीनं जे प्रयत्न करता येतील ते केले पाहिजेत. त्यासाठी लेखकाशी चर्चा करून, आपला मुद्दा पटवून देऊन जरूर ते फेरफार करून घेतले पाहिजेत. या पद्धतीनं काम केल्यास पुस्तकाची गुणवत्ता निश्चितच वाढू शकते.

संपादक हा लेखक आणि वाचक यांच्यामधला सेतू असतो किंवा दुवा असतो हे भान विसरता कामा नये. संपादक हा लेखकाच्या जितका जवळचा असतो तितकाच तो वाचकाच्याही जवळचा असतो आणि वाचकाला आपलंसं करून घेण्यासाठी लेखकाला त्याच्या लेखनात थोडी मुरड घालून का होईना, बदल करण्यासाठी प्रवृत्त करणं यासाठी संपादकाला वाचकाचा पुढे होणारा फायदा डोळ्यांसमोर ठेवणं आवश्यक आहे.

दुसरं एक पथ्य म्हणजे आधी म्हटल्याप्रमाणे संहिता संपादनाला अतिशय उपयुक्त असं स्टाइलशीट (विशिष्ट सूचनापत्रक) बनवणं आणि त्याचा सतत उपयोग करणं. पुस्तक सुसंगत, एकसंध, बांधेसूद होण्याच्या दृष्टीनं त्याचा खूप उपयोग होतो आणि हे पथ्य आवश्यक आहे.

## प्रेमाची भाषा

प्रेमाच्या भाषेला लाभे
लिपी सुंदर भावनांची
काना मात्रा उकार वेलांटी
ही रुपे तर सहा रसांची ।।धृ.।।
विशेष काय ह्या भावनांचे
पाहण्या घेतला शोध तळाचा
डोळे पार दिपून गेले
खजिना छान गुपित रत्नांचा
ही तर किमया असते सारी
त्याच दिव्य भावनांची।।१।।
त्यांना कधी लाभत नाही
कोंदण कुठल्या शब्दांचे
खजिन्यामध्ये लखलखत राही
तेज मनस्वी गुपितांचे
नयनांमधुनी सदा प्रकटते
नक्षी गोड विभ्रमांची ।।२।।
भृकुटींचेही मिळत असते
साहचर्य त्या विभ्रमांना
नक्षीवरती जणू विराजे
जरतारीचा हा नजराणा
कपोलांचे गुलाब फुलती
प्राची हसते हळू लज्जेची।।३।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

संहिता संपादन ह्या विषयाचे काही पैलू मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे आणि ह्या निमित्तानं सत्त्वशीला सामंत हिला श्रद्धांजली वाहण्याची संधी आपण मला दिलीत याबद्दल मी कृतज्ञ आहे.

*

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# सुख आले माझ्या दारी

★ सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर ★

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

हातातील मासिक बाजूला ठेवून उत्तरेनं घड्याळाकडे पाहिलं. संध्याकाळचे पाच वाजायला आले होते. ती दचकून उठली. आता तासाभरात अविनाश आलाच असता. बाळसुद्धा उठला असता. ती स्वयंपाकघरात गेली. भराभरा तिने रवा भाजायला घेतला. अविनाशला शिरा खूप आवडतो. म्हणून मधून मधून ती आवर्जून करायची. त्याला आवडतो तस्सा. भरपूर बदाम, बेदाणे, केशर घातलेला.

आज शिरा पाहून अविनाश किती खूष होईल त्याचं चित्र तिच्या नजरेसमोर उभं राहिलं आणि तिला खुदक्न हसू आलं. त्याची खट्याळ नजर आठवताच ती मनोमन लाजली.

पुरी सात वर्षं झाली होती त्यांच्या लग्नाला. तरीसुद्धा त्या दोघांमधलं प्रेम थोडंही कमी झालं नव्हतं. संसार खऱ्या अर्थानं चालू झाला होता. बाळाच्या जन्मापासून तर दोघं संसारात मुरायला लागली होती. बाळाचं दुखणं खुपणं, त्यांच्या लीला, कोड कौतुक साऱ्यासाऱ्यात त्या दोघांचा निम्मा निम्मा वाटा होता. संसाराची जबाबदारी दोघांनी मिळून पेलताना ती दोघे एकमेकांच्या अधिकच जवळ आली होती. संसाराची नव्हाळी कमी होत गेली तशी त्यांच्यातील प्रेमात अवीट गोडी उत्पन्न होऊ लागली होती. त्यांचा प्रेमविवाह शंभर टक्के यशस्वी झाल्याची हीच खूण होती. त्या खुणेची ओळख उत्तरेला पूर्णपणे पटली होती. आणि म्हणूनच ती अगदी समाधानात होती. पूर्ण सुखात होती. स्वर्गसुख म्हणतात ते हेच असावं असं तिला वाटू लागलं होतं.

पण ह्या सुखचंद्रालाही एक छोटासा डाग होता. त्या पूर्ण सुखाला एक पण होता. ती आईवडिलांच्या प्रेमाला पूर्ण पारखी झाली होती. नानासाहेबांची एकुलती एक लाडकी लेक होती. नानासाहेब पिढीजात श्रीमंत नव्हते. पण आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर गर्भश्रीमंत बनले होते. साहजिकच आपली लेक अशाच बड्या घरची सून बनावी ही त्यांची योग्य व जबरदस्त इच्छा होती.

एक दिवस नानासाहेब घरी आले तेच मुळी आनंदात.

''अहो ऐकलंत का?'' असं जोराने ओरडत ते आले तेच मुळी स्वयंपाकघरात शिरले.

उत्तरेची आई सुलोचनाबाई पहातच राहिल्या. त्यांना खूप आश्चर्य वाटले.सदोदित धंद्याच्या कामकाजात घराला पूर्ण विसरणारे नानासाहेब आज चक्क स्वयंपाकघरापर्यंत पोहोचले होते. नेहमीच्या गंभीर चेहऱ्याऐवजी चक्क आनंदाचं साम्राज्य पसरलं होतं. नाचायचं तेवढंच बाकी ठेवलं होतं त्यांनी.

''अहोऽऽ ऐकताय ना?'' असं त्यांनी परत ओरडूनच सुलोचनाबाईंना विचारलं. तेव्हा कुठे त्या आपल्या तंद्रीतून जागा झाल्या.

''इश्य! एवढा आरडाओरडा करायला काय झालं आज? घडलं तरी काय असं?

''तूच ओळख.''

''सांगू? परवा ऑर्डर दिलेली मशिनरी आली असेल नाहीतर ह्या वर्षी कारखान्याला जबरदस्त फायदा झाला असेल....''

''चूक साफ चूक. माझ्या आनंदाचा कारखान्याशी संबंध नाही.''

''कारखान्याशी संबंध नाही?''

''नाही. दुरान्वयानेही नाही.''

''काय म्हणता काय?'' सुलोचनाबाई आश्चर्याने थक्क झाल्या. ''कारखान्याशिवाय तुम्हाला दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टी आकर्षित करू शकतात तर?'' त्यांनी लटक्या रागानेच विचारले.

''मग? लेकीच्या लग्नाने आनंद नाही होणार मला? कारखानदार असलो तरी एका मुलीचा बाप आहे म्हटलं मी.''

''लेकीचं लग्न? म्हणजे? कुठे परस्पर जमवलं की काय तिनं?''

''अं हं! मीच जावई शोधून काढलाय...''

''कोण तो?''

''आपट्यांचा अशोक हो! चांगला इंजिनियर आहे. अमेरिकेलाही जाऊन आलाय. आपट्यांच्या घरची सून व्हायचं म्हणजे भाग्यच हवं. आपट्यांना सुद्धा उत्तरा पसंत आहे.''

''न पसंत असायला काय झालं? नक्षत्रासारखी आहे पोर. कुणीही पसंत करील.''

''अगं पण हा असा 'कुणीही' नाही. चांगला आपल्या तोलामोलाचाच नव्हे तर वरचढ आहे आपल्याहून. आपली उत्तरा अगदी सुखात राहील बघ. पुढे मागे आपल्या कारखान्याचा व्यापसुद्धा अशोक चांगला सांभाळील. पोरीनं नशीब काढलं अगदी.''

बाहेरून आलेली उत्तरा हा संवाद ऐकत बाहेरच उभी होती. नानासाहेबांचा फुललेला चेहरा पाहून तिला खरं ते सांगणं जीवावर आलं. कितीतरी वर्षांनी आज नानासाहेब मोकळेपणाने श्वास घेत होते. खळखळून हसत होते. मुलीच्या बापाची चिंता त्यांच्या डोक्यावरून साफ उतरली होती. हे आनंदी वातावरण त्यांच्या घराच्या भिंतींत आज प्रथमच पसरलं होतं.

उत्तरा हळूच स्वत:च्या खोलीत निघून गेली. रात्री आईने तिच्या अपेक्षेप्रमाणे विषय काढलाच, ''उत्तरा नशिबवान आहेस तू. आपट्यांनी होकार दिलाय. अशोकला तसं तू पाहिलेलं आहेसच.''

उत्तरा फक्त हसली. रात्री नानासाहेब झोपायला गेल्यावर उत्तरा आईभोवती घुटमळत राहिली. तिला तशी घुटमळताना पाहून सुलोचनाबाईंना हसू आलं.

''काय ग? झोपायला नाही जायचं? की आत्तापासूनच झोप येईनाशी झाली? ते पण खरंच. आईचं घर सोडून जायचं म्हणजे वाईट वाटायचंच. पण अगं वेडे, अजून खूप अवकाश आहे. आत्ता तर जुलै संपतोय. लग्न डिसेंबरमध्ये करू. ''बोलता बोलता सुलोचनाबाईंनी उत्तरेकडे पाहिलं. ती गप्प होती. गंभीर होती. त्या जराशा चरकल्याच. ''काय गं? काय झालं? बरं नाहीय का तुला?'' असं म्हणत त्यांनी तिला जवळ घेतलं -

''आई.. मी माझं लग्न ठरवलंय. दोन दिवसांनी अविनाश येणारच होता नानासाहेबांना भेटायला.''

सुलोचनाबाई क्षणकाल स्तब्ध झाल्या. मग किंचित सावरून म्हणाल्या ''हात्तिच्या! एवढंच ना? कोण आहे तो? त्याचे वडील कोण आहेत? त्यांचा बंगला कुठे आहे? ते सर्व सांग. चांगला असला म्हणजे झालं...''

''आई- तू म्हणतेस त्यातलं काहीही नाही. त्याला आईवडील कुणी नाहीत. त्यांचा बंगला नाही. तो एम्.कॉम आहे. नोकरी करून शिकला. ह्याच वर्षी त्याचं शिक्षण पूर्ण झालं.''

''उत्तरा!'' सुलोचनाबाई एकदम ओरडल्या. केवढा धक्का बसला होता त्यांना! आता हे नानासाहेबांना सांगायचं तरी कसं? त्यांना काय वाटेल हे ऐकून? त्या सुन्न झाल्या.

उत्तरा बोलतच होती, ''आई, प्लीज तू नानांना सांग नं. ते तुझं ऐकतील. मला भीती वाटते. त्यांच्यासमोर बोलायची, ते नाही म्हणतील याची.''

सुलोचनाबाईंनी नानासाहेबांना भीतभीतच सगळं सांगितलं. आणि शेवटी उत्तरेची भीतीच खरी ठरली. दुसऱ्याच दिवशी सकाळी नानासाहेबांनी उत्तरेला हाक मारली. उत्तरा त्यांच्यासमोर उभी राहिली.

''उत्तरा, मी काय ऐकलं ते खरं आहे?''

तिने हळूच मान हलविली.

''तुझा निश्चय कायम आहे?''

तिने परत होकार दिला..

''ठीक आहे. मग माझाही निश्चय ऐक. एक तुला अविनाश मिळेल किंवा आम्ही. जर अविनाशशी लग्न केलंस तर आमचं घर तुला कायमचं बंद राहील...''

उत्तराही त्यांचीच मुलगी होती. त्यांच्याच रक्ताची. तिने त्यांच्या नजरेला नजर देत शांतपणे म्हटलं, ''ठीक आहे नाना! पण एखाद्याला वचन देऊन नंतर फसवणं मला पसंत नाही.''

''अगं पण काय पाहिलंस त्याच्यात? त्याचा पगार तुझ्या वरखर्चाला तरी पुरेल का?''

ती हसली. म्हणाली, ''नाना, तुमचं लग्न झालं तेव्हा तुम्ही तरी कुठे एवढे श्रीमंत होतात? माझाही अविनाशच्या कर्तृत्वावर विश्वास आहे. आणि नाना,

शेवटी ह्या नशिबाच्या गोष्टी आहेत. नशिबात असेल तर हे एवढंच वैभव मी मिळवून दाखवीन.''

उत्तराने दुसऱ्याच दिवशी घर सोडलं होतं. अविनाशशी तिचं लग्न झालं. त्यानंतर दुसऱ्याच महिन्यात त्याची मुंबईला बदली झाली होती. कोल्हापूरहून उत्तरा एकदम मुंबईला पोहोचली होती.

पहिल्यांदा आईची, नानांची खूप आठवण यायची. पण अविनाशच्या प्रेमाच्या धबधब्यात ते दु:ख कुठच्या कुठे वाहून जाई. अविनाशने तिला पूर्ण सुखात ठेवलं होतं. आपल्या निर्णयाचा एवढासासुद्धा पश्चात्ताप तिला कधी झाला नव्हता. स्वत:च्या हुशारीवर चढत चढत तो ऑफिसर ग्रेड वन झाला होता. आता लवकरच बँकेच्या एखाद्या शाखेचा एजंट होणं काही दूर नव्हतं. त्याच्यावरचा तिचा विश्वास अनाठायी नव्हता. पण तरीही मधूनच तिला माहेरची आठवण होई. आईचं प्रेम तिला साद घालायचं. नानांची माया तिला अस्वस्थ करून सोडायची. कधी कधी तिला वाटायचं, आपण त्यांचं एकुलतं एक अपत्य. आपण त्यांना काय सुख दिलं? काहीही नाही. दिला तो फक्त मनस्ताप. पण मग त्यांनी तरी असं का वागावं? काय झालं असतं लेकीच्या मनासारखं केलं असतं तर?

एकेकदा ती बाळाकडे टक लावून बसायची. तिच्या नजरेसमोर वेगळंच दृश्य साकार व्हायचं. समजा आपल्याला दुसरं मूल झालंच नाही तर? आणि ह्या बाळानेसुद्धा स्वत:चंच म्हणणं खरं केलं तर? काय वाटेल तेव्हा आपल्याला? ती जास्तच बैचेन व्हायची...

आत्तासुद्धा ती अशीच बैचेन झाली. तिनं आपलं लक्ष प्रयत्नपूर्वक खेचून आणलं. खाणं तयार ठेवून ती वॉशबेसिनकडे वळली. थंड पाण्याचे सपकारे चेहऱ्यावर मारून जणू तिने सगळेच विचार निपटून काढायचा प्रयत्न केला. अविनाशला ह्या विचारांची ती कधी चाहूलसुद्धा लागू देत नसे. सदोदित आनंदी चेहऱ्याने त्याच्यासमोर ती वावरायची.

तिला बाहुपाशात घेऊन वेळोवेळी तो विचारायचा - ''राणी सुखात आहेस ना?''

तिनं म्हणावं ''फार फार सुखात आहे मी'' अविनाश सर्वतोपरी काळजी घेत होता. जणू आई वडिलांच्या प्रेमाची उणीव भरून काढायचा प्रयत्न करीत होता. त्याला समजत होतं की, आईवडिलांचं प्रेम ते वेगळंच. दुसऱ्या कुणाच्याही प्रेमाला ती सर येणार नाही. तरीही तो शक्य तेवढं करतच होता. कारण त्या अंतर्मनात कुठेतरी जाणीव होती की आपल्यासाठीच तिने तिच्या आईवडिलांना सोडलंय. शिवाय तिने लग्नानंतर कधीही आई नानांच्या आठवणी काढून त्रास दिला नव्हता. निदान त्याच्यासमोर तरी रडली नव्हती. सदैव हसतमुखाने वावरली होती ती.

हे वैभवाचे दिवस नंतर दिसले होते. पण सुरुवातीच्या ओढाताणीच्या काळातही तिने कधी त्याला दोष दिला नव्हता. तो तिची एवढी काळजी घेत होता म्हणूनच त्याच्या भोवती आनंदाचं साम्राज्य पसरवणं जरूर होतं आणि ते तिच्याच हातात होतं.

उत्तरेनं काळजीपूर्वक प्रसाधन आटोपलं आणि ती वॉर्डरोबकडे वळली. जसजशी ऐपत वाढली तसतशी अविनाशची हौसही उतू जाऊ लागली होती. त्याने हौसेने सुंदर सुंदर साड्यांनी वॉर्डरोब भरून टाकला होता. तिने कॉफी रंगाची साडी व तसलाच मॅचिंग ब्लाऊज काढला. हा रंग अविनाशच्या फार आवडीचा होता. ती तयार होऊन गॅलरीत जाण्यासाठी वळली-

तोच बेल वाजली. नेहमीपेक्षा जोराने अधीरपणे 'अविनाश आलाच वाटतं' असं म्हणत ती घाईघाईने दार उघडायला गेली. तिने दार उघडलं. दार उघडताच अविनाश आत आला. एका हाताने मागच्या मागे दार लोटून त्याने दुसऱ्या हाताने उत्तरेला मिठीत घेतलं.

''इश्श! किती घाई!'' - त्याच्या मिठीत गुदमरत उत्तरा हळूच पुटपुटली.

तिचा चेहरा दोन्ही हातांच्या ओंजळीत धरून त्याने वर उचलला. तिच्या चेहऱ्याकडे एकटक तो पाहू लागला. तिच्या नजरेत त्याची नजर मिसळल्यासारखी वाटत होती. पण खरं तर त्याच्या डोक्यात विचारचक्र जोरात फिरत होतं.

उत्तरा हे पाहून गोंधळली. त्याच्या मनातील मंथन तिला जाणवलं.

''काय झालं? तुम्ही असे विचारात का पडलात?''

अविनाश एकदम भानावर आला.

''अं...! नाही ग. खरं तर तुला एक अतिशय आनंदाची बातमी द्यायचीय.''

''मग असा रडका चेहरा काय केलाय्?''

''अगं, ती बातमी एवढी आनंदाची आहे की, ती तुला कोणत्या शब्दांत सांगावी याचा विचार करतोय. नाही तर हर्षवायु व्हावयाचा!''

''सांगा ना! एवढी कसली खास बातमी ते? सांगान लवकर'' - उत्तरा लहान मुलासारखी त्याच्या हाताला लोंबकळत म्हणाली.

तिला अलगद जवळ घेत तो म्हणाला,

''मला प्रमोशन मिळालंय राणी. मी एजंट झालो.''

तिनं सुखातिशयानं डोळे मिटून घेतले. जणू तिला पडत असलेलं हे गोड स्वप्न डोळे उघडले तर संपून जाणार होतं. ती कितीतरी वेळ तशीच बेहोषीत त्याच्या मिठीत निश्चल राहिली.

हळूहळू तिने डोळे उघडले. पापण्या हलकेच वर उचलल्या. अविनाशला समोर पाहिल्यावर ते सत्यच आहे ह्याची तिला खात्री पटली.

''एऽऽ कुठच्या शाखेचा एजंट? सांग तरी!''

अविनाशने तिची नजर चुकविली. समोरच्या खिडकीतून बाहेर पाहात त्याने उत्तर दिले -

''कोल्हापूर!''

ते ऐकताच ती दचकून दूर झाली. अविश्वासाने त्याच्याकडे एकटक पाहू लागली.

'काय म्हणता? खरंच?''

''होय राणी अगदी खरं.''

उत्तरेची मनस्थिती साफ बदलली. तिच्या मनात अनेक विचारांची एकच गर्दी उसळली.

कोल्हापूर! इतकी वर्ष जे विसरण्याचा प्रयत्न केला पण तरीही हट्टानं मनाच्या कोपऱ्यात दडून राहिलं ते सगळं सगळं आठवलं.

आई, नाना, ते घर, त्यानंतरचा सगळा इतिहास सुद्धा... तिचं तिलाच कळेना की आपल्याला आनंद झालाय की भीती वाटतेय मनाची खपली निघून भळभळ रक्त वाहण्याची? खरं तर कोल्हापूर तसं मोठं शहर. पण मोठ्या बँकेचा ब्रँच मॅनेजर म्हणजे गावात तसा प्रसिद्धीचाच हुद्दा. कधी ना कधी कुणी ना कुणीतरी भेटणारच.

मुलींना माहेरच्या गावाचं कोण अप्रूप वाटतं! माहेरच्या वाटेवर फक्त फुलंच पसरलेली असतात. ते चिमखड्या बोलांपासून गाभुळलेल्या चिंचापर्यंतच्या आठवणींनी शाकारलेलं घर, ती मूर्तीमंत वात्सल्याचं प्रतीक असलेली आई, आई इतका दिसत नसला तरी मनात अधीर भाव साठवून वाट पाहणारे वडील... कितीतरी गोष्टी.

पण... इथे सगळा प्रकारच उलट होता. इथे माहेरच्या वाटा बंद पडल्या होत्या. फुलांची पखरण सगळी सासरच्या वाटेवर होती. माहेरच्या आठवणींनी चंदनलेपाचा गारवा मिळण्याऐवजी मनावर ओरखडेच जास्त उमटत होते.

सगळं मिळूनही एक चमत्कारिक रितेपण वाट्याला आलं होतं. प्रचंड पोकळी मन पोखरत होती. तिच्या भावविश्वात प्रचंड उलथापालथ चालली होती. विचार करकरून मन नुसतंच भोवंडत होतं. त्या मंथनातून हाती काहीच गवसत नव्हतं.

असा बराच वेळ गेला आणि मोठ्या प्रयासानं मन आवरलं. तिनं दचकून आजूबाजूला पाहिलं. अविनाशनं तिची मन:स्थिती नेहमीसारखी अचूक ओळखली होती आणि तो हळूच आतल्या खोलीत सटकला होता. नेहमीसारखाच त्याने स्वत:चा विचार सोडून तिचा विचार केला होता. ती मात्र क्षणमात्र का होईना त्याला विसरून गेली होती.

ती मनोमन ओशाळली. लगबगीने स्वयंपाकघरात गेली.

शिऱ्याची बशी आणि गरम चहा तिने टेबलावर मांडला.

शिऱ्याची गोडी या बातमीने वाढायच्या ऐवजी कमी झाली होती. अविनाश मुकाट्याने खात होता -

त्याच्याकडे पाहून तिला भडभडून आलं.

बिच्चारा! स्वत:च्या प्रमोशनचा आनंदसुद्धा त्याला नीट उपभोगता येत नव्हता. ती पुढे झाली. हळूच त्याचं मस्तक तिने हृदयाशी धरलं. त्याच्या त्या आधाराने तिने इतका वेळ जपलेले मनाचे बांध धडाधड कोसळले. त्याच्या मस्तकावर तिच्या अश्रूंचा अभिषेक सुरू झाला.

थोड्या वेळानंतर तिचं मन आपोआप शांत झालं. तिनं स्वत:ला सावरलं.

''अवि! कोल्हापूरला कधी जायचं रे? आता आवराआवर करायला हवी.''

अविने तिच्याकडे निरखून पाहिलं.. छे! ही मघाची उत्तरा नव्हेच. ही तर त्याची फक्त त्याचीच उत्तरा होती. पूर्वीसारखी हसरी, प्रफुल्लीत. त्याने हळूच नकळत निश्वास टाकला. त्याच्या मनावरचं ओझं एकदम उतरलं.

दोघांची कोल्हापूरला जाण्याची तयारी सुरू झाली. बँकेचे क्वार्टर्स मिळणारच होते. ते सुद्धा फर्निश्ड. फारसं काही सामान नव्हतंच.

... हां हां म्हणता दिवस निघून गेले. कोल्हापूरला येऊन त्यांना दोन तीन वर्ष होऊनही गेली. उत्तरा आता येथे पूर्णपणे रुळली होती. माती जुनी असली तरी वातावरण नवीन होतं. मानमरातब वाढला होता. गजांतलक्ष्मी घर शोधत आली होती.

घरात नोकरचाकर भरपूर होते. दारात गाडी झुलत होती. फारसं कधी बाहेर पडायची वेळ येत नव्हती. बाहेर जायचं ते फक्त समारंभांनाच. दिवस सुखात चालले होते.

बाळ आता बराच मोठा झाला होता. एक दिवस संध्याकाळी बाळ नेहमीप्रमाणेच पार्वतीबरोबर, मोलकरणीबरोबर बागेतून फिरून आला. पण आला तोच जरा मलूल होऊन. रात्री त्याला सपाटून ताप भरला.

उत्तरेचा बंगला काळजीनं व्यापला. नेहमीच्या वर्दळीला धावपळीचं रूप प्राप्त झालं. डॉक्टरांचे उपचार ताबडतोब सुरू झाले. बाळाच्या उशा पायथ्याशी अविनाश आणि उत्तरा रात्री रात्री जागवत होते. पूर्ण आठ दिवसांनी बाळाच्या प्रकृतीला आराम पडला आणि बंगल्याने विश्रांतीसाठी मोकळा श्वास घेतला...

''आई, आज मला बागेत जायचंय.'' एका संध्याकाळी बाळाने सूर काढला.

''आज नको हं बाळ. तू अजून थोडा बरा हो मग जा.''

''नाही जा. मी आज जाणारच.''

''नको हं बाळा असा हट्ट धरुस. पुन्हा आजारी पडशील.''

''पण आम्हाला किती दिवसांत आमचे आजोबा भेटलेच नाहीत.''

''आजोबा! कोण आजोबा?''

''ती आमची एक गम्मत आहे. त्या बागेत नं आई, रोज एक आजोबा येतात. खूप खूप गोष्टी सांगतात. आम्ही रोज खूप खूप खेळतो आजोबांशी. आजी पण येते कधी कधी. मला आज त्यांना भेटायचंय.''

''उत्तरा त्याची समजूत काढून थकली. पण बाळ ऐकेना. शेवटी तिने पार्वतीला हाक मारली.

''पार्वती!''

''जी बाईसाब!''

''बागेत कोण भेटतं तुम्हांला रोज?''

''एक म्हातारे गृहस्थ येतात बाईसाब. बाळाशी रोज खेळतात. फार चांगले आहेत.''

''पार्वती एक काम कर. बागेत जा आणि त्या आजोबांना भेट. त्यांना म्हणावं बाळ आजारी आहे. तुमची फार आठवण काढतोय. त्यांना भेटायला इकडेच घेऊन ये. गाडी घेऊन जा.''

''जी बाईसाब!'' असं म्हणून पार्वती निघून गेली.

बाळाने आनंदाने उत्तरेच्या गळ्याला मिठी घातली आणि तिच्या गालावर हळूच ओठ टेकले. बाळाच्या त्या गळामिठीने तिला भरून आलं.

लहान मुलाच्या विश्वात आई बाबाबरोबर आजी आजोबांनाही किती महत्त्व असतं! बिचारा आपला बाळ! त्याचे सख्खे आजी आजोबा असूनही त्यांचं प्रेम, माया मिळत नाही. आणि हे कोण कुणाचे आजोबा त्याला माया लावतात. ती विषण्ण झाली.

एवढ्यात गाडीचा हॉर्न ऐकू आला. बाळ केव्हाच ''आजोबा आलेऽऽ आजोबा आले'' म्हणत पार्वतीच्या कडेवरून उतरून धावत पायऱ्यापर्यंत पोहोचला सुद्धा होता. उत्तरा त्याच्या मागोमाग खाली आली.

आणि मोटारीतून उतरून बंगल्याच्या पायऱ्या चढणाऱ्या आजोबांकडे बघताच विलक्षण दचकली.

हे... हे नाना तर नव्हेत!

छे छे! हा मनाचा भास तर नव्हे? गेली कित्येक वर्षं मनात दडपून टाकलेल्या आठवणींचा हा खेळ तर नव्हे? ती चालण्याची पद्धत, बाळाशी बोलताना ऐकू येणारा त्यांचा आवाज... सारं सारं नानांचंच. पण नाना आणि एवढे थकलेले? वाकलेले? छे छे... वय झालं म्हणून काय झालं? नानांच्याएवढा ताठ माणूस एवढा वाकेल कसा? पण पाठून येणाऱ्या त्या आजी... एवढ्यात ते आजी आणि आजोबा वर आले. त्यांनी समोर पाहिलं मात्र...

उत्तरा आणि नानासाहेब विजेचा चटका बसल्याप्रमाणे एकमेकांकडे बघत उभे होते. उत्तराने हळूच आईकडे नजर वळवली.

त्या मातेच्या नजरेत काय नव्हतं? जगातलं सगळं सौहार्द, माया एकवटून ती माऊली आपल्या लाडक्या लेकीचं हे उमललेलं रूप डोळ्यात साठवत होती. मध्येच व्याकूळ नजरेने, भीतीने नवऱ्याकडे बघत

होती. लेकीला घट्ट हृदयाशी धरण्यासाठी आसुसलेल्या हृदयावर हात ठेवून स्वस्थ राहाण्याचा अयशस्वी प्रयत्न करत होती.

नानासाहेबांच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. चटकन त्यांनी डोळे टिपले.

उत्तरेच्या मनात हलकल्लोळ माजला होता. हेच ते नाना की ज्यांनी माझ्या अविनाशचा अपमान केला. हेच ते नाना की ज्यांच्या मनात प्रेमाचा ओलावा तरी आहे का हा प्रश्न पडावा. हेच ते नाना की ज्यांना माणसांपेक्षा पैशाची किंमत जास्त होती...

आणि तेच हे नाना की जे बाळाबरोबर खेळतात. तेच हे नाना की जे बाळाला गोष्टी सांगतात, आणि तेच हे नाना की ज्यांच्या डोळ्यांतून आता चक्क अश्रू ओघळतायत...

काय करावं आता? त्यांना आत या म्हटलं तर येतील का? की पुन्हा अपमान करतील? पण आता आमचा पण तेवढाच स्टेटस आहे की! आता येतीलच आत. कारण आमची श्रीमंती दिसतेय ना! पण... पण हे अश्रू कशासाठी? त्यांना वाईट वाटतंय? नानांना? आणि एवढं कोमल अंत:करणाने वावरता येतं?

पण आई! तिनं काय आपलं वाकडं केलंय? नानांपुढे तिच्या बिचारीचं काहीच चाललं नाही. एकदा चोरून पत्र पाठवलं तिने. ते नानांना कळलं. आणि त्यांनी खूप आकांडतांडव केलं नंतर. शेजारच्या प्रेमामावशींनी कळवलं पत्रातून. तेव्हापासून पत्रही आलं नाही बिचारीचं.

पण फक्त तिलाच 'या' कसं म्हणायचं? नानांना मी आपणहून शरण जाऊ? शक्य नाही ते...

अग पण मुलगी आहेस तू त्यांची. घेतलास स्वत:कडे कमीपणा तर काय झालं? आणि शिवाय आता तू एक गृहिणी आहेस आणि ते तुझे पाहुणे आहेत. बोलावून आणलेले अतिथी. तू त्यांचा योग्य तो मान राखायलाच हवास..

तिचं दुसरं मन तिला समजावीत होतं.

तिने विचार झटकून टाकले. आणि त्यांचं स्वागत करायला ती सिद्ध झाली.

एवढ्यात नानासाहेबांनीच बोलायला सुरुवात केली.

''बाळा, आम्ही तुझे खरेखुरे आजी आजोबा आहोत. विचार तुझ्या आईला.''

''हो आई?''

''होय बाळ. ही माझी आई आणि हे माझे बाबा.'' उत्तरेनं पुढे होऊन दोघांना वाकून नमस्कार केला.

नानांनी चटकन वाकून तिला वर उचललं. तिच्या मस्तकावर थरथरता हात फिरवत त्यांनी तिला मनोमन आशीर्वाद दिले. आईने पुढे होऊन तिला घट्ट घट्ट हृदयाशी धरलं.

उत्तरेनं दोघांना कोचावर बसवलं. नाना बोलू लागले...

''उत्तरा, पोरी माझं फार फार चुकलं. आयुष्याच्या ह्या संध्याकाळी मला कळलं की, पैसा हेच सर्वस्व नाही. आजूबाजूच्या घरातील लहान मुलं पाहिली की मन बैचेन व्हायचं. मी मग त्या मुलांना बोलावू लागलो. त्यांच्याशी खेळू लागलो. त्यांच्यात मन रमवू लागलो. तशातच बागेत तुझ्या ह्या बाळाने लळा लावला. मी आयुष्यात हरलो. खरं सांगू? आज तुला भेटलो, बाळ माझाच नातू हे कळलं आणि आयुष्यातलं खरं, समाधान आज मिळालं. आत्ता वाईट वाटतंय की मी एवढी वर्षं त्या आनंदाला पार मुकलो. मला माफ कर बेटा, मला माफ कर.''

उत्तरेनं त्यांच्या तोंडावर हात ठेवला.

''असं नाही बोलायचं नाना. आता मागचं सारं सारं विसरून जायचं. मधली काही वर्षं पार पुसून टाकून निखळ पावलांनी एकत्र यायचं.''

आणि मग तिथे थोड्याच वेळात नंदनवनातील प्रसन्नतेचा शिडकावा झाला. घर निर्भर झालं. आनंदाचे झरे तिथे वाहू लागले.

आई नानांशी एवढ्या वर्षातील साठलेल्या गप्पा गोष्टी उत्तरा भान विसरून करू लागली...

दारात उभ्या असलेल्या अविनाशच्या नजरेपुढे अश्रूंचा जाड पडदा उभा होता. आणि तो निग्रहाने दूर सारून तो उत्तरेच्या चेहऱ्यावरची प्रसन्नतेची वेगळीच चमक नजरेने आधाशासारखी पीत होता. श्वासांचा सुद्धा आवाज होऊ देत नव्हता, ही प्रसन्नता उत्तरेच्या मुखावरून थोडीसुद्धा ढळू नये म्हणून...

*

# बदलते जग

⋆ सौ. विजयश्री आनंदकुमार नवलकर ⋆

सकाळची वेळ होती. पावसाची रिमझीम चालू होती. मनाला आल्हाददायक वातावरण होते. झाडावर पावसाने आपलं राज्य स्थापन केले होते. इतक्यात सूर्यनारायणाने हळूच आगमन केले. सूर्याची किरणे झाडांच्या पानांवर पडल्यावर पाण्याचे थेंब लुकलुकत होते. जणु झाडांवर हिऱ्यांचा सडाच पडला होता. मी निसर्गाकडे कौतुकाने पाहून सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेत होते. आपल्या नयनांना सुखावणारे दृष्य फार क्वचितच पहावयास मिळते. आमच्या खंडाळा येथील कॉलनीच्या घरात मी गॅलेरीत उभी राहून हे सर्व अनुभवत होते. खंडाळ्याला आम्ही दोघेच राहात होतो. मुंबईच्या प्रदुषीत वातावरणाचा मला मनापासून कंटाळा आला होता. येथे मी व माझे यजमान दोघेच राहत होतो. सकाळच्या सूर्योदयाच्या वेळी मी अग्नीला आहुती दिली होती. त्याचा घमघमाट सबंध घरात पसरला होता. अग्निच्या माध्यमातून आपले मन एकरूप होणे आणि प्रतिकात्मक तेजाच्या अग्नीची ज्वाला पहाण्याने मन आनंदून जाते. ही माझी रोजचीच सवय आहे. परंतु का कोण जाणे; आज माझं मन जरा उदास झालं होतं. काहीतरी वाईट बातमी कानावर तर येणार नाही ना? अशी शंका मनाला हुरहूर लावत होती. माझे यजमान खोलीत शांतपणे झोपले होते. त्यांना उठवून निसर्गाचं सौंदर्य पहाण्यात सामील करावे की काय; अशा विचारात असतानाच दारावरची घंटा वाजली. इतक्या सकाळी कोण आलं असेल; या विचारात असतानाच मी दरवाजा उघडला आणि आश्चर्य वाटले.

माझी मैत्रीण कल्पना तिच्या यजमानांना घेऊन दारातच उभी राहिली. तिच्या मिस्टरांच्या डोक्याला बँडेज बांधले होते. मी काय झालं विचारण्यापूर्वीच ती मला मिठी मारून रडू लागली. ''काय सांगू गं? यांचा पुनर्जन्म झाला. तुझ्या यजमानांना उठवू नकोस. परंतु मी माझी कथा तुम्हा दोघांना एकदमच सांगते.''

आमच्या बोलण्याच्या आवाजाने यांना जाग आली. आणि ते बाहेर आले. चहा व नास्ता झाल्यावर तिने आपली कथा सांगण्यास सुरवात केली.

''तुला ठाऊक आहेच. मला पोलीस खात्यातर्फे राहावयास जागा मिळाली. सर्व मंडळी ओळखीची होती. जागा प्रशस्त होती. त्यांच्या हुद्यांप्रमाणेच जागा होती. म्हणजे अजूनही आहे. परंतु मुंबईत हल्ली वृद्ध माणसांनी रहाण्याची लायकीच नाही. तू छान केलेस या शांतमय वातावरणात रहावयास येऊन. मुंबईची जागा भाड्याने दिलीस. त्यामुळे तुला घरची काळजी नाही. तुला आणि मला मुले असून उपयोग काय? शेवटी त्यांना अमेरिकेतच राहावयास आवडते. कारण त्या नगरीत तुम्ही एकदा राह्यला गेलात की इंडियाचं (मातृभूमीचं) प्रेम कमी होते. त्यांना तेथील जीवनच प्रिय वाटते. आपला देश त्यांना फारसा आवडत नाही. त्यांच्या त्या 'हायफाय' सवयी आपल्याला जमत नाहीत.

आम्ही इथे का आलो हे ठाऊक आहे का तुम्हा दोघांना? अगं मला काम जास्त होत नाही म्हणून मी दिवसभर राहणारी मोलकरीण ठेवली. तिने माझ्याशी गोड गोड बोलून माझ्याकडून सर्वकाही गोष्टी कुठे आहेत; मी चांदी सोने अशा मौल्यवान वस्तू कुठे ठेवते, याचे निरीक्षण केले. कुठल्या कपाटात काय आहे हे सर्व पाहून ठेवले आणि परवा मध्यरात्री गावाला जाते सांगून निघून गेली. साधारण रात्री २ की २।। वाजण्यापूर्वीच आमच्या घराची घंटा कुणीतरी वाजवली. आणि पोलीस खात्यात काम केलेले तुझे भाऊजी दरवाजा उघडून पटकन् बाहेर आले. इतक्यात त्यांच्या डोक्यावर कुणीतरी काठीने प्रहार केला. ते

रक्तबंबाळ झाले. आणि मला सुचेनासे झाले. ते बेशुद्धावस्थेत असतानाच मी पोलिसांना फोन केला. परंतु त्या दोघांनी बुरखा घातला होता आणि माझे हातपाय बांधले गेले. म्हणाले 'तुमच्या कपाटाच्या आणि तिजोरीच्या चाव्या प्रथम द्या आणि आम्हाला गुपचूप माल घेऊन पळून जाऊ द्या,' मी माझ्या घरातल्या चाव्या आणि सर्वकाही देत असतानाच, त्याने सर्व माल पटापट भरण्यास सुरवात केली. खाली एक टेम्पो उभा होता. माझ्या डोळ्यासमोर माझे दागिने, चांदीची भांडी त्यांनी बॅगेत भरली. 'आवाज काढाल तर वरती पोचवू' असे जोरात ओरडून सांगितले. खरंच आपल्या पिढीला आयुष्यात किती गोष्टी पहावयास लागतात. आपण आपलं आयुष्य किती आहे हे सांगू शकत नाही. आपली पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती चांगली होती. आपल्याला जरासुद्धा वाटले नाही की माणसे जनावरांच्यासारखी वागतील. मला वाटते; काही दिवसांनी जनावरेच आपआपसात बोलतील, 'माणसासारखा वागू नकोस. आपण प्रामाणिक जनावरे आहोत. आपण भूक लागली तरच दुसऱ्या जनावरांना मारून खातो. परंतु माणसं हल्ली खूप खादाड झाल्यात. त्यांची पैशाची भूक भागतच नाही. नुसता पैसा नाही तर आदिवासींच्या जागा डोंगरमाथ्यावर घर हॉटेलस् बांधून आपल्यालासुद्धा पळवून लावतात आणि आपण वाघ सिंह इथे तिथे फिरायला लागलो तर आपल्यालाच मारतात. खरे प्रामाणिक आपण आहोत.' असं हे जंगलचे प्राणी म्हणतात.

''खरं आहे तुझं म्हणणं, प्रेम हा शब्द शब्दकोशातून निघून गेला आणि त्याच्याऐवजी खून करणे हा शब्द घातला गेला. आपण आपल्या आईवडिलांवर प्रेम केलं. भावंडांच्यावर प्रेम केलं. सध्या मात्र माणसांचं प्रेम फक्त पैशावरच आहे. आपल्यासारख्या वृद्धांना एकटे राहणे कठीण आहे. परंतु काहीही इलाज नाही. एकतर आपल्या पिढीला परदेशातलं जीवन आवडत नाही. कारण तिथे आपण घरी असतो म्हणून कामच करीत असतो. आपला देश म्हणजे गुंडाचं माहेरघरच वाटतो. असो!''

''पुढे ऐक. आमच्या घरी चोर पळून जात असतानाच पोलीस आले. आणि त्यांनी चोरांना मुद्देमालासकट पकडलं. आम्हाला आता त्या घरात राहण्याची भिती वाटते.'' मी म्हणाले, ''कल्पना तुम्ही सध्या आमच्या घरी रहा. इथे तुम्ही जागा घ्या. आपण एकत्र या कॉलनीतच सुखाने राहू. तू कसलीही काळजी करू नकोस. आपण आपलं बालपण, कॉलेज लाईफ आणि नोकरी सुखात केली. आता आपण पाण्यावर तेल तरंगते तसं आठवणीच्या तरंगावर जगायचं. खूप हसायचं. मजा करायची. आपण आपल्यासाठी नाही; दुसऱ्यांच्या सुख दुःखात सामील व्हायचं. इथे सिनीयर सिटीझन क्लब आहे. आपण आपल्यासाठी न जगता दुसऱ्यांच्या सुखासाठी जगूया.'' कल्पना व तिच्या नवऱ्याच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून मला खूप आनंद झाला. ''स्वत:साठी जगलास तर मेलास. दुसऱ्यासाठी मेलास तर जगलास.'' हे अनंत काणेकरांच वाक्य किती सुंदर आहे. दुसऱ्यांना मदत करण्यात वेगळाच आनंद मिळतो नाही का?

*

## सैनिका प्रणाम आमुचा तुला

सीमेवरच्या सैनिका प्रणाम आमुचा तुला।
शिवरायाचा देश हा दरी कपारीचा।
रात्रंदिनी स्वप्नी येते कारगिलची भूमी।
वीर जवाना उडव चिंधड्या पाक सोजिराच्या।
कर वर्षाव गोळ्यांचा छातीवर त्याच्या
लढता लढता मिळाली तुला वीर गती।
तिरंग्यावर पडले अश्रुचे माणिक मोती।
अंधाराने गिळले घर।
घराघरातून अश्रुचे पूर।
पाक सोजिरा कीव येते तुझी मला।
मृत्युनंतरीहि मिळेना मुठमाती तुला।
हीच का रे तुम्हावरी पाकची प्रीती।
का ? उपरे म्हणून सैन्यात करती।
मृत्युनंतर दफनहि केले आम्हीच।
सलाम करून वीर गतीहि दिली आम्हीच।
मैत्रीचे नाते आमूचे असे पाक माणसा।
जयहिंद भारता जयहिंद भारता।

**-सौ. इना तळपदे**

# भीष्म

**★ सुबोध आनंद धैर्यवान ★**

माझे खरं नाव देवव्रत. मला गंगापुत्र म्हणतात पण देवव्रत माझे खरे नावं. हे रहस्य माझ्या गुप्तहेरांनी आणि तातांनी सांगितले म्हणून माझा त्यावर विश्वास. गंगेच्या वाहत्या प्रवाहावर बाणांनी रूपरेखा दाखवून बांध घातला म्हणून गंगापुत्र.

बांबू, वेळूच्या शरांनी खेळणारा साधा जीव इवलासा छोटासा, कुठं आणि कसा वाढलो मलाचं माहीत नाही. माझी माता कोण? पण राजस सुंदर राजपुत्र म्हणून लहानाचा मोठा झालो.

खरं सांगायचं तर मला माझ्या कुलाविषयी, माझ्या गत जन्माच्या पुण्याईशी काहीही संबंध नाही. मी कुणाचा पुत्र, माझी माता कोण? हेही मला नक्की सांगता येणार नाही. मात्र, पाणी आणि पोहणे मला खूप आवडायचे. ''हे पोरा इकडे ये'' अशी हाक कानी आली. मी गंगानदीच्या काठांवर यायचो. ते पण माझ्या मनाविरुद्ध.

माझ्या मातेसंबंधी खूप, अत्यंत कहाण्या ऐकण्यास मिळाल्या. ती मानवी नव्हती, गंधर्व गणापैकी एक होती. क्षणात रुप बदलणारी, क्षणात अदृश्य, दृश्य होणारी गुणवती, सुंदर आणि मायावती. ते सारं सौंदर्य मला गंगामातेकडून मिळाले असे म्हणतात. पण ते सारे पुढे तात मला म्हणायचे. या समयी पोहणे बरे नसते. सायंसमयी किंवा भल्या पहाटे चांगले असते. नाहीतर तुझा वर्ण निळसर तांबडा होईल. ते सारे मत्स्यधर पहा कसे ताम्रवर्णाचे आहेत? पण त्यांची शरीरं पहा, उंच काठीसारखी आहेत. तातांनी मला बरंच काही शिकविले, पाण्यात उभा राहून श्वास कोंडून घटका, घटका पाण्याखाली उभे रहावयाचे, सूर मारुन मत्स्या-सारखे पोहावयाचे किंवा कासवांसारखे पाठीवर पडून मकरासारखे पोटावर पडून देहकात घट्ट करावयाची.

हे सारे मी शिकलो तातांकडून. कदाचित आश्रमशाळेतून. अर्ध्या तपाहून प्रथम धावणे, मग मल्ल डावपेच, शर्यती म्हणा किंवा झाडावरून पडलेले फळ झेलणे या साऱ्या कृती मी आत्मसात केल्या. शरसंधान, पक्षी, पशु, सारे काही आणि मत्स्य यांना टिपणे हा तर माझ्या डाव्या हाताचा खेळ, त्यानंतर मात्र गुरुकुलांमधून सारे शिक्षण जवळ, जवळ एक तप, त्याहूनही जास्त. परत आलो तातांकडे. फारसे बोलणे झाले नाही. ते स्वतःच आत्ममग्न असत. एक दिवस मात्र तातांनी मला गंगातीरी शपथ वहायला सांगितली जी माझ्या गुप्तहेरांनी मला काही माहिती आधीच दिलेली होती. त्रिवार म्हण 'मी आजन्म ब्रम्हचर्य पाळेन'. कशासाठी काहीही सांगितले नाही. पण मी शपथ घेतली. तो माझा पुत्रधर्म होता. हे घराणे टिकवण्यासाठी मला सत्यवती राणीमातर्फे बोलविणे आले. हे कुल वाढविण्यासाठी दोन्ही राजपुत्रांना राजकुमारी आणावयाच्या होत्या. दोन सव्वा दोन तपांचा युवक, राजकुमारींना आणावयाची शपथ देऊन बसला होता.

परंतु माझे तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान शिकवलेले अनुभवलेले सारे काही बाजूला सारुन ते कर्म मी केले. धृतराष्ट्र आणि पंडू स्वतः सारे शिक्षण मिळालेले क्षात्र, धर्म यज्ञयाग हे सारे शिकून आलेले माझ्यापेक्षा कदाचित अर्ध्या तपांनी लहान असलेले. एक तर ते षंढ असतील किंवा अतिमायेमुळे ते षंढ झाले असतील. परचक्रांच्या टोळ्या, त्यांचे समूह आणि त्यांचे निवारण हेच कार्य मी आजन्म करीत राहिलो. माझ्या साऱ्या भावना मी मनामध्येच दडपून ठेवल्या. मला मोह नव्हता? अंबा, अंबालिका आणि अंबिका ह्यांना पळवून आणणे तेवढेच कर्म. त्यासाठी माझी जरुरी नव्हती, एका साध्या रथींनी केले असते, परंतु ते मला करावयास लागले.

पंधरा ते वीस वर्षाच्या त्या युवती त्यांच्याविषयी मला काही मोह झाला नव्हता? मी स्वत:ला 'ज्येष्ठ' म्हणतो परंतु खरं म्हणजे या कुरुकुलाचा मी 'श्रेष्ठ' युवराज. देवव्रतापासून, युवराज भीष्म नंतर आचार्य भीष्म, त्यानंतर पितामह भीष्म या माझ्या साऱ्या अवस्था मला स्वच्छ आणि स्पष्ट दिसतात आणि आता 'शरपंजरी भीष्म' ह्या साऱ्या पदव्यांचा, उपाध्यांचा मला उबग येऊ लागला आहे. पिढ्यान् पिढ्या चाललेली वृत्ती, ही परंपरा, मला हे शिकवले गेले. शाप, उ:शाप, पुण्य, पाप, देवलोक, मर्त्यलोक, तलातल, पाताळ, सप्तस्वर्ग, सप्तपाताळ यांचा अर्थ मी न जाणता ब्राह्मण म्हणतात म्हणून करीत राहिलो. मला वाटते हे सारे विकृतीने पछाडलेले मानव श्रेष्ठ आणि जेष्ठ या वादामध्ये अडकलेले अतिशुद्र मानव ह्यांना मानव म्हणणे, हे खरे पाप शिरावर घेतलेली ही जबाबदारी गेल्या दहा पिढ्यापर्यंत मी संभाळली. मला ती आता नकोशी झाली आहे.

हे वचन देणे, तो शाप घेणे, ह्यासाठी सारे आयुष्य वाया घालविणे याला अर्थ काय? दहा तपांहून अधिक वर्षे गेली असतील, आठवणी तर खूप दूर राहिल्या. या शरपंजरावर पडल्यापासून विचार आणि विचारच. मला वाटते की, मन कधीही विटत नाही. शरीर विटते. मानव, मानव्य, हे समीकरण माझ्या पूर्वजांपासून कुणालाच कळले नव्हते. माझ्यापासून कधी संतती निर्माण होणार नाही हेही मला माझ्या नियतीने सांगितले होते. कुठलाही वर घेऊन मी आलो नव्हतो आणि कुठलाही वर घेऊन मी जाणार नव्हतो.

आज माधव भेटून गेला. माझ्यापेक्षा चाळीस दशकापेक्षा लहान. या माझ्या अवस्थेमधून मला त्याला भेटण्यांचेही शक्य नव्हते. त्याची सारी वाढ, त्याचे शैशव त्याचे तारुण्य मला मनापासून मोहविले गेले. त्या छोट्या मूर्तीमध्यें असलेली ताकद आणि मनामध्ये असलेले बल मला नेहमीच आकर्षित करत होते. तत्त्वज्ञान, कला, धर्म, देवगण, गंधर्वगण, मनुष्यगण ह्या साऱ्या चर्चा महालात घडावयाच्या. परंतु वर्गाविषयी कधी चर्चा झालेली मला आठवत नाही. वर्ण तर नाहीच नाही. कुरुकुलाच्या वंशवृद्धीसाठी मी तीन राजकन्या त्यांच्या गृहामधून हिरावून आणल्या. केवळ मातेचे वचन म्हणून किंवा फक्त ह्या कुलाचा उद्धार करावयाचा म्हणून. त्या सुंदर राजकुमारींचा मला मोह झाला नाही ही शक्यता माझे मन आणि शरीर नाकारू शकत नाही. माझे मन त्यावेळीही जागृत होते, आताही आहे. अर्जुनाबरोबर खेळलेले त्याच्या अगदी बालपणापासून शरयुद्ध, माझ्यावर सोडलेले त्याचे लहानसे शर ते मी पाठीवर झेलत असे. परंतु या खऱ्या युद्धामध्ये मी पाठीमधून शर काढतोय की पाठीच्या भात्यांमधून हेच मला कळत नव्हते.

अत्यंत कौतुकाने मी त्याला सांगत होतो, 'अरे अजून ते शर टाक कारण माझी पाठ अधिक त्या शरांनी भर संपूर्ण आच्छादित कर, आता पाठीवर पडण्याचा माझा अधिकार मला दे' आणि मी त्याला त्याच्या बालपणी कौतुकाने दिलेला शर त्याने माझ्या कटीबंध सोडला. आत्मघात करण्याचा जो अधिकार मला नाही तो आप्ताला दिलेला बरा.

क्षणभर मला मुर्च्छा आली आणि त्यानंतर मला काहीच आठवत नाही.

मी शुद्धीवर आलो त्यावेळी कुणीतरी माझ्या मुखावर शरीरावर जलसिंचन करीत होते. आता मन आणि शरीर दोन्ही थकले होते.

वृद्धत्व माझ्या नेत्रांमधून वाहत आहे. मी फक्त वाट पहात आहे. माझ्या निर्वाणाची. ते देखील माझ्या हातांमध्ये नाही. माझ्या स्वभावामुळे मला कधीच बोलता आले नाही. प्रत्येकाचा एक पिंड असतो आणि तो कधीच बदलता येत नाही.

जे माझ्यामध्ये नव्हते, माधवाने ते केले होते. त्याचे बंधुप्रेम बलराम आणि त्याचे ऐक्या पेक्षाही घट्ट असलेले नाते, मला खूप आवडले होते.

गृहामधील असलेला कलह मी कधीही विसरू शकलो नाही. हे माझे संचित किंवा माझा असलेला धाक.

माझ्यामध्ये धाक कधीही नव्हता. परंतु प्रत्येक स्त्रीने प्रत्येक पुरुषाने मला दिलेला मान मला दुखवून गेला.

धर्म आणि दुर्योधन, त्यांची एकमेकांशी असलेली लढाई कमी करण्याचाही मी प्रयत्न केला परंतु माझ्या हातून तेवढेच घडले, यापुढे मला काही करताही आले नाही.

द्रुपदाचा पुत्र त्याचे सारथ्य करीत होता. मी अर्जुनावर सोडलेला प्रत्येक शर तो चपळाईने चुकवीत होता. युद्धांच्या नियमांप्रमाणे सारथ्यावर शर सोडणे हे नियमबाह्य होते. अर्जुनाकडून आलेला प्रत्येक शर मी पाठीवर घेत होतो. खरा योद्धा ते कधीच करीत नाही. आता निव्वळ वाट पहावयाची ती त्या अंतिम क्षणाची.

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# जय बंगाली मलीक बाबा

✶ सौ. जयमती जयपाल तळपदे ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

रुहीला तिच्या मैत्रिणीने, प्रियाने तो बोर्ड दाखविला आणि म्हणाली, ''हे बंगाली मलीक बाबा आहेत ना, ते म्हणे खूप पॉवरफूल आहेत हं. त्यांचे ते वशीकरण, नोकरीत यश, प्रेमप्रकरणात यश, सवतीची भानगड वगैरे सॉलीड लागू पडतं हं. रुही तू का नाही जाऊन भेटत त्यांना? माझ्या शाळेतल्या एका मैत्रिणीचा नवरा ऑफिसात एका लफड्यात अडकला होता. ती गेली यांच्याकडे आणि बघता बघता सुटला नं गं तो त्या भानगडीतून'' रुही आणि प्रिया ट्रेनमधून घरी चालल्या होत्या.

रुही चांगली बँकेत नोकरीला होती. तिचा नवरा हिरेन पण एका खाजगी कंपनीत चांगल्या पोस्टवर होता. सर्व काही छान होते. त्यांना पाच वर्षाची एक मुलगी होती. साक्षी. पण अलीकडे रुहीला सारखे वाटत होते की, हिरेनचे त्याच्या सेक्रेटरीशी सूत जमले आहे. ती तशी कंपनीत नवीनच होती, हुशार होती आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणे एकदम स्मार्ट होती. हिरेनचे ऑफिसमध्ये कामाच्या गडबडीत खाण्यापिण्याकडे काही लक्षच नसायचे. पण आता तीच त्याची सर्व काळजी घ्यायची. त्यामुळे तो घरी तिचे बरेच कौतुक करायचा. अलीकडे तर रोज रात्री आणि सकाळी तिला फोन असायचाच. फोन सुरू झाला की तो रुहीला कधी कॉफी तर कधी नाश्ता असे काहीतरी काम सांगून तिथून घालवायचा. मध्ये मध्ये 'हाऊ स्वीट' 'हाऊ नाईस'.

'सो स्वीट ऑफ यू' वगैरे चालू असायचे. खरं तर पूर्वी तो घरी आल्यावर कधीच ऑफीसचे काम करत नसे. पूर्ण वेळ रुही आणि साक्षीला देत असे. पण हल्ली मात्र सर्व चित्रच बदलले होते. तो ऑफिसला जायलाही लवकर लागला होता आणि घरीही उशीरा यायचा.

एकदा रुहीने त्याला स्पष्टच विचारले तर तो म्हणाला, 'आयडिया काही वाईट नाही, पण ती खूपच लहान आहे गं. अगदीच विशीतली आहे.' आणि हसून त्याने तो विषय धुडकावून लावला होता. वर हल्ली तो घरी येईपर्यंत इतका थकलेला असायचा की परत तो अप्रिय विषय काढणे तिला योग्य वाटत नसे. पण संशय मात्र हळूहळू बळावतच होता.

याविषयी ती आपले मन आपल्या ऑफिसातल्या जवळच्या दोन मैत्रिणींकडे मोकळे करत असे. रुही, प्रिया आणि मीना असा तिघींचा ग्रुप होता. आणि आज प्रियाने तिला ही बंगाली मलीक बाबाची माहिती दिली होती. जावे का त्या बाबाकडे? पहावे का काय म्हणतात ते? पटलं तर करुया नाहीतर सोडून देऊ. हिरेनला तर काही सांगावेच लागणार नाही आणि त्याला काही कळणारही नाही. बाहेरच्या बाहेर प्रयत्न करायला काय हरकत आहे? पण त्याला कळले तर मात्र आपली खैर नाही. खरंच असेल का त्याचे त्या पोरीशी लफडे? नसेल तर उगीचच त्याचा संशय घेतला असे होईल आणि त्याला कळले तर आपण त्याच्यावर अविश्वास दाखवला असे त्याला वाटेल. काय बरे करावे? शेवटी होय नाही करत तिने बाबांची शनिवारची दुपारची अपॉइंटमेंट घेतली. शनिवारी तिचे ऑफीस अर्धा दिवसच असायचे आणि हिरेन काही घरी सातच्या आत यायचाच नाही. त्यामुळे हे काम दुपारीच होण्यासारखे होते. शिवाय त्याला पत्ताही लागला नसता.

बाबांचे प्रशस्त ऑफिस प्रीतम बिल्डींगच्या तळमजल्यावरच होते. गेल्याबरोबर एका चुणचुणीत मुलीने तिचे नाव वगैरे विचारून, तिला बसायला सांगून ती आतल्या केबीनमध्ये गेली. पाच मिनिटातच रुहीला आत बोलावणे आले. बाबा पन्नाशीचे दिसत

होते, तेजस्वी वाटत होते. केबीनमध्ये धूप आणि उदबत्तीचा सुगंध दरवळत होता. त्यांच्यामागे हनुमानाची मोठी तसबीर होती. त्यांनी तिला प्रश्न विचारायला सांगितले. रुहीच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. रडतच तिने म्हटले, ''बाबा, मला वाटते माझा नवरा त्याच्या सेक्रेटरीच्या प्रेमात पडलाय. नक्की माहीत नाही, पण तुम्ही तुमच्या दिव्य दृष्टीला काय दिसते ते पाहून मला सांगा व यातून त्याला बाहेर कसे काढायचे तेही सांगा.''

''हूं!'' बाबांनी हुंकार भरून डोळे मिटले व ते कुठेतरी अज्ञानात पाहू लागले. त्या खोलीतील ती शांतता आणि स्तब्धता रुहीला असह्य होऊ लागली ''असं आहे तर!'' बाबा डोळे उघडून म्हणाले, ''तुमचे कुलदैवत कोण आहे? त्याचे काही उपवास वगैरे करता की नाही?'' रुहीला ॲसिडिटीचा त्रास असल्याने ती एकही उपवास करत नसे. तिने तसे सांगताच बाबा म्हणाले, ''बेटा तेच तर कारण आहे. तू एकवीस शुक्रवारी उपवास कर आणि देवीला नारळ वहा. रोज दुर्गास्तोत्र वाच. ही उदीची पुडी तुझ्या नवऱ्याच्या उशीखाली रोज ठेवत जा. आणि प्रार्थना कर की ''हे माते, माझ्यावरचे हे संकट दूर कर. मग बघा कसा चमत्कार होतो ते. जा बेटा, आता घरी जा.'' बाबांच्या केबीनमधून बाहेर पडल्यावर त्या चुणचुणीत मुलीने तेथे ठेवलेल्या एका पेटीकडे बोट दाखवले. त्यावर लिहिले होते, 'येथे कमीत कमी पाचशे रुपये दान करा, हे पैसे अनाथ मुलांना शिक्षणासाठी दिले जातात.' रुहीने पर्समधून हजार रुपये काढून त्या पेटीत टाकले. 'हे ही पुण्यच आहे' तिच्या मनात आले. आता आपले काम होणारच असा विश्वास तिच्या मनात आला आणि ती लगबगीने घराच्या दिशेने निघाली.

हिरेन त्या दिवशी आपल्या एका क्लायंटला भेटायला दुपारीच ऑफिसमधून बाहेर पडला. गाडीत मागे बसून तो आपल्या लॅपटॉपवर काही काम करत होता. त्याने सहजच मान वर केली आणि त्याला रुही त्या मलीकबाबांच्या ऑफिसातून बाहेर पडताना दिसली. तो जरा चक्रावलाच. ''ही येथे काय करत होती?'' एवढ्यात त्याची नजर त्या भल्यामोठ्या पाटीवर गेली. ''या, बंगाली मलीक बाबा तुमच्या मदतीसाठीच आले आहेत. वशीकरण, नोकरीत, प्रेम प्रकरणात यश, दुर्घटना, संकटे, सवतीपासून सुटका वगैरे वगैरे, या सर्वांची समाधानकारक उपाय उत्तरे येथे मिळतील.'' हिरेनने ड्रायव्हरला गाडी जरा हळू चालवायला सांगून पूर्ण बोर्ड वाचला. त्याच्या तल्लख मेंदूने काही समीकरणे पटावर मांडली. जर आपली शंका खरी असेल तर मामला फारच गंभीर दिसतोय. आजच्या मिटींगनंतर हा प्रश्न तातडीने सोडवायला हवा नाहीतर प्रकरण हाताबाहेर जाईल. रुहीने तेवढ्यात रिक्षा थांबवली व तीही निघून गेली. हिरेनने डोके परत आपल्या लॅपटॉपमध्ये घुसवले. मन एकाग्र करण्याची त्याची क्षमता वाखाणण्याजोगी होती. मिटींग अगदी त्याला हवी तशी पार पडली. तो एकदम खुश झाला.

खरं तर त्याला लगेच घरीच जायचे होते. बऱ्याच दिवसांनी तो एवढ्या लवकर मोकळा झाला होता. पण काहीतरी ठरवून त्याने ड्रायव्हरला रजा दिली व तो सी.सी.डी.त गेला. त्याने एक कडक कॉफी मागवली आणि शांतपणे विचार करू लागला. हल्ली रुही जरा जास्तच चिडचिड करत होती. खरं तर तिचा स्वभाव खूप आनंदी होता. एवढं खरं की कंपनीने काही परदेशी क्लायंटस् घेतले होते पण त्यासाठी लागणारी तयारी मात्र कंपनीची झाली नव्हती. ह्या प्रोजेक्टची पूर्ण जबाबदारी त्याच्यावरच टाकण्यात आली होती. त्यामुळे त्याच्यावरचा कामाचा बोजा अचानकच एकदम वाढला होता. निरनिराळे प्लॅन्स तयार करणे, कर्मचाऱ्यांना काम शिकवणे या आणि अश्या अनेक कामांमुळे त्याला घरासाठी द्यायला वेळच मिळत नव्हता. सकाळी लवकर निघावे लागे तर; संध्याकाळी घरी परतायला रात्र होई. गेल्याबरोबर घरी साक्षी त्याचा ताबा घेई आणि ती झोपेपर्यंत रुहीपण थकलेली असे आणि त्याचेही डोळे मिटायला लागत. त्यामुळे या कामाबद्दल त्याचे रुहीशी स्पष्ट असे बोलणे झालेच नव्हते. 'आता कामामुळे मला यायला उशीर होईल' एवढेच त्याने तिला सांगितले होते. कितीतरी दिवसात त्याला रविवारची सुट्टीसुद्धा मिळाली नव्हती. त्याला एकदम रुहीने विचारलेल्या प्रश्नाची आठवण झाली. काय रे, आजकाल खूप खूष दिसतोस. हल्ली घरी पण उशीरा येतोस. त्या नवीन सेक्रेटरीशी काही गडबड करत नाहीयेस नं?' तेव्हा त्याने तो विषय चेष्टेने उडवला होता आणि नंतर विसरूनही गेला होता. पण आता मात्र एक अधिक एक केल्यावर

आपलाच अंदाज बरोबर वाटू लागला. ‘आजकालच्या सर्व घटना पाहिल्यावर रुहीला संशय येणे साहजिकच होते. पण तिने आपल्याला आधी का नाही विचारले? एवढाही विश्वास उरला नाही का आपल्यावर की तिने असल्या कुठल्यातरी बाबाची मदत घ्यावी? एरवी खरं तर ती पण असल्या बाबाबिबांची टर उडवते. बापरे! म्हणजे गोष्टी ह्या थराला गेल्या की काय? आपलंच चुकलं. आपण कामाच्या गडबडीत तिच्याकडे लक्ष द्यायला विसरूनच गेलो.’’

त्याने लगेच मीनाला फोन लावला. तिचे आणि तिच्या नवऱ्याचे त्यांच्याकडे बरेच जाणे येणे होते. तिच्याकडून बरोबर माहिती मिळाली असती. मीनाने लगेच फोन उचलला आणि म्हणाली.

‘‘तुला बरा वेळ मिळाला आज माझ्याशी बोलायला?’’

‘‘हो गं. एक काम होतं. ए रुही आज प्रीतम टॉवरमध्ये कशाला गेली होती गं?’’ हे ऐकून मात्र मीनाने एकदम तोंड सोडले; ‘‘ए तू काय तिच्यावर संशय घेतोस? तुझ्यामुळे ती किती अस्वस्थ आहे माहीत आहे का? काय लफडी करतोस रे तू ऑफिसात? तुला तिला द्यायला वेळच नाही आजकाल?’’

आणि मग ते दोघे जवळजवळ अर्धा पाऊण तास फोनवर बोलत होते. पण तिला हे बाबा प्रकरण मात्र माहीत नव्हते. याचा अर्थ हा निर्णय रुहीने होना करता करता एकटीनेच घेतला होता. त्याला फार वाईट वाटले. किती घालमेल होत असेल तिच्या मनाची? तिने जेव्हा पहिल्यांदाच आपल्याला सेक्रेटरीवरून विचारले तेव्हाच आपण चेष्टा न करता आपल्या ह्या नवीन कामाच्या स्वरूपाबद्दल सांगायला हवे होते. तिचे फार प्रेम आहे आपल्यावर म्हणून तर मन चिंती ते वैरी न चिंती असे झाले तिचे. मग काहीतरी विचार करून त्याने पटापट काही फोन केले व तो सावकाश घरी गेला.

दारावरच्या घंटीचा आवाज ऐकून साक्षी धावत आली. त्याने तिला नेहमीसारखे उचलून घेतले. पण त्याचा चेहरा गंभीर होता. जेवण आटपून तो पटकन झोपलासुद्धा. रविवारी खरं तर रुहीचा वाढदिवस होता. ते दरवर्षी बाहेर जेवायला जात. वाढदिवशी तिने पूर्ण विश्रांती घ्यायची असा त्याचा हुकूम होता.

## सावली

जीवनाच्या मार्गावरती
उभे राहिले शैशव सुंदर
रविकिरणांनी उजळून गेली
चैतन्याची मूर्ती मनोहर।।

सुंदर सोनेरी किरणांनी
बालमूर्ती ती प्रसन्न झाली
सामोऱ्या मार्गावर पडली
आकांक्षांची सम्य सावली।।

व्यक्तित्त्वाची उंची घेऊन
सामर्थ्याची घेऊन चाहूल
पकडण्यास सावली तत्क्षणी
निरागसता उचली पाऊल।।

परि सावली पुढेच पळते
हाती कधीही मुळी नच येते
तरी धावतो मानव पाठी
येते हाती तोच निसटते।।

पळता पळतां ऊन तापते
वास्तवाची जाणीव होते
श्रमपरिहारास थांबता
सावली ही लुप्तच होते।।

अखंड धावून जीवही थकतो
सावलीचा नाद सोडतो
निरूपायाने अखेर अपुला
जीवनाचा मार्ग बदलतो।।

आयुष्याच्या सायंकाळी
हळूच जेव्हा मागे बघतो
तीच सावली पाहून मागे
मनात थोडा विचलित होतो।।

प्रथम सावलीपाठी पळतो
तेव्हा हाती लागत नाही
आता त्याच्या पाठी येते
तेव्हा त्याला जरूर नाही।।

**सौ. उज्ज्वल र. ब्रम्हांडकर**

पण आज तो उठलाही उशीरा. त्याला बहुधा तिच्या वाढदिवसाची आठवण नसावी. कारण उठल्यावरही त्याने तिला शुभेच्छा दिल्या नाहीत. साक्षी उठली आणि तिने त्याला विचारले, ''बाबा आज आईचा हॅप्पी बर्थडे आहे. तुला माहीत आहे ना?'' ''अरेच्चा? विसरलोच आणि प्रेझेंट पण आणायचे राहिले ना त्यामुळे. आता काय करुया?''

''काही करू नकोस. विसरलास ना? मग आता प्रेझेंटची काय गरज?'' रुही रडवेली होत म्हणाली. आता तर तिची खात्रीच पटली की हीरेन आपला राहिलाच नाही. खरं तर काल मलीक बाबांकडून आल्यापासून तिला लढाई जिंकल्यासारखेच वाटत होते. कितीही त्रास झाला तरी ती उपवास करणार होती. पण आता मात्र तिला आपण पूर्ण हरलो आहोत असे वाटू लागले. सकाळच्या आंघोळी, नाश्ता सारे मुकाट्यानेच पार पडले. रुहीला तर सारखे रडूच कोसळत होते. एवढ्यात दारावरची बेल वाजली. हिरेन हॉलमध्ये पेपर वाचत होता. पण ढिम्म जागचा हलला नाही. ''बेल वाजतेय. दार उघड'' तो बसल्या जागेवरूनच ओरडला. रुहीच्या डोळ्यातून आता पाणीच यायला लागते. ते हाताने पुसून तिने दार उघडले आणि तिचे डोळे विस्फारले. दारात मीना, प्रिया सहकुटुंब सहपरिवार उभे होते. त्यांच्याबरोबर एक गोड मुलगी होती. साऱ्यांनी तिला दारातूनच वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रुही रडण्याचे विसरूनच गेली. त्याच्या मागोमाग केकवाला केक घेऊन आणि पुष्पगुच्छवाला तिची आवडती ऑर्कीड्स घेऊन हजर झाले. घरातील वातावरण एकदम बदलले. ''ही मनवा, माझी सेक्रेटरी.'' हिरेनने रुहीशी ओळख करून दिली.'' त्या गोड निष्पाप चेहऱ्यामागे माझ्या नवऱ्याला पळवणारी चेटकीण लपली आहे. आज तिचे इकडे काय काम आहे? आता तिची मजल घरापर्यंत आली?'' रुहीच्या मनात आले. इतक्यात मीनाने तिच्या हातात एक बॉक्स दिले आणि म्हणाली, ''चल, पटकन हा ड्रेस चढवून ये.'' ''काही नको'' रुही कडवटपणे म्हणाली. ''रुही शहाणपणा करु नकोस. मी सांगते ते ऐक.'' मीनाने आपला दोस्तीचा अधिकार गाजवत म्हटले. सगळ्यांसमोर शोभा नको म्हणून रुही गुपचूप आत गेली आणि जरा तोंड धुवून तो नवीन ड्रेस चढवून आली.

तोपर्यंत बॉक्समधला केक टीपॉयवर विराजमान झाला होता. शेजारीच एक मेणबत्ती आणि काडेपेटी विसावत होती. रुहीने केकवर नजर टाकली. त्यावर लिहिले होते.

"To our dearest Ruhi - Aai from hiren & Sakshi"

''अरे बापरे म्हणजे माझा वाढदिवस ह्याच्या लक्षात होता.'' तिला थोडे वरमल्यासारखे वाटले. मग केक कापण्याचा कार्यक्रम पार पडला. पाहुणे मंडळींनी वाढदिवसाच्या भेटी दिल्यानंतर हीरेन सावकाश उठला. त्याने खिशातून एक डबी काढली; ती उघडली आणि त्यातून त्याने हिऱ्याचे पेंडण्ट असणारे एक मंगळसूत्र काढले. त्याने ते तिच्या गळ्यात घातले. डबीच्या आत लिहिले होते. ''हिरा है सदाके लिए.'' रुही कधीतरी लाडाने त्याला हिरा हाक मारायची. ते वाचले आणि रुहीच्या डोळ्यातून अश्रूंच्या सरी वहायला लागल्या.

हिरेनने तिचे डोळे पुसले आणि तो तिला सांगू लागला, ''रुही, मनवा मला धाकट्या बहिणीसारखी आहे. खरं तर तिचा कॉलेजपासूनच एक बॉयफ्रेंड आहे आणि तो नोकरीत स्थिर झाला की ते लग्न करणार आहेत. अगं, ऑफिसमध्ये मी एका मोठ्या गोपनीय प्रोजेक्टवर काम करत होतो, आणि त्यामुळेच खूप बिझी होतो. पण तरी मी तुला सर्व वेळेवरच सांगायला हवे होते. मला कधी वाटलंच नाही तू माझ्यावर संशय घेशील म्हणून'' रुहीला हे सर्वांच्या देखत ऐकल्यावर फारच शरमल्यासारखे वाटू लागले ''काय तू सगळ्यांच्यासमोर माझी इज्जत काढतोस?'' ती म्हणाली, ''अगं पण हे सर्व या सर्वांना आधीच माहीत होते ना. मी फक्त पब्लीकमध्ये सॉरी म्हणतोय. पण एक आहे हं; तुझे ते बाबा मलीक सॉलीड पॉवरफूल आहेत. मला त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी तुला दिलेली उदीची पुडी मी माझ्या उशीखालून काढून तुझ्या उशीखाली ठेवली आणि माझी नसलेली भानगड खरोखरच नाही ह्याची तुला खात्री पटली.''

जय बंगाली बाबा!''

आणि त्या खोलीत हास्याचा एक मोठा बॉम्बस्फोट झाला.

*

# माझ्या मुली

(जयकर) मेधा आमची मेधाविनी, बघता, बघता मोठी झाली.
द्विपदवीधर होऊनी आता ती, बँकेत पदाधिकारी बडी झाली.
प्रेम, सेवा, सर्वांना देई, अशी आहे ही सुगृहिणी
(अजिंक्य) वर्षा आमची सदा हसरी, सव्वीस जानेवारीची परेड गाजवली
कुकिंग, ड्रायव्हिंग, ग्लायडिंग येई, शिकवी जपान्यांना हिंदी, हिंदींना जपानी।
हर्बल मेडिसिन्सचा प्रसार करी, आहे हीही एक सुगृहिणी।
(कोठारे, शर्मा) - मनिषा अमुची आहे कवयित्री, स्कॉलर वास्तुशास्त्राची, युनिव्हर्सिटीत पहिली
निबंध स्पर्धा जिंकीत, सेमिनार्सना चालली, करतेय नोकरी तरीही सुगृहिणी।
(कोठारे) - प्रतिमा आमची डॉक्टर झाली, सेंटाक्लॉस जणु, परदेशवाऱ्या करी
भेटवस्तुंची खैरात करी, पेशंटसह संभाळतेय ही घरगृहस्थी।
(नामक) मेघना आमची बँकेत अधिकारी, स्नेह अंतरी, भेटते कधीतरी
सहलीची हौस हिला भारी, संभाळते गृहिणी सर्वांना घरीदारी।
(कोठारे) प्रिया आमची डॉक्टर दुसरी, परदेशीही आम्हा ना विसरी
पार्ट्या देई करून नोकरी, मित्रमैत्रिणी जमवते ही गृहिणी।
(कोठारे भट) नैना शेंडेफळ ही आमची, तरीही ना मुळीच लाडावलेली
ट्रेकर, बास्केटबॉल प्लेअर नागपूरची, मुंबईत धावतेय लोकलशी
जमवलीय छान घडी संसाराची, म्हणुन हीही उत्तम गृहिणी।
(सप्रे, कोठारे) - ज्योत्स्ना असते आमची परदेशी, डायेटिशिअनची मिरवतेय पदवी
सासुला म्हणते प्रेमाने मावशी, गृहिणी ही आहे सॅलेड राणी।
(तळपदे) उर्मिला आमची फॅन योगची, लाडकी सर्वांची, बेकिंग राणी
डायेट सांभाळुन प्रेम सर्वांशी, अशी आहे उत्तम गृहिणी।
(भडंग) - अनिता आमची रिसेप्शनिस्ट खरी, गोड आवाजात गुडमॉर्निंग करी
मदतीच्या हांकेस 'ओ' देई, रेणुकामाउलीच जणु ही गृहिणी।
(कोठारे) सुचेता आमची आहे सौदामिनी, झळकली मेरिटबोर्डवर कायदेपंडित खरी
परदेशी राहुनही गृहसेवेत रमली, बनली एक उत्तम गृहिणी।
(त्रिलोकेकर) - विद्या आमची हुशार भारी, महिलासमाजस्पर्धेत पाहिली, दुसरी
प्रेमवर्षाव सदा करी, हीही एक मस्त गृहिणी।
आकारान्त नावाच्या या साऱ्याजणी, ईकरान्त फक्त यांची ताई
(तळपदे, सोनेजी) डॉक्टर ज्योती आदर्शच साऱ्यांची, बालरोगतज्ज्ञ, रोटरीतर्फे सेवा करी
साऱ्यांशी वागे मिळुन मिसळुनी, हीही आहे छान गृहिणी।
प्रत्येकीची क्षेत्रे वेगवेगळी, साऱ्या माझ्या प्रेमळ मैत्रिणी
स्नुषा मुलींची ही मांदियाळी, देवाने मला मस्त दिली
त्याची मी खूप खूप ऋणी, आहे मीही एक तृप्त गृहिणी

**- कल्पना सुभाष कोठारे**

# इतिहासाची उलटता पाने

# कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे

(या दिवाळी अंकात रंगचित्रांवर विशेष झोत आहे. त्याला पूरक असा 'आपले वाङ्मयवृत्त' मध्ये दीपक घारे यांनी लिहिलेला हा लेख साभार प्रकाशित करीत आहोत

**- संपादक)**

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध आधुनिक सामाजिक, राजकीय विचारांच्या दृष्टीने महत्त्वाचा कालखंड मानला जातो. याच काळात वास्तुकला, चित्रकला अशा कलेच्या क्षेत्रांतही बरेच बदल घडून आले. ब्रिटिशांमार्फत आलेला पाश्चात्य कलाविचार आणि कलेतील भारतीयत्व यांच्या संयोगातून 'बॉम्बे स्कूल'ची निर्मिती झाली. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून सुरू झालेल्या या कलापरंपरेचा सुरुवातीचा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर रावबहादूर म. वि. धुरंधर यांचं 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' हे आत्मकथन वाचायलाच हवं. यथार्थवादी भारतीय चित्रकलेच्या अभ्यासकाला या पुस्तकाची दखल घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. त्यामुळे कलाविषयक मराठी आणि इंग्रजी लेखनात या पुस्तकाचा संदर्भ अनेकदा दिला जातो. चित्रकलेशी संबंधित समकालीन चित्रकारांचा, शिल्पकारांचा, तसंच जे. जे. मधील शिक्षकांचा यात उल्लेख आलेला आहे. शिल्पकार म्हात्रे यांनी विद्यार्थीदशेत केलेल्या 'मंदिरपथगामिनी' या शिल्पाची हकिकत त्यात आहे. जे. जे मधला चाळीसएक वर्षांचा प्रत्यक्षदर्शी आणि विश्वसनीय असा इतिहासच या आत्मकथनातून येतो.

जन्मापासून ते अखेरपर्यंतच्या सगळ्या घटना सांगणारं हे आत्मचरित्र नाही. आयुष्यातील बऱ्यावाईट सत्यघटना सांगून आप्तेष्टांचा रोष ओढवून घेण्यापेक्षा फक्त जे. जे. मधील कारकीर्दच लिहिण्याचा निर्णय धुरंधरांनी घेतला. जनरल नानासाहेब शिंदे ह्यांचं एका शिपायाचे आत्मवृत्त हे पुस्तक वाचून धुरंधरांना प्रेरणा मिळाली आणि ८ जानेवारी १८९० ते ३१ जानेवारी १९३१ पर्यंतची इत्यंभूत हकिकत धुरंधरांनी या आत्मवृत्तात मांडली. हे सर्व सत्य अनुभव आहेत असं धुरंधरांनी सुरुवातीच्या निवेदनातच सांगितलं आहे. या हकिकतीमध्ये जे. जे. चा अभ्यासक्रम, तिथले वातावरण, तिथली कला-निर्मिती याबद्दल सविस्तर माहिती आहे आणि धुरंधरांची विद्यार्थीदशेपासून प्रतिष्ठित चित्रकारापर्यंतची होत गेलेली यशस्वी वाटचालही आहे. चित्रकलेवरील निष्ठा, कौटुंबिक जिव्हाळा आणि निवेदनातला प्रांजळपणा यामुळे हे आत्मकथन रंजक आणि उद्बोधक झालं आहे. या आत्मकथनाला काही पत्रांची, छायाचित्रांची जोड दिलेली आहे. शेवटी तर अनेक समकालीन चित्रकारांची छायाचित्रं दिलेली आहेत. त्यातली काही प्रसिद्ध नावं सोडली तर इतरांची आज माहितीही उपलब्ध नाही. आत्मवृत्ताच्या दृष्टीने या जंत्रीवजा संदर्भ साहित्याला फारसं महत्त्व नसलं तरी त्या काळचा दस्तऐवज म्हणून त्याला वेगळं महत्त्व आहे. अनुभवाची सत्यता आणि महत्त्वाच्या घटनांची, व्यक्तींची नोंद असाही एक उद्देश या आत्मवृत्तामागे दिसतो. धुरंधरांच्या या दृष्टिकोनामुळे या पुस्तकाला एक विश्वासार्हता प्राप्त झालेली आहे.

या पुस्तकातला आशय दोन प्रकारचा आहे. कौटुंबिक पातळीवरचा विद्यार्थीदशा, गृहस्थाश्रम आणि व्यक्तिगत यश यांचा वेध घेणारा स्मरणरंजनात्मक आशय हा पहिल्या प्रकारचा तर दुसरा प्रकार म्हणजे दृश्यकलेचं तत्कालीन वातावरण जिवंत करणारा सामाजिक आशय.

### कौटुंबिक आशय

धुरंधरांचं शालेय शिक्षण कोल्हापूरमध्ये झालं. चित्रकलेची त्यांना आवड होतीच. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते मुंबईला आले आणि सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट पाहण्याची त्यांना संधी मिळाली. जे. जे. च्या प्रथम दर्शनाने ते भारावून गेले आणि कलासंस्थेत प्रवेश घेण्याचं त्यांच्या मनाने घेतलं. जे. जे. च्या या अनुभवाबद्दल त्यांनी लिहिलं आहे.

''आम्ही दोघे प्रथम दर्शनीच असलेल्या हॉलमध्ये उत्सुकतेने शिरलो. मी तर अगदी चकीत होऊन इकडेतिकडे भांबावल्यासारखे पाहू लागलो. प्लॅस्टर ऑफ पॅरिसचे एकेक भव्यआणि शुभ्र पुतळे पाहून मी स्वप्नात आहे की काय असा भास होऊ लागला. त्या वेळेस त्या हॉलमध्ये तेवढेच पुतळे शोभिवंत दिसत होते. 'व्हीनस डी मेडिसी', 'आपोलो बेलव्हिडेर', 'यंग आपालो', 'आपोलो सारीक्टोनस', 'डिस्कोबोलस' आणि 'रेस्टलर्स' वगैरे अत्यंत भव्य पुतळे पाहून डोळे दिपून गेले. आणि हा एवढा मोठा संग्रह कशासाठी ठेवला आहे याची कल्पनाच येईना... त्या पुतळ्याकडे पहातच इकडेतिकडे घिरट्या मारू लागलो पण तृप्ती होईना... शाळेच्या आवारातून रस्त्यावर आलो, तरी दृष्टिसमोरून ते पुतळे हलेनात. अगदी भ्रमिष्टासारखे वाटू लागले.''

धुरंधर त्यांचे स्नेही आणि जे.जे. चे विद्यार्थी असलेले पुणेकर यांच्याबरोबर आले होते. धुरंधरांची ती भारलेली अवस्था पाहून पुणेकरांनी त्यांना 'जे.जे.त प्रवेश घे' म्हणून सांगितलं. धुरंधरांच्या वडील बंधूंचा विरोध होता. पण त्यांचं मन वळवून पुणेकरांनी अखेर धुरंधरांना जे.जे.त प्रवेश घ्यायला प्रोत्साहन दिलं आणि १८९० च्या जानेवारीत धुरंधर जे.जे.त दाखल झाले.

त्या काळात चित्रकलेला फारशी प्रतिष्ठा नव्हती. ''ड्रॉईंग शिकून पन्नास रुपयाचा ड्रॉईंग मास्तर होऊन जन्म काढायचा आहे की काय?'' धुरंधरांचे वडील बंधू बळवंतराव यांची पहिली प्रतिक्रिया अशी तिरस्काराने भरलेली होती. व्हाइस प्रिन्सिपल ग्रीनवूड ह्यांनीदेखील पहिल्या दिवशी, ''तू कॉलेज शिक्षण न घेता इकडे का आलास?'' असा प्रश्न केला. धुरंधरांनी चित्रकलेची आवड हे कारण दिल्यावर मात्र ते खुश झाले, थर्ड ग्रेडच्या परीक्षेनंतर वाडिंग्टन प्राईस व शिष्यवृत्ती मिळाल्यावर धुरंधर कोल्हापुरास गेले तेव्हा वडिलांना आनंद झाला आणि आल्या-गेलेल्यांना ते मुलाचं कौतुक सांगू लागले. पुढे १८९५ मध्ये बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात धुरंधरांच्या चित्राला सुवर्णपदक मिळालं. दिवंगत वडिलांची आठवण येऊन धुरंधरांना त्या आनंदाच्या प्रसंगी रडू कोसळलं. आपल्या बंधूंना ते म्हणाले, ''सात वर्षांपूर्वी पुण्याच्या इंडस्ट्रियल एक्झिबिशनमध्ये कोल्हापूरचे चित्रकार आबालाल रहिमान यांस सुवर्णपदक मिळून त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले होते. त्यावेळी आमच्या वडिलांनी ''महादेव, तुला असे पदक मिळायला हवे.'' असे उद्‌गार मजजवळ काढले होते... त्या उद्‌गाराचे स्मरण होऊन मला रडे कोसळले.''

धुरंधर आपल्या वडिलधाऱ्यांबद्दल, मग ते वडील असोत अथवा गुरुजन असोत किती भावनाप्रधान आणि कृतज्ञ होते ते अशा ह्या प्रसंगांमधून दिसून येतं. ग्रीनवूड यांच्याबाबतचाही असाच एक प्रसंग आहे. धुरंधरांच्या वडील बंधूंचे धुरंधरांना दुसऱ्या नोकरीत चिकटवण्याचे उद्योग चालूच होते. अशीच एका खात्यात ड्राफ्ट्समनची जागा होती. त्यासाठी बंधूंनी धुरंधरांना प्रिन्सिपल ग्रीनवूडच्या सहीने अर्ज करण्यास सांगितलं. ग्रीनवूडनी सही करण्यास नकार दिला आणि धुरंधरांना ते म्हणाले, ''तू मला माझ्या शाळेसाठी पाहिजे आहेस आणि केव्हातरी तू व्हाइस प्रिन्सिपॉल झालेला मी पाहीन, असा माझा निरोप तुझ्या बंधूस दे.'' ड्राफ्ट्समनची नोकरी बारगळली आणि १९२४ मध्ये धुरंधर ह्यांनी व्हाइस प्रिन्सिपॉल म्हणून काही काळ काम पाहिले व पुढे काही वर्षांनी ती जागा त्यांना मिळाली. धुरंधरांनी ग्रीनवूड ह्यांना ही बातमी आवर्जून कळवली. दुर्दैवाने त्यांचं अभिनंदनाचं पत्र आणि मृत्यूची बातमी एकाच टपालाने धुरंधरांकडे पोचली. या दैवयोगाबद्दल धुरंधर लिहितात, 'जणू काही स्वत: भविष्यात केलेला माझा उत्कर्ष पहाण्यासाठीच माझे गुरुदेव परमेश्वराचे घरी जाण्यासाठी खोळंबून राहिले होते.'

धुरंधर ड्राईंग मास्टर न राहता. जे. जे. मध्ये त्यांना वरची पदे मिळत गेली. चित्रकार म्हणून त्यांना मान्यता मिळाली आणि रावबहादूर हा किताब मिळाला. हा किताब मिळवणारे ते पहिले भारतीय चित्रकार. एका चित्रकाराला एवढा मोठा सन्मान मिळावा याचं ज्ञातीतल्या लोकांना वैषम्य वाटलं. याबद्दल धुरंधर लिहितात, 'ज्ञातीतील स्वत:स पुढारी म्हणविणारे एक श्रीमान गृहस्थ मार्केटमध्ये भेटले असता, 'काय

आर्टिस्ट, तुम्ही रावबहादूर झाला म्हणे!' असे कुत्सितपणे म्हणून तोंड वाकडे करून निघून गेले. अशा रीतीने एक चित्रकार म्हणजे य:कश्चित माणूस तो रावबहादूर झाला हे पाहून या स्वजातीय लोकांस वैषम्य वाटू लागले ही त्यांची वृत्ती वाखाणण्यासारखीच तर खरी!''

धुरंधरांनी त्यांच्या पत्नीबद्दल आणि मुलांबद्दल लिहिलं आहे. मुलगा गणपतराव एम.बी.बी.एस. होऊन डॉक्टरीचा व्यवसाय करू लागला. त्याच्या विवाहाची धुरंधरांनी केलेली सचित्र आमंत्रणपत्रिका पुस्तकात छापली आहे. या विवाहासमारंभाबाबतची एक नोंद महत्त्वाची आहे. जे.जे.चे प्रिन्सिपल कॅप्टन ग्लॅडस्टन सॉलोमन या समारंभास हजर होते आणि सर्व धार्मिक विधींची नोंद करून घेत होते. याचा उपयोग सॉलोमन यांनी 'चार्म ऑफ इंडियन आर्ट' या पुस्तकात केला आणि त्या पुस्तकाची प्रत धुरंधरांना नजर केली. त्यावर लिहिलं होतं. माझे स्नेही एम. व्ही. धुरंधर यांस, ज्याने कधीही पाठ फिरवली नाही. छाती पुढे काढून चालत राहिला. ढग कोसळतील असा संशयही ज्याने कधी बाळगला नाही. काळरात्र असली तरी असत्याचा विजय होईल असे ज्याने कधी स्वप्नातही मानले नाही.'

To, My Friend Mr. M. V. Dhurandhar,

"One who never turned his back, but marched abreast forward, never doubled clouds would break, never dreamed, though night were worsted, wrong would triumph."

सॉलोमन यांची कारकीर्द जे.जे.च्या इतिहासात महत्त्वाची मानली जाते. या काळात अनेक कसोटीचे क्षण आले तेव्हा धुरंधरांनी सॉलोमनना साथ दिली. त्याचा संदर्भ वरील उद्गारांना आहे. शिवाय इथल्या जाती, जमाती रीतीरिवाज याबद्दलचे दस्तावेजीकरण इथे आलेल्या ब्रिटिश चित्रकारांनी आपल्या चित्रांमधून केलं त्याचाही इथे उल्लेख करणं आवश्यक आहे. उत्कृष्ट एन्ग्रेव्हर असलेले कलाशिक्षक टेरी हे बापूजी दिनानाथजी यांच्या घरी जाऊन दरवर्षी गौरीपट रंगवीत असत अशी माहिती धुरंधरांनी निवेदनात दिली आहे. जे. जे. मधील तत्कालीन ब्रिटिश शिक्षकांना भारतीय लोकजीवनाबद्दल असलेली आत्मीयता आणि कुतूहल यातून दिसून येतं.

धुरंधरांनी लिहिलेली प्रथम पत्नीच्या मृत्यूबद्दलची हकिकत हृदयाला चटका लावणारी आणि तत्कालीन

## एकच

प्रत्येकाचे रूप वेगळे
म्हणून भासे तत्त्व आगळे
परंतु नाही तसे मुळीही
एक रसायन, नसे निराळे।।
मनामनांच्या सूत्रामध्ये
मानवपुष्पे सर्व गुंफिली
रंग, रूप, अन सुगंधाची
वेगवेगळी लूट जहाली।।
सूर्यप्रकाशामधून फुलतो
इंद्रधनूचा रंगपिसारा
तसाच तेजामधून जाहला
या जगताचा सर्व पसारा।।
सुखदु:खाचे तेच धागे
प्रत्येकाचे वस्त्र निराळे
तसाच धागा एकच आत्मा
अविष्कार हे वेगवेगळे।।
कुंभ वेगळे नक्षीदार हे
एकच माती त्यात असे
शरीर वेगळे प्रत्येकाचे
त्यात आत्मा एक वसे।।
यास्तव जेव्हा नऊ रसांतील
असे हजेरी कोणाचीही
त्याच रसाचे अधिपत्य हे
जवळपासच्या लोकांवरही।।

**सौ. उज्ज्वल र. बह्मांडकर**

परिस्थितीचं भेदक वास्तव मांडणारी आहे. जे.जे.मध्ये विद्यार्थी असताना धुरंधरांचा विवाह घरातल्या वडिलधाऱ्या मंडळींनी ठरवला आणि उरकून टाकला. त्यासाठी न सांगता चार दिवस रजा झाली म्हणून ग्रिफिथ्स रागावले आणि त्यांनी दोन रुपये दंड केला! हेडक्लार्कने रजेचं कारण सांगताच त्यांचा राग निवळला आणि 'लग्न झाले आणि मला कळविले नाही. मला बोलविलेसुद्धा नाही.'' असं म्हणून ते हसत निघून गेले. १८९७ मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीत धुरंधरांची पत्नी प्लेगने दगावली. प्लेगबद्दल लोकांच्या मनात एवढी भीती होती की धुरंधर आणि त्यांच्या बंधूंना घरमालक, शेजारचे भाडेकरू राहू देईनात. इतकंच काय, धुरंधरांच्या छोट्या मुलाला आजोळी पाठवण्यात आलं तेव्हा तेथील मंडळींनी 'प्लेगच्या घरातील मूल आमचे येथे नको.' असं सांगून त्याला ठेऊन घ्यायला नकार दिला. त्यात भर म्हणजे तेरा दिवस पूर्ण होण्यापूर्वीच दुसरं लग्न करण्याबद्दल धुरंधरांच्या मागे त्यांच्या बंधूंनी तगादा लावला. धुरंधरांचा दुसरा विवाह काही दिवसांनी झाला. एका बंधूंनी धुरंधरांचं लग्न ठरवलं आणि ते उरकून घेतलं. दुसऱ्या बंधूंच्या इच्छेविरुद्ध, त्यांना दाद लागू न देता लग्न झाल्यामुळे दुसरे बंधू बळवंतराव संतापले आणि दोन वर्षे धुरंधर व त्यांच्या दुसऱ्या पत्नीला त्यांनी अत्यंत हीनतेनं वागवलं. सुशिक्षित मुलीशी लग्न केलं हे बंधूंच्या संतापाचं आणखी एक कारण होतं. हे सर्व विस्ताराने सांगण्याचं कारण म्हणजे त्यावेळच्या समाजस्थितीचं दर्शन त्यातून घडतं.

सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधलं वातावरण, कलाशिक्षण यांचा आणि भोवतालच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीचा या आत्मकथेत कुठेही बंध जुळलेला आढळत नाही. मात्र एक चित्रकार या नात्याने धुरंधरांनी प्रथम पत्नी बापूबाई व द्वितीय पत्नी गंगूबाई यांची अनेक रेखाटनं केली. या अप्रकाशित चित्रसंग्रहाला हृद्य अशी अर्पणपत्रिकादेखील त्यांनी लिहिली होती. प्रथम पत्नीच्या निधनानंतर तिच्या मृतदेहाचं चित्र त्यांनी केलं आणि 'बापू इज डेड' असं त्याला शीर्षक दिलं! पत्नीवियोगाचं दुःख, प्लेगमुळे झालेली परवड अशा पार्श्वभूमीवर चित्रकार धुरंधरांची ही कृती बरंच काही सांगून जाते.

धुरंधरांचा काळ हा पहिल्या महायुद्धाचा काळ होता. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी अशा दोन्ही युगांमधली, स्वातंत्र्य चळवळ धुरंधरांच्या काळातच घडली. पण या आत्मकथनात स्वातंत्र्यलढ्याचा ओझरता उल्लेख येतो. '१९३० सालची असहकारिता' या शीर्षकाखाली काँग्रेसच्या चळवळीचा उल्लेख आला आहे. या काळात शाळा-कॉलेजेस विद्यार्थ्यांनी हरताळ पाळल्यामुळे बंद पडली, अनेक विद्यार्थी चळवळीत सामील झाले. पण इतर शाळा कॉलेजांसारखा स्कूल ऑफ आर्टवर, एक दोन विद्यार्थ्यांनी प्रयत्न करूनही त्याचा परिणाम झाला नाही ही बाब धुरंधरांनी संतोषाने नमूद केली आहे. कौन्सिलच्या निवडणुकीसाठी मतदान करायला जाताना काँग्रेसच्या भाडोत्री लोकांनी मोटर कशी अडवली आणि मतदान न करताच कसं परतावं लागलं त्याची हकिकत धुरंधरांनी सांगितली आहे. 'असहकारितेचा एक नमुना आणि काँग्रेसच्या नावावर लोकांकडून होणारा वाटेल तो मूर्खपणा' अशी या प्रसंगाची संभावना धुरंधर ह्यांनी केलेली आहे. धुरंधर वृत्तीने नेमस्त होते. कलेच्या प्रांतात ज्ञानदानाचं आणि चित्रनिर्मितीचं काम करत राहावं अशी त्यांची वृत्ती होती. धार्मिक वृत्तीच्या धुरंधरांनी ब्रिटिशांनी आणलेल्या यथार्थवादी शैलीचा व्रतस्थपणे स्वीकार केला. धुरंधरांचं कलाशिक्षण पूर्ण झालं त्या सुमारास १८९६ मध्ये कलकत्ता स्कूल ऑफ आर्टमधून प्रिन्सिपल हॅवेल यांनी पश्चिमात्य पद्धतीचे ग्रीक व रोमन पुतळे हटवले व भारतीय कलामूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. अशाच प्रकारच्या पुतळ्यांनी धुरंधरांना जे.जे.च्या प्रथम भेटीत प्रभावित केलं होतं आणि त्यांच्या आधारेच त्यांनी कलाशिक्षण घेतलं होतं. भारतीयत्वाचा पुरस्कार करणारी बंगाल आणि मुंबईमधील पुनरुज्जीवनवादी चळवळ त्यांच्या डोळ्यांसमोर झाली, पण धुरंधरांनी त्याबद्दल अथवा नंतरच्या आधुनिक कलाप्रवाहांबद्दल फारशी उत्सुकता दाखवली नाही. बॉम्बे स्कूलच्या आधीच्या परंपरेत ते रमले आणि पौराणिक, ऐतिहासिक प्रसंगांवरची चित्रं ते रंगवीत राहिले. धुरंधरांच्या काळातील स्कूल ऑफ आर्ट म्हणजे एखाद्या कुटुंबासारखं होतं. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात भावनिक नातं होतं. त्यांच्या आत्मवृत्तात ग्रीनवुड, ग्रिफिथ्स यांच्याबद्दलचे अशा प्रकारचे प्रसंग आलेले आहेत. धुरंधरांचे त्यांच्या विद्यार्थ्यांशी असेच जिव्हाळ्याचे संबंध होते.

पुस्तकाच्या शेवटी त्यांचे सहकारी, विद्यार्थी यांनी धुरंधरांच्या गौरवपर केलेली पद्यरचना दिलेली आहे. आजच्या काळात अशी स्तुतीसुमनं कृत्रिम वाटली आणि काव्यगुणांच्या दृष्टीने ती सामान्य असली तरी त्यामागची भावना प्रामाणिक होती. धुरंधरांबद्दलचा प्रेमयुक्त आदर त्यातून व्यक्त होतो. एल.एन. तासकर हे जे.जे. मधील शिक्षक आणि प्रसिद्ध चित्रकार, आपल्या रचना चित्रांमधून लोकजीवनाची नोंद घेणारे तासकर धुरंधरांना रावबहादूर किताब मिळाल्यानंतर लिहितात,

'चित्रकलेच्या महतीयोगे चित्रकारही भूषविले।।
चित्रकला-विद्यामंदिर तर नि:संशय की उद्धरिले।।'

साहित्यिक ऋग्वेदी यांचा मुलगा व पु.ल.देशपांडे यांचे मामा असलेले एम. व्ही. दुभाषी धुरंधरांचे विद्यार्थी होते. त्यांचे वडील वामन दुभाषी ह्यांची एक कवितादेखील या पुस्तकात आहे. केतकर आर्ट इन्स्टिट्यूटचे प्रिन्सिपॉल आणि धुरंधरांचे विद्यार्थी के. आर. केतकर यांचीही कविता दिलेली आहे. अंबिका धुरंधरांनी धुरंधरांच्या आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याबद्दल लिहिलं आहे. बनारसच्या अभ्याससहलीत आचारी बेपत्ता झाल्याने विद्यार्थ्यांना आईच्या मायेने जेवण करून वाढणारी धुरंधरांची पत्नी, मुस्लीम विद्यार्थ्यांना पंक्तिभेद न करता जेवताना स्वत: शेजारी बसवून घेणारे धुरंधर, हनुमंतासारखे सेवेत तत्पर असलेले नेमिराज यांच्यासारखे विद्यार्थी असे पुरक तपशील लक्षात घेतले की जे.जे.तील गुरुशिष्यांचं कौटुंबिक चित्र पूर्ण होतं.

धुरंधरांनी होतकरू तरूण चित्रकारांना 'दोन शब्द' सांगितले आहेत, त्यातील काही वाक्ये अशी -

''कलेची उपासना हे एक योगसाधन आहे, आणि ते साध्य करून घेण्यासाठी चित्रकाराने आपल्या आचरणात नेहमी पवित्रता ठेवावी लागते... चित्रकाराने आपले चरित्र शुद्ध ठेवून भक्तीमुक्त अंत:करणाने कलोपासना करावी म्हणजे कलेमध्ये प्रगती होईल. चित्रकाराने काढलेली चित्रे इतर चित्रकारांस पसंत होऊन सर्वसाधारण जनतेस ग्राह्य झाली म्हणजे त्याची प्रगती झाली असे समजावे.''

### दृश्यकलेचा इतिहास

'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' या आत्मकथनातील धुरंधरांच्या कौटुंबिक जीवनाचा आलेख पाहिला. आता कला इतिहास या दृष्टीने या पुस्तकातील काही महत्त्वाच्या नोंदींचा तपशील पाहणं आवश्यक आहे. या पुस्तकाचा संदर्भ दृश्यकलेच्या इतिहासाच्या संदर्भात बरेचदा दिला जातो. आबालाल रहिमान, शिल्पकार म्हात्रे, सॉलोमन यांची कारकीर्द, सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टवर आलेलं गंडांतर याबद्दलची माहिती या पुस्तकाच्या निमित्ताने प्रथम ग्रंथबद्ध झाली. जे.जे.चा अभ्यासक्रम, त्यात झालेले बदल याचीही माहिती धुरंधरांनी दिलेली आहे.

जे.जे.ची स्थापना कला आणि कारागिरीचे शिक्षण देण्यासाठी झाली. कालांतराने चित्र, शिल्प विषयांना प्राधान्य देण्यात आलं आणि त्यातून व्यक्तिचित्रं, प्रसंगचित्रं, निसर्गचित्रं या प्रकारांत प्रावीण्य मिळवणारे चित्रकार निर्माण झाले. धुरंधर शिकले त्या काळात रेखांकनातील कौशल्य विकसित करण्यावर भर

## तुझ्याविना

मन हे कुठेही न रमते
विचारांच्या कवेत घुटमळते
भान ही हरपून रहाते
तुझ्याविना......।।१।।

कामात ही गोडी वाटेना
कशातच लक्ष लागेना
दिवस ही सरता सरेना
तुझ्याविना ......।।२।।

भास तुझाच चोहीकडे
स्वप्नीही तूच दिसे
एकांत हा नको वाटे
तुझ्याविना.....।।३।।

वाट पाहते त्या क्षणाची
जेव्हा तू येशील घराशी
फुलेल हसु माझ्या ओठी
पण तोवर तुझ्याविना....।।४।।

**- सौ. स्वागता विजयकर**

होता. त्यामुळे फ्री हँड, पर्स्पेक्टिव्ह, शेडिंग फ्रॉम कास्ट (पुतळ्यावरून रेखांकन करणं), फॉलीएज (पानाफुलांचं रेखांकन करणं) असे विषय होते. या अभ्यासक्रमातून इमारतींच्या सुशोभिकरणाला लागणारे अलंकरणात्मक काम करणाऱ्या क्राफ्ट्समन्सची निर्मिती होण्याचीच शक्यता अधिक होती.

मानवी देहाची चित्रं काढण्याचा अभ्यास सुरुवातीला ग्रीक, रोमन पुतळ्यांवरून केला जात असे. नंतर लाइफ स्टडीसाठी मॉडेल बसवण्यात येऊ लागले. कॅप्टन ग्लँडस्टन सॉलोमन ह्यांनी जे.जे.मध्ये न्यूड क्लास सुरू केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे मानवी देहाचे चित्रण सुधारलं आणि त्याचा चांगला परिणाम एकूणच चित्रनिर्मितीवर दिसून आला. यानंतर म्युरल क्लास सुरु करण्यात आला. धुरंधरांनी या साऱ्या घडामोडीबद्दल लिहिलेलं आहे.

या पुस्तकातील लक्षात राहणाऱ्या व्यक्तिरेखा म्हणजे जॉन ग्रिफिथ्स आणि ग्लॅडस्टन सॉलोमन. बॉम्बे स्कूलच्या इतिहासात या दोघांनाही महत्त्व आहे. ग्रिफिथ्स यांनी केलेलं सर्वात महत्त्वाचं काम म्हणजे विद्यार्थ्यांकडून करून घेतलेल्या अजिंठा चित्रांच्या प्रतिकृती. सुमारे बारा वर्षे हे काम चाललं होतं. पेस्तनजी बोमनजी यांचा या कामात मोठा सहभाग होता. धुरंधरांनी अजिंठा टूरचा किस्सा आपल्या आत्मवृत्ततात सांगितला आहे. १८९५ मध्ये विद्यार्थ्यांची अभ्यास सहल अजिंठ्यास गेली होती. तेव्हा ग्रिफिथ्स ह्यांनी धुरंधरांना अजिंठा गुंफांचा पॅनोरमा (विहंगम दृश्य) काढण्यास सांगितलं. टेकडीच्या कड्यावर जाऊन ते चित्र काढायचं होतं. ग्रिफिथ्स यांनी सोबतीला चार भालेवाले दिले होते. कडाक्याच्या थंडीत त्या एकांत जागी धुरंधरांनी तीन दिवस काम केलं. एके दिवशी दुपारी बारा वाजता वाघाची आरोळी ऐकू आली. धुरंधरांची भीतीने गाळण उडाली आणि चित्र अर्धवट पुरं करून ते परतले. मुंबईला आल्यावर ग्रिफिथ्स त्यांच्यावर रागावले आणि कृतक कोपाने म्हणाले, ''तुला वाघाने खाल्ले असते, तरी काही कमी झाले नसते! जा आता मी ते पुरे करीन'' एवढं बोलून ते हसले.

ग्रिफिथ्स ह्यांची दुसरी आठवण अशीच भावपूर्ण आहे. सकाळच्या वर्गात शिक्षकांनी कामात दिरंगाई केल्याबद्दल तक्रार केल्यामुळे ग्रिफिथ्स जरा जास्तच रागावून धुरंधरांना बोलले होते. त्याचा 'सांत्वनरूपी उ:शाप' म्हणून ग्रिफिथ्स दुपारच्या वर्गात आले आणि धुरंधरांच्या मागे येऊन उभे राहिले. 'दॅट्स व्हेरी गुड' असं कामाचं कौतुक करत बरोबर आणलेलं लिओनार्दो दा व्हिंचीचं चरित्र वाचायला देत म्हणाले, ''हे काळजीपूर्वक वाचून पहा, म्हणजे काम करण्याची निरंतर स्फूर्ती येऊन तुझा अभ्यास वाढेल.''

ग्रिफिथ्स सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना दिलेल्या निरोप समारंभाच्या वेळी ग्रिफिथ्स शोकावेगाने बोलू शकले नाहीत, सर्वांची अंत:करणं भरून आली आणि विद्यार्थिनी तर रडूच लागल्या असं धुरंधरांनी नमूद केलं आहे.

दुसरं याहूनही अधिक महत्त्वाचं व्यक्तिमत्व म्हणजे कॅप्टन ग्लॅडस्टन सॉलोमन. सॉलोमन यांच्या काळात अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. भारतीयत्व जपणारी कला चळवळ मुंबईत सुरू झाली ती प्रिन्सिपल सॉलोमन यांच्यामुळे. जे.जे.च्या विद्यार्थ्यांनी केलेल्या म्युरल्सच्या कामामुळे जे.जे.ला नाव मिळालं. वेम्बले, लंडन येथील प्रदर्शनात इंडियन रूम भारतीय कलाकृतींसह सादर करून भारतीय कलेचा पाश्चात्यांना परिचय झाला तो सॉलोमन यांच्याच काळात. या निमित्ताने सॉलोमन ह्यांनी रिव्हायव्हल ऑफ इंडियन आर्ट नावाचं पुस्तक प्रसिद्ध केलं.

सॉलोमन यांच्यावर संकटंही अनेक आली. प्रशासकीय आणि धोरणात्मक अशा दोन्ही प्रकारची ही संकट होती. १९२१ मध्ये स्कूल ऑफ आर्ट दुसरीकडे हलवून ती जागा लिलावात काढावी असा मुंबई सरकारचा प्रस्ताव होता. या विरोधात स्कूल ऑफ आर्टची बाजू मांडण्यास धुरंधरांनी सर्वतोपरी मदत केली आणि हा प्रस्ताव हाणून पाडला. १९३२ मध्ये थॉमस रिपोर्टचा आधार घेऊन स्कूल ऑफ आर्ट बंद करण्याचा घाट घालण्यात आला पण नामदार जयकर यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभा बोलावण्यात येऊन हा निर्णय लोकांनी सरकारला मागे घ्यायला लावला.

सॉलोमन आणि धुरंधर यांच्यातलं नातं दृढ होत गेलं ते या कसोटीच्या आणि आनंदाच्या प्रसंगांत धुरंधरांनी मनापासून जी साथ दिली त्यामुळे. १९१९ मध्ये प्रिन्सिपॉल म्हणून सॉलोमन प्रथम आले तेव्हा धुरंधर या माणसाशी आपलं कितपत जुळेल याविषयी साशंक होते. पण लवकरच दोघांचं गोत्र जुळलं आणि

सहकारी, सल्लागार, सुहृद आणि कलावंत या नात्याने धुरंधर आणि सॉलोमन यांच्यात प्रेमादराचं वेगळं नातं निर्माण झालं. धुरंधरांनी जी पत्रं छापली आहेत त्यात सॉलोमन यांनी लिहिलेल्या पत्रांची संख्या सर्वाधिक आहे. या पत्रांमधून कधी अधिकारी या नात्याने विनंतीवजा सूचना आहेत, कधी सल्ला विचारलेला आहे, कधी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. रावबहादूर किताब मिळाल्यानंतर पाठवलेल्या अभिनंदनाच्या पत्रात चारच ओळी आहेत पण त्यातून धुरंधरांबद्दलची आपुलकी शब्दाशब्दातून व्यक्त होते. सॉलोमन आणि धुरंधर यांच्या व्यक्तिगत संबंधांइतकीच सॉलोमन ह्यांना भारतीय कलेबद्दल आपुलकी होती आणि भारतीयत्व जाणून घेण्याच्या दृष्टीने धुरंधर हे महत्वाचा दुवा होते हेही इथे लक्षात घ्यायला हवं.

सर्वच इंग्रज अधिकारी चांगल्या स्वभावाचे होते असं नाही. इंग्रज अधिकाऱ्यांमधील हेवेदावे, संशयी वृत्तीचे नमुनेही धुरंधरांनी दिले आहेत. कलाशिक्षक व चित्रकार आगासकरांनी बर्न्स यांचां उत्तम व्यक्तिचित्र केलं. त्यासाठी सिटींग देऊन सुधारणा करण्याच्या मिषाने बर्न्स यांनी ते चित्र ब्रशने निकामी करून ठेवलं. शिवाय एक हिंदी चित्रकार आपलं व्यक्तिचित्र प्रदर्शनात ठेवत आहे हे कमीपणाचं समजून बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात ते लावलं जाणार नाही अशी बर्न्स यांनी व्यवस्था केली. स्वत: सॉलोमन ह्यांनाही ब्रिटिश शासनातील संबंधितांच्या राजकीय डावपेचांचा त्रास झाला. पण धुरंधरांचं आत्मकथन वाचून शेवटी संस्कार उरतो तो कलामंदिराचा आणि त्यात व्रतस्थपणे आणि आत्मीयतेने काम करत राहिलेल्या कलाशिक्षकांचा.

धुरंधरांनी आपल्या आत्मकथनामध्ये अंबिका या त्यांच्या कन्येचा उल्लेख केला आहे. अंबिका धुरंधर ह्या जे.जे.मध्ये विद्यार्थिनी होत्या आणि स्त्री चित्रकार म्हणून त्या नावारूपाला आल्या. १९३१ मध्ये पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी परीक्षेत दुसरा क्रमांक मिळवला. जे. जे. मध्ये धुरंधरांच्या काळात शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या फारच कमी होती. धुरंधरांच्या वर्गात तीन विद्यार्थिनी होत्या. मिस कामा, नाझर व डायमलर. या तिघीही 'मठ्ठ डोक्याच्या' होत्या आणि शिक्षक व विद्यार्थ्यांकडून त्या करेक्शन व काम करवून घेत असं धुरंधरांनी नमूद केलं आहे! या व्यतिरिक्त एक अत्यंत खटपटी विद्यार्थिनी म्हणून मिस बाईआई पालनकोट हिचा उल्लेख येतो. धुरंधरांच्या काळातल्या कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवलेल्या स्त्रिया मुख्यत: दोनच. अंबिका धुरंधर आणि अँजेला त्रिंदाद.

धुरंधर यांनी पेंटिंग्जव्यतिरिक्त दिनदर्शिका, पोस्टर्स, पुस्तकांची-मासिकांची मुखपृष्ठे यासाठीही चित्रं केली. राजा रविवर्मा यांच्याप्रमाणेच धुरंधरांची चित्रं मुद्रित स्वरूपात घरोघरी पोचली. रेल्वेसाठी त्यांनी पोस्टर्स केली. या पुस्तकात धुरंधरांनी संपादक मित्रांचा परिचयदेखील दिला आहे त्यात शं.वा.किर्लोस्कर, 'विविधवृत्त' साप्ताहिकाचे रा.का. तटनीस, 'विसवी सदी'चे संपादक महंमद अल्लारखीया शिवजी यांचा समावेश आहे. या सर्वांसाठी धुरंधरांनी आपली चित्रं दिली. ग्रिफिथ्स यांच्या 'मोनाग्राम ऑन कॉपर अँड ब्रास पॉटरी' या लेखासाठी धुरंधरांनी जवळपास शंभर चित्र काढली

## 'आले पाक'

आले पाक आले पाक म्हणून झाली ओरड।
आवाज ऐकताच घशाला पडली कोरड।
काठ्या दगड घेऊन धावले चाळी चाळीतून
सभा घेतल्या रस्त्या रस्त्यातून।
पिंजून काढला गल्ली बोळ।
मिळेना कुणी झाला घोळ।
पोलीस आले गाड्या घेऊन।
पळून गेले सारे घाबरून।
अंधार पडताच पुन्हा आली आरोळी।
आले पाक आले पाक।
पकडून आणले एकाला।
पिशवी त्याच्या खांद्याला।
होता डबा आलेपाक वडीचा।
पाहताच हसता हसता धरला रस्ता घराचा।

**-सौ. इना तळपदे**

होती. सी.ए.किंकड यांच्या डेक्कन नर्सरी टेल्स, टेल्स ऑफ किंग विक्रमादित्या या पुस्तकांसाठी त्यांनी चित्रं काढली. मेघदूत, उमर खय्यामच्या रुबाया यासाठीही धुरंधरांनी चित्रं करून दिली. पुस्तकात शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी यांचा उल्लेख आला आहे. धुरंधर यांनी शेठ मावजी यांना जे.जे.च्या ग्रंथालयातील पुस्तकं वाचायला दिली असा सेसिल बर्न्स यांनी वृथा संशय घेतला होता तो किस्साही पुस्तकात आहे. या शेठ मावजींसाठी धुरंधरांनी पुरुषांवरची शेकडो चित्रं काढली व शेठजींनी 'सुवर्णमाला' या मासिकात ती प्रसिद्ध केली. धुरंधरांचं हे उपयोजित कलेतील काम स्वतंत्रपणे अभ्यासावं इतकंच महत्वाचं आहे. त्या काळात अभिजात कला आणि उपयोजित कला असा भेद केला जात नव्हता. धुरंधर हे महाराष्ट्रातील उपयोजित कलेल्या क्षेत्रात काम करणारे आद्य चित्रकार म्हणावे लागतील.

'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे'मध्ये आलेला जे.जे. आणि पर्यायाने बॉम्बे स्कूलचा आलेला इतिहास पाहिला आणि म.वि.धुरंधर यांचा चित्रकार, कलाशिक्षक म्हणून झालेला व्यक्तिगत प्रवासही पाहिला. आज आपण जेव्हा हे पुस्तक वाचतो तेव्हा त्याबद्दल काय वाटतं? एकतर त्याची रचना, पुस्तकाच्या शेवटी दिलेली छायाचित्रं, पत्रव्यवहार आणि गौरवग्रंथात असावी तशी धुरंधरांच्या चाहत्यांनी केलेली पद्यरचना हा घाट आता कालबाह्य झालेला आहे. पण या घाटामुळे ग्रंथबद्ध झालेली माहिती ही धुरंधरांचा काळ, त्यांचे समकालीन चित्रकार आदी समजून घेण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. धुरंधरांनी साऱ्या घटना तारीखवार आणि नेमकेपणाने दिलेल्या आहेत. त्यामुळे एक संदर्भग्रंथ म्हणून त्याचं मोल मोठं आहे. अन्यथा ग्रिफिथ्स, सॉलोमन अशा महत्वपूर्ण व्यक्तींची माहिती, त्यांची छायाचित्रं अन्यत्र कुठे मिळाली असती? त्याकाळच्या कलाशिक्षणाचा एक दस्तावेज म्हणून त्याचं महत्त्व वादातीत आहे.

धुरंधरांची भाषा आजच्या काळाच्या तुलनेत थोडीशी भाबडी, आदबशीर आणि लीन वाटली तरी त्यातल्या भावनेच्या ओलाव्यामुळे ती आपल्याला चटकन भावते. धुरंधर हे बालगंधर्वांच्या युगातले असल्याने बालगंधर्वांच्या भाषेची इथे आठवण होते. धुरंधर यांच्या अंगी विनोदबुद्धी असल्याने त्यांच्या निवेदनात रंजकता आली आहे. स्वत:च्या फजितीचे प्रसंगही त्यांनी निर्मळपणे सांगितले आहेत. धुरंधरांच्या व्यक्तिमत्त्वातला भारदस्तपणा आणि आब त्यांच्या या आत्मकथनाच्या शैलीत पुरेपूर उतरलेला आहे.

हे पुस्तक वाचत असताना आपण व्हिक्टोरियन संवेदनशीलतेवर पोसलेल्या, ब्रिटिशांच्या वासाहतिक साम्राज्यातल्या स्वप्निल जगात वावरत आहोत असं वाटत राहतं. आपण आपल्या कलानिर्मितीत मग्न राहावं, कलासक्त राज्यकर्त्यांची मर्जी संपादन करावी आणि समाजात चित्रकार म्हणून मान्यता मिळवावी इतकंच उद्दिष्ट या काळातल्या चित्रकारांसमोर होतं. भोवतालचं जग झपाट्यानं बदललं तरी धुरंधर मात्र या जगातच कायम राहिले. 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' हा त्याचा बिनतोड पुरावा आहे.

शेवटी एकच वाटतं, या पुस्तकाची इतक्या वर्षामध्ये नवी आवृत्ती निघालेली नाही. विस्तृत टिपांसह ती प्रकाशित होणं अत्यंत गरजेचं आहे.

***संदर्भ व टिपा :***

१. बहुळकर सुहास, घारे दीपक (संपा.), दृश्यकला, शिल्पकार चरित्रकोश खंड ६, २०१३, सा. विवेक (हिंदुस्तान प्रकाशन संस्था), मुंबई, म.वि.धुरंधर यांच्यावरील नोंद पृ.क्र. २४३ ते २५०.

२. धुरंधर अंबिका, माझी स्मरणचित्रे (२०१०, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई) या पुस्तकातील 'बनारसची अभ्यासहल' हा लेख. पृ.क्र. १ ते ६.

## पहिले सुवर्णपदक
## रावबहादूर महादेव विश्वनाथ धुरंधर

पुढे आठ दिवसांनी बॉम्बे आर्ट सोसायटीचे प्रदर्शन सुरू झाले त्यात आम्ही एकंदर चार चित्रे ठेवली होती. त्यापैकी एक "Do you come Laxmi?" हे होते. चित्रांतील विषय भाद्रपदांतील गौरीपूजनाचा होता. भिंतीवर काढलेला चित्रपट ही पार्श्वबाजू असून, एका मुलीने हातात घेतलेली गौरी, तिच्याजवळ उभी असलेली तिची चिमुकली बहीण आणि हातात पंचारती घेऊन त्यांचे समोर उभी असलेली त्यांची माता, अशा तऱ्हेची व्यक्तीसमुच्चय - रचना (composition) होती. हे चित्र प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट ठरून त्यास 'सुवर्णपदक' आणि एक मोठे बक्षीस

मिळाले. एका युरोपीयन गृहस्थाने ते प्रदर्शनाच्या उद्‌घाटनादिवशीच विकत घेतले.

प्रदर्शनाच्या उद्‌घाटनादिवशी ग्रिफिथ्स साहेबांनी सायंकाळी सात आठ विद्यार्थ्यांनी सेक्रेटॅरीएट्‌मध्ये उत्तम पोशाख करून हजर व्हावे अशी ताकीद हेडक्लार्कचे मार्फत दिली होती. त्याप्रमाणे आम्ही सर्व विद्यार्थी तेथे हजर झालो. स्वत: ग्रिफिथ्स यांनी आम्हाला गॅलरीमध्ये जागा नेमून दिली. गव्हर्नर लॉर्ड हॅरिस आले. हॉलमध्ये मोठमोठ्या लोकांची एकच गर्दी झाली होती. त्यावेळच्या पद्धतीला अनुसरून समारंभ सुरू होऊन सोसायटीचे प्रेसिडेंट सर जॉर्ज बर्डवूड ह्यांनी रिपोर्ट वाचून, गव्हर्नरसाहेबांस बक्षिसे वाटण्याची विनंती केली. सोसायटीचे सेक्रेटरी सर कॉलिन कँबेल ह्यांनी प्रथमच माझे नाव पुकारले. आम्ही पुढे जाऊन बक्षीस घेतले आणि गव्हर्नर, त्यांचे शेजारी बसलेले कोल्हापूरचे श्री छत्रपति शाहुमहाराज आणि मागे उभे असलेले गुरुवर्य ग्रिफिथ्स् यांना अभिवादन करून बाहेर आलो. माझे मागोमाग श्री शाहु छत्रपति बाहेर गॅलरीत आले आणि माझ्याशी हस्तांदोलन करून माझे अभिनंदन केले व 'पुढील कलाशिक्षणाकरिता आपण तुम्हाला इंग्लंडला पाठवू.'' असे नुसते आश्वासन दिले. पण त्याचा पुढे काहीएक उपयोग झाला नाही हे लिहावयास दिलगिरी वाटते.

आर्ट सोसायटीत सुवर्णपदक मिळविणारा हिंदी चित्रकार मीच पहिला होतो. बक्षीस घेऊन मी घरी ७।। वाजता येऊन पोहोचलो. कोल्हापूरहून आलेले वडिलबंधू बाबासाहेब दारातच उभे होते. त्यांनी मला पहाताच ''काय एखादे बक्षीस मिळाले आहे का तुला?'' असा प्रश्न केला. मी खिशातील पदक काढून, त्यांच्या हाती दिले व स्फुंदून स्फुंदून रडू लागलो. ते पाहून त्यास आश्चर्य वाटले आणि ''अरे! सुवर्णपदक मिळाले मग असा रडतोस का?'' म्हणून त्यांनी आस्थेने विचारले, तोच मला जास्त हुंदके येऊ लागले. माझ्याने बोलवेना. आवेग ओसरल्यावर मी त्यास सांगितले. ''सात वर्षांपूर्वी पुण्याच्या इंडस्ट्रियल एक्झिबीशनमध्ये काल्हापूरचे चित्रकार आबालाल रहिमान यांस सुवर्णपदक मिळून त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले होते. त्यावेळी आमच्या वडिलांनी 'महादेव, तुला गोल्डमेडल मिळालेले केव्हा पाहीन!' असे उद्‌गार मजजवळ काढले होते. मी स्कूल ऑफ् आर्टमध्ये प्रवेशसुद्धा केला नव्हता. तरी वडिलांची, मी चित्रकार होऊन सुवर्णपदक मिळवावे अशी अंत:करणापासून इच्छा होती. त्या उद्‌गाराचे स्मरण होऊन मला रडे कोसळले. वडिल दोनच वर्षांपूर्वी निवर्तले होते आणि आज ते जिवंत असते तर मला सुवर्णपदक मिळालेले पाहून त्यांस किती कौतुक व आनंद झाला असता!'' असे वडिल बंधूंस सांगताच त्यांनी, 'आठच दिवसांपूर्वी तुझे लग्न झाले आहे, आणि ते लग्न किती सुखकर आहे, हे तुझ्या या सुवर्णपदक मिळविण्याने तुला कळले पाहिजे'' असे म्हणून माझे सांत्वन केले.

ह्या सुवर्णपदकाने आमची ख्याती चहूंकडे पसरली आणि जिकडेतिकडे आमची योग्य संभावना होऊ लागली. पाठारे प्रभू सोशल क्लबमध्ये आम्हास आमंत्रित करून, डॉ. कर्नल किर्तीकर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवविला आणि मजकडून बाळकृष्ण व्ही. एन. कीर्तीकर यांचा ऑईलकलरमध्ये एक पोर्ट्रेट करवून घेतला, त्यामुळे आम्हांस बरेच उत्तेजन मिळाले.

**ग्रिफिथ्स यांची सेवानिवृत्ती**

एप्रिल महिन्यात ग्रिफिथ्ससाहेब सेवानिवृत्त होण्याची वेळ जवळ आल्याने त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी वर्ग यांनी वर्गणी काढून एक रौप्य करंडक आणि पानसुपारी देण्याचा सुयोग आणला. त्याप्रमाणे सर्व तयारी झाली. विद्यार्थिनींनी पियानोवर स्वागतपर सुस्वर पद म्हटल्यानंतर हेडमास्तर यांनी मानपत्र वाचून त्यांच्या संपूर्ण आणि उज्ज्वल कारकीर्दीची माहिती सांगितली, व ते मानपत्र त्यांच्या हाती दिले. ग्रिफिथ्ससाहेब भाषण करण्यास उठले आणि सुरुवातीस "Ladies, Masters and Students" यांस उद्देशून "when the heart is full the mouth cannot speak" असे बोलून रडू लागले. ते पाहून गणपतराव मास्तरांनी ''आपण रडू नका! आपण बसा!! आम्हीं सर्व आपणांबद्दल कृतज्ञ आहो.'' असे बोलून त्यास बसविले. त्यांच्याबरोबर सर्वांची अंत:करणे भरून आली. विद्यार्थिनी तर रडूच लागल्या. अशा प्रकारे हा समारंभ शोकपर्यवसायी झाला.

(कलामंदिरांतील एकेचाळीस वर्षे : रावबहादूर महादेव विश्वनाथ धुरंधर, १९४०, अंबासदन, मुंबई, पाने १७ ते १९ मधील निवडक मजकूर.)

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# बालविभाग

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## Leisure

**Eshan Anand**

(Std : VIII)

In today's world, life has become so difficult and complicated to live in. We hardly get some time as free time or time used for our leisure purposes. By the way, do you know what leisure is? Leisure is a free time spent away from business, work, domestic chores and education.

During free time, people like to do what they like and some of them also inculcate hobbies. some of them do not utilise their time properly and they spend their time doing nothing. This is a total waste of time. some people also play cards and video games which is not going to help them in future. During my free time, I inculcate hobbies like reading books and collecting stamps and spend some time with my family sharing experiences of the day.

Today's world has become very busy and the stress level has also crossed it's limits. But because of machines, our lives have become little easier. According to me, every person should have some time for leisure purpose to relieve stress. I know that it is not that easy to find time for leisure but, we should try our best to devote some time for leisure. It is our will if we want to devote some time for leisure. But, I think we should get some time.

With the stress which is increasing day by day I think we don't get enough time for leisure. We only get enough time for leisure during weekends and holidays. With the advancement in technology, I think our work would get easier in the future and I hope we would get enough time for leisure.

*

# My Trek at Durkhet

**Atiyah Krishnan**
Std - VI

I still remember it was wednesday when our Maths teacher was absent. There was chaos in the class. Suddenly two guys from the office staff came and kept bundles of circular on the teacher's table. All of us were busy in our own world when a boy playing around the table dropped the circular and thats how it caught our attention. The circular was soon distributed. On reading it one of my friends was so excited that it seemed as though she would collapse in a fit. The date on it was July 5 and Oh! 10 days to go.

Finally it was June 4th the night which I was waiting for. It was quiet a long one.

We all were excited on the day of the trek. It took us 2 to 3 hours to reach Durkhet Khandr. In the bus we were served sandwiches, biscuits, chocolates etc. As soon as we reached there we were given wrist-bands to wear in order to recognize our group.

First we were made to walk through a narrow settlement where I came to know about the poor part of India. I felt very sad for them. While climbing a very steep slope for about fifteen minutes I fell on my knees. But thankfully my friends helped me get up. I still can't forget that incident. After half an hour of walk we halted and rested for a while. We were told to sit with our group and drink water.

By the time reached the top we were out of energy. It was a beautiful sight and totally worth the effort we put in to reach there. When we halted down for lunch we all were asked to donate something to the poor people. I donated my chocolates and T shirt which was extra in my bag to a small girl. I could see the sheer blissful joy on her face.

Then we headed back and were asked to change our cloths. It was a fun experience to sit, walk, dance, play, eat and sing with our best friends. We returned to school singing and dancing with fond memories.

I am aniously a wait another school trip.

*

# The Old Tree

**- Soumil Kothare** (10 years)
Colombo International School, Sri Lanka

The old tree in the hillside was withered; it was alone now, all the other trees had been cut down for timber. Resting in the shade of the tree was a young, plump and tired boy, sitting with his sister, a thin, auburn-haired girl; she was reading a book she had just bought with utmost concentration. She didn't want to miss a word. Her brother, named Terry Jackson, on the other hand, was being lazy: he had always liked that tree. Messila Jackson looked a little annoyed at her little brother, who was 10, and she was 12: they had woken up from sleep just an hour ago, but Terry said there was something special about that tree: just makes you randomly fall asleep with gifted and miraculous dreams; but Messila didn't think so.

Terry remembered how his dad had said that his father planted that tree when he was..... "Wake up!" bellowed Messila. Terry hesitated for a second, then sat bolt upright. There was no getting away from Messila. "That was a great dream!" whined Terry, rubbing his eyes. Messila rolled her eyes. "Well, we're not here to have great dreams, you know!" she retorted.

"Half an hour and no sign of an insect, huh" sighed Terry.

"I guess the good old tree is losing its touch" replied Messila.

"But why, though? The insects were coming here just 2 days ago." Terry was just pondering over that when he leaned against the tree and felt it was strangely hollow. He peeked inside a hole in the tree and gasped. Terry stumbled back and fell down in shock.

"T-the tree is h-hollow!" stammered Terry after being helped up by Messila. She looked inside and had the same reaction as Terry's, only without falling down. "How could this have happened?" mumbled Terry, after he had recovered from his shock.

They set off down the hill, towards their house, and once there, told their father everything. Dad was just as shocked. They rushed towards the tree, Dad accompanying them. They were shocked even further: the tree was gone! "Only one person could have done this," their father growled.

Terry's father parked the car in the parking lot and stormed inside the wood mill. Terry and Messila followed. "Rupert!" The siblings' father snarled when they entered the mill and he approached a man with shaggy hair, a very big and shaggy beard and stormy grey eyes. "Where is

the tree?" Dad demanded, his voice shaking with anger, trying to keep calm. "It's right here," chuckled Rupert and pointed over to a large table. Terry and Messila gaped at the table, which had once been a tree, a very old tree.

Defeated, and on their way home, Terry and Messila listened intently as Dad told them about his old rivalry with Rupert Kirk, whose father was in the business of making wood items and owned the wood mill. Dad had loved the tree very much and Rupert was just the opposite: he always wanted to cut that tree down and give it to Kirk Senior to make something out of it, expecting a big reward.

"We can always plant a new one," suggested Terry "in fact, I think I'll go and buy seeds right now." As he pulled inside the garage and closed the door, Dad smiled, "But be careful of, well, maybe Rupert's kids."

"Don't worry, Dad," said Terry, "oh, and you coming?" he added to Messila.

"Yes, I'll come with you.....once I finish reading my book." Messila said teasingly.

"Hmph. Fine, I'll go alone." said Terry indignantly.

*

---

# BIG C

**Aparna Sangit Vijaykar**

Friends, its gonna be a grand and a special Diwali for us .As you all will be reading this issue, I know my parents are enjoying their togetherness over a cup of tea, after many many stressful weeks, on their own beautiful terrace , surrounded by their beloved plants, birds , good weather and profound relief .

Even as I pen all this , I seem to realize the seven weeks that just went by were given to us by God Himself, to test our integrity and ultimate belief in Him. I think we studied hard and performed well as Dad passed with flying colours !.........the only exam I think, where both appear for the test , but one studies and the other passes ...!

Actually ,this is my description ,not of the journey Dad undertook to his fruitful destination ; it is about my observations and meetings of the different scenes , scenery & the stations that we encountered on the way .A very interesting and a surprisingly eventful journey ; new friendships forged in d process ...nothing lasting ,you know , something akin to two ships meeting on the rough high seas, tooting the foghorn to acknowledge each others' presence and sailing away ........each one left

wondering if the other ship survived the ensuing storm ;but again in trying to keep your own ship afloat , forgetting about the other ship .

So, actually now I am like in a Flashback …..!!!!

Look ,aaie ,there comes that couple; a brief hello to us ,and they start searching for a couple of empty chairs …..and yes , there , that woman does not look like she is from here …more like from Allahabad … that's her husband ,for sure ….oh , she is wearing the same saree everyday …..Dad is sitting quietly ,pretty amused by my comments on all and everything. Just then , I vacate my chair for that gentleman , he surely must be allowed to sit in whatever comfort possible .

This Diwali, I am making a new resolution. Every Sunday, I am going to cook with my daughter, and tell her a tale from my childhood. I'll come back to tell you what her "aavidicha kaam" is once I find out. And yes, if my husband decides to rate our food 1.5 again. I will just challenge him to roll a perfectly round chapati and then we shall see. So there!

✳

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Why are we obsessed with Fair Skin?

**✶Rishi Velkar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

India's obsession with fair skin is not new. India's obsession with fair skin is well documented: in 1978, Unilever launched Fair & Lovely cream, which has subsequently spawned numerous whitening face cleansers, shower gels that claim to lighten the surrounding skin. In 2010, India's whitening-cream market was worth $432 and the demand was growing at 18% per year. Last year, Indians reportedly consumed 233 tonnes of skin-whitening products, spending more money on them than on Coca-Cola.

While we were growing up we were told not to play in the sun because our parents were too cheap to buy sunscreen. We always have seen fair babies getting praised for their light skin and prospective brides being ranked on basis of this skin colour. The first thing that pops in our head when think of fairness are the fairness cream ads on TV be it Emami or Fair and Lovely. The second thing that comes to our mind is Bollywood actors and actresses that we idolize that act in those ads. However is it really fair to blame the media for it because it is us in the end that is us buying the product? While racism runs deep in India's history, its roots intertwined with caste and colonialism, in today's India, it finds its way in consumer behavior and corporate advertising. The prejudice against dark skin has taken on new forms in the modern world.

I follow Bollywood actors closely especially when it comes time for them to give an opinion on certain social issues. I have a couple of observations, do you remember when Aishwarya Rai went on the Tyra banks show and fairness cream racists , got a huge applause from the audience for doing so. Then she turns around and endorses L'Oreal 's skin whitening product called White Perfect and Lux white Glow. Priyanka Chopra in one of her interviews claimed that she got racists comments from the kids in her school in America for being dark. She has endorsed Pond's white beauty and Garnier's Light Ultra. What surprised me the most was Shahrukh Khan in his most recent ad is basically saying that the cream made him successful and throws the cream to a fan towards the end. I mean really ? so hardwork had nothing to do with your success.

In India, a country where the majority of the population is dark-skinned, there is a widely held belief that dark complexions are inferior to fair ones. This prejudice manifests itself in everything from hiring practices that favor light-skinned employees to matrimonial ads that list fairness as a non-negotiable characteristic of the future bride or groom. In the media, light-skinned actors and models are in high demand, while dark-skinned performers are rarely seen on screen. The message is clear: fair skin represents beauty and success, and as a result Indians are keen consumers of products that promise to lighten skin.

The question really is, are we really ready to accept who were and more importantly love the skin we are in?

✳

प्रवासवर्णन

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# DUBAI

**✶ Shubhada Agaskar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

When I was young, we often used to visit my maternal cousin at Dadar. A very good artist, his sketchbooks contained amazing drawings of architectural marvels. On his return from a trip abroad, his photographs too were of fantastic looking skyscrapers. When asked where he had seen these, pat came the reply "Dubai".

As I grew up and started working, a collegue once came in wearing a beautiful necklace. To my question of "Did U get this made?", she replied "Dubai,my dear!".

Due to all these reasons, Dubai was on my 'To-Do List' for a long time. And one day, out of the blue, my husband rang up from office to inform that we would be taking off for Dubai on a short business cum travel trip. Needless to say, I was over the moon.

Passport and visa formalities complete, we boarded the flight with a super-excited daughter who was travelling abroad for the first time. We had read before that to prevent ear blocks during take off and landing, kids should be encouraged to chew. Our darling solved this problem by promptly falling asleep before takeoff. Whew!

When we disembarked, we had to make our way to the immigration counters for retinal scans. It suddenly struck me how vast the





airport was and how much we had to walk. Our problems were solved quite a bit, when we came upon horizontal escalators. One just stood on them and they moved forwards, saving quite a lot of energy, that we needed to keep our daughter entertained, now tired out from all that travelling.

The next day, after breakfast, we set off on a half-day Dubai Tour. The guide was a friendly Pakistani called Jehan. As we set off, the architechture around me kept me spellbound. Each building was a skyscraper and yet so different from its immediate neighbour.

Our first stop was the Dubai Jumeirah Palms. As Dubai ran out of oil, it's ruler decided that Dubai needed a new attraction and along with Nakheel Properties-a Dubai-based developer, embarked on this ambitious project. These are manmade islands created by dredging sand from the bottom of the Persian Gulf and took the combined efforts of of 2 companies- the Belgian- Jan De Nul Group and the Dutch- Van Oord. Work began in June 2001 and took 4 odd years to complete. There are 2 palm islands- Palm Jumeirah and Palm Jebel Ali. We were informed by Jehan that the Jumeirah Palms were connected to the mainland by an underwater tunnel and that

initially, they were going to make the tunnel walls out of sheer glass, but dropped the idea as it would have been distracting for the drivers. The palms are homes to numerous hotels and residential societies. The very happening Atlantis hotel lies here, but we were too pressed for time to explore it.

We then proceeded to Jumeirah beach, from where we could view another man-made island, on which stood the world's only seven star hotel-' Burj-Al-Arab'. It's distinctive sail like shape, with the jutting out helipad, has become one of Dubai's most recognizable symbols. Jumeirah beach is famous for water sports but yet so clean-unlike our very own Juhu beach.

We then proceeded to the Dubai Museum where we learnt a lot about its history. It was a small fishing village way back in 1830. When it was declared a tax free zone, foreign traders poured in and the pearling industry boomed. Afew years later, the Emir of Kuwait lent the then Ruler-Sheikh Rashid, millions of dollars to renovate Dubai Creek, after which huge ships could enter and it became a major trading hub. Interestingly enough, Dubai is placed at the crossroads of the West and the East and attracts tourists from both zones.

In 1966, Dubai discovered oil and earned the attraction of still more traders. As the oil eased off, tourism and the property market took off and still holds the world in its sway. Numerous Bollywood personalities have second homes here, including our ever popular Shahrukh Khan. The current ruler is Sheikh Mohammed bin Rashid al Maktoum, who is also the Vice-President of the UAE.

The museum houses a lot of tableaus of the old fishing village that Dubai once was and a walk down this section reminded me of the





Jorvik Viking Centre in York that I had visited when travelling in UK . Old dhows, wells, excavated jewellery etc show the old way of life and care is taken to include information on Dubai's latest developments.

Our tour then took us to Dubai Creek, which winds its way from the Gulf to the Ras al Khor Bird Sanctuary, on the desert edge. The creek divides Dubai into 2 areas-Bur Dubai and Deira Dubai. We bypassed the Textile Souk ('souk' means market) and boarded an Abra(water taxi)and crossed over to the other side, only to rush into the Spice and Gold souks. While the former reminded me of Masjid, where we still go to buy ingredients for our Pathare Prabhu Sambhar masala, the latter simply took my breath away.

Stretching for a distance of almost 2 kms, stood amazing shops selling gold jewellery. In display windows were kilos and kilos of gold necklaces, earrings, pendants, bangles etc. A huge display window housed an entire armoured breastplate made out of gold while another housed the world's largest gold ring-an amazing 59 kg marvel-the Guinness Book holder for the world's heaviest gold ring ever made. Wives-take note- it takes almost an entire day to go through this souk so bribe your husbands accordingly beforehand. An estimated 10 tons of gold is present there at any given time and one needs the time, patience and money to go through it carefully. Gold is cheaper in the souk as there are no making charges, one only pays for the weight of the gold.

In the afternoon, we proceeded for the Desert Safari. Huge 4 wheel drive vehicles, with the air let out of their tyres, took us up and down the undulating sand dunes at roller

coaster speeds. The vehicles would crest a dune, roll down at a scary angle, only to climb up the next dune and repeat the exercise all over again. We rolled in the sand and our daughter kept searching for the sea( used to building sand castles at Juhu, she occasionally dashes into the water there) and had to be told that she was in a desert. We even tried climbing up a sand dune-a task that looks deceptively easy, but in reality is far more difficult. We took in the Belly Dancer show and marvelled at the ease with which the woman flexed and bent her body. We even saw camels up close and one of them looked at me with a bleary eye and spat right at me!

The next day, we spouses took off in groups to explore and shop to our heart's content. We discovered chocolate covered dates and other delicacies in the local market. There are numerous departmental store chains there, Lulu's and Carrefour being the most popular ones. Dubai is a very safe city for women and wherever we went, we were treated respectfully. One only crosses at the zebra crossing in Dubai, otherwise one runs into trouble, remember this simple rule while walking there on the streets and you will be OK. Metros and buses use the same pass card. One simply tops off the card and uses it to navigate the city.

A new day brought a change of living quarters. A close relative had kindly agreed to put us up for the remainder of our stay there. She lived in Al Nahda, near Sharjah-another emirate in the UAE. Some yummy home-cooked food later, we were ready to kiss her hands. As a cousin says-"I may go anywhere in the world but upon coming home, I want my pohe and bhujana bhaat!". Throughout our stay, our hosts kept us like royalty, even picking us up late one night, when we we were unable to get any vehicle back from one of our many shopping trips.

We visited the world's tallest building-the Burj Khalifa- an impressive 163 floors high. The entrance to this edifice lies through the Dubai Mall and we were whisked up to the Observation Gallery on the 127th floor in just a minute- a very smooth ride indeed! The city stretched out below us and cars looked like tiny toys on the streets far below. As we were whisked down again, we learnt that Shilpa



Shetty had an apartment there! Wow! In the evening, the Dubai Mall holds a spectacular musical fountain show. I was told by one of my friends that if I went to Dubai and returned without seeing this, I would miss a lot! My husband's old college friend met us here and since he has been staying here for numerous years, he knew the best place from where to view the show and guided us towards the perfect spot to witness a mindblowing display of water dancing to the tune of music so enthralling that you feel as if the Sirens are singing and you are being pulled closer, like Odysseus.

We also visited the Dubai Aquarium. The entrance is through a glass tunnel and as you pass through it, you can see sharks, huge rays and other terrifying fishes overhead. You can't help thinking 'What if it comes crashing down?'. Our friend told us that a panel once developed a tiny crack and they had to evacuate most of the mall to repair it.

Throughout our stay, we visited numerous malls (in Dubai, if you throw a stone, you are bound to hit a mall-every few months, a new one mushrooms up). We visited Candilicious-the world's largest candy store and went simply crazy trying to figure out what to buy….there was so much variety there! But by far, the most favorite part of my mall hopping was a visit to 'Ikea'-a furniture design store that I visited on the last day, along with my relative. I went crazy-such wonderful interior decorating ideas-but alas! We had to leave for the airport in an hour's time and hardly got to explore every nook and cranny of this fascinating store.

Dubai, I will be bac0k some day, with more time at my disposal-I now have a close friend who has relocated there and a furious cousin who was mad at me for not staying over at his place on my visit there. Only this time, I will be carrying extra bags-empty ones!!! ✳

# " WHY ME ….LORD ? "

**✶ Swagata Vijaykar ✶**

"What is the question that the people commonly ask when in a difficult situation? "

Answer is not too difficult right …..

Yes, it's "Why me ?? …Lord why only me???

Now next question ….. Sorry, I know we are not playing "Kaun banega crorepati ", I promise this is the last question.

"What is the question that the people commonly ask when they get success or are happy on their achievement? "

Is the answer again , " Why me ?? …Lord why only me???

No …..That's not right.

So Just let's sit back and think for a moment, how many of us Thank god when we are Happy?

Are there many? …If you say , 'YES'…. you are joking.

Most of us remember god only when we are going through a difficult phase of our life and just ignore him when we are contented. We may not be doing it intentionally but some people do think God needs to be remembered only in tough situation and in our happy times let him rest !!! ….

Instead let's change our attitude a little bit. Let's have faith in him and have confidence that he is always there with us. Also let's ask him 'WHY Me " in both up's and down phases of our life and then count them. And to our surprise , I am sure in most of our lives , result would be a balance count or 'WHY Me ' counts would even exceed in up's. So basically God distributes success and pain evenly . Only that since we notice him during down time …we feel need to ask him ' Why Me ? " .

Better way would be instead of struggling to get answer of "why me " , which I am sure is sheer waste of time since we won't get the answer , concentrate on resolving the problem.

Now that GOD has selected us for the problem, let's see how to welcome and overcome it….

(Always remember before selecting you , he has already given you secret weapon called 'COURAGE ' to face it so he was actually partial …..right ? )

Now first and foremost , **Don't compare** - You are special in this world. Don't compare yourself with others since no one can play your role better than you.

Remember, God has carved you as a unique piece and has very special plans for you hence don't ruin his plans by comparing yourself with other's life and expecting same results.

Instead take your situation as a challenge and try to fight it.

You will notice , when you stop

comparing , half of your worries have gone. So you have already won 20 % of the battle when you are yet to start working on your problem.

Sounds encouraging!!!! ….let's proceed.

Now let's concentrate on other weapons that we will need to sharpen to overcome the problem …

✳ Positive attitude – This eight letter word " POSITIVE " can do miracles. I really mean it. It creates positive vibes that makes you optimistic. As rightly said , quality of thoughts do create quality of life.

✳ Every Problem has a solution – Believe that there is always a solution for a problem but we just need to find it out. May be that's not a solution which we desire for ourselves but GOD has desired for us and can take us to great heights.

✳ Wear a Smile – Smile comes at no extra cost, one of the freebies in this expensive world, hence use it generously. Smiling in hard times requires skill but if you can do it ,it will help win the battle.

✳ Patience - Don't be in hurry as things will happen only on right time. So have patience.

✳ Avoid Tension – Taking tension is like carrying that extra load of luggage though it is not going help you in your journey. So might as well shed that extra load on your route so that you can feel lighter and can concentrate on the problem.

That's it !!!.

So try using above weapons and focus on your solution and it will help you to be out of the problem.

So next time when we are in a problem , let's say " So what ? " rather than "why me ??".

✳

## LIFE OF MISERY

**Where Beyond the East**
**Beyond the West,**
**All made me as thy Guest,**
**No one made me as they Home,**
**Out, as thy guns Booms.**

**Ho sign of Sympathy and Love,**
**Always to be down & Bow,**
**God is in the silent Sleep,**
**Can't think what drink should I Slip,**
**Fed – up of Life of Mutiny,**
**Awaiting to open my Destiny.**

**Shailesh Vijayakar**
Andheri


**खास पाठारे प्रभूंचा ताशा**

मुंजी, लग्न, वरघोडा आणि
वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

*मोबाईल नं.:*
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९

*पत्ता:*
खोली क्र. ७, पहिला मजला,
(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४००००८

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Honesty and Dignity... the hallmarks of a sportsperson

✶ **Anjor Kothare** ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

A flake of truth
A crumb of honesty
A drop of kindness
A grain of humility

Himalayan mounts of truth
Thousand loafs of honesty
Oceanic fluxes of kindness
Truck loads of humility

From a good start
To a lofty destination

That is the true self of a sportsman .Honesty and dignity of a sportsman or a person in general are like food clothing and shelter for him….without which living, is next to impossible. A person when chooses a field like sports as a career he, at the very start, steps onto the ground swearing a pledge that he would never cause a breach in the protocol.He would always abide by the rules that are set by the dark lords of his field.He will always consider honesty and self-dignity as his hallmarks without which he has got no standing in the society.Now friends lets go on a trip round the world of sports where fixing scandals have taken place. These scandals have maligned the image of that sportsperson and the entire sports industry at large…..

Take a look at the match fixing scandals that have been surfacing these days. Well known players were accused of taking loads of money for losing matches.It is so shameful to hear of this when people just keep their dignity in abeyance and sell themselves for money which is not going to last them for long.

Is it not a question to be prod upon??

Its time that we take a call on what do we want to build our life on .Whether to rely on our transparent principles or on dubious standards and fickle mindsets.

Sports is such a noble profession when we look at the sporting icons of our country we feel proud that such great and enchanting players have been born in this nation .But, have we ever tried to give a thought to the fact that how they must have reached to such a lofty destination?

They had the all encompassing passion to win ,to excel,to get there and most importantly doing their noblest by giving prime importance to honesty and dignity.

We have a live example in front of us..of the master blaster of our country.

When he knows that he is out, he just walks away from the ground even if the umpire is being a bit considerate towards him.

So friends sportsmanship is the essence of it all. The one who carries in the blood is the real HERO. He will always win accolades no matter if his performance may go through ups and downs

✳


ी मंदिर
DR. ANITA RANE


सखुबाई, एवढं तेल भुजण्यात घातलंस तर आमचं दिवाळं निघेल !!
चुक झाली बाई, चुकून माझं भुजणं तुम्हाला वाटलं

<u>लेख</u>

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# दिलासा

**⋆ बागेश्री परीख ⋆**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विलेपारल्याच्या पूर्व भागात लोकमान्य सेवा संघ ही ९० वर्षे जुनी संस्था अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवीत आहे.

लोकमान्य सेवासंघाच्या इमारतीच्या मागील बाजूस म्हणजे टिळक मंदीर रस्त्यावर तुम्ही फेरफटका मारल्यास 'लोकमान्य निवास' या इमारतीच्या तळमजल्यावर 'दिलासा : ज्येष्ठ नागरिकांसाठी संवाद सल्ला व सहयोग केंद्र व हेल्पलाईन' अशी निळ्या रंगाची पाटी तुम्हाला दिसेल.

सहज कुतुहल म्हणून तेथे डोकावल्यास सि. म. जोशी दिलासा शाखेच्या ज्येष्ठांसाठी संवाद सल्ला व सहयोग केंद्राच्या हेल्पलाईन समुपदेशन केंद्राची व दिलासा शाखेची माहिती तुम्हाला मिळेल.

लोकमान्य सेवा संघाचा जांभुळपाडा येथील 'आनंदधाम वृद्धाश्रम' सुरू होऊन १६ वर्षे झाली आहेत. तेथे अनेक वृद्ध सुखासमाधानाने आणि आनंदाने रहात आहेत. परंतु उपनगरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संघातर्फे काहीच उपक्रम नव्हते, ते दिलासाच्या रूपाने उपलब्ध झाले आहेत.

'दिलासा' शाखेला सुरू होऊन चार वर्षे झाली असून ज्येष्ठ नागरिकांसाठी हे मुक्त व्यासपीठ आहे. ज्येष्ठांना एकत्र येण्यासाठी, परस्परांशी संवाद साधण्यासाठी, विचार मांडण्यासाठी व इतरांचे विचार ऐकण्यासाठी आठवड्यातून एकदा दर गुरुवारी दिलासाची सत्रे सुरू आहेत. त्यात सामाजिक, साहित्यिक, आरोग्य विषयक, कायदे विषयक, तसेच पर्यावरण, पर्यटन, आहार, कला अशा अनेक विषयांवर चर्चा केल्या जातात. व ज्येष्ठांना बोलते केले जाते. महिन्यातून एकदा महत्वाच्या विषयांवर मान्यवर तज्ञ व्यक्तींची व्याख्याने ज्येष्ठांना खूप काही देऊन जातात.

दिलासाच्या सभासदांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक, प्राध्यापक, इंजिनियर्स, डॉक्टर्स, बॅन्कर्स, चार्टर्ड अकाऊन्टंटस, मॅनेजमेंट कन्सलटंटस्, अगदी निवृत्त न्यायाधीश, लेखक, कवी, कलाकार अशा उच्च शिक्षित ज्येष्ठांचा समावेश पाहून दिलासाच्या पदाधिकाऱ्यांनी या सर्व सभासदांच्या ज्ञानाचा व अनुभवांचा लाभ समाजाला कसा मिळवून देता येईल या दृष्टीने विचार सुरू केला आणि या विचार मंथनातून संवाद - सल्ला - सहयोग या हेल्पलाईन व समुपदेशन केंद्राचा जन्म झाला.

दिलासाचे हेल्प लाइन कार्यकर्ते आणि ज्येष्ठ सभासद सांगतात की दिलासामध्ये सहभागी होताना आणि आनंदाचा आस्वाद घेताना त्यांना असे नेहमी वाटायचे की आपल्यासारखे वृद्धत्वाकडे झुकणारे अनेक वृद्ध असतील. त्यांच्या अनेक समस्या असतील, गरजा असतील. आपण आपल्या सेवा त्यांच्यापर्यंत पोचवू शकलो तर त्यांचे उर्वरित आयुष्य सुखावह करू शकू ह्याच हेतूने आणि एक सामाजिक बांधीलकी म्हणून या उपक्रमात सहभागी झालो आणि खूप समाधान मिळालं.

आज ग्रामीण भाग असो वा शहरी सगळीकडे ज्येष्ठ नागरिकांना विविध समस्या भेडसावत आहेत. आधुनिक काळात समाजातील एकत्र कुटुंब पद्धतीचा झालेला ऱ्हास आणि सतत वेगाने बदलणारे सामाजिक जीवन यामुळे अनेक कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य, प्रेमाच्या जिव्हाळ्याच्या चार शब्दांना पारखे झालेले दिसतात. त्यांची होणारी कुचंबणा, अवहेलना यामुळे त्यांना नैराश्य येते. कोणाशी तरी मनमोकळे बोलावे असे वाटते.

वृद्धांच्या समस्या समजून घ्यायच्या असतील तर

त्यांच्याबरोबर मनमोकळा संवाद साधायला हवा. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना कुणापाशी तरी मन मोकळं करण्याची किंवा व्हेंटीलेशनची गरज भासते. त्यांना त्यांच्या समस्यांची उकल पाहिजे असतेच असे नाही पण कुणीतरी आपलं म्हणणं ऐकून घेणारे आहे ही कल्पनाच त्यांच्यासाठी सुखावह असते. कधी कधी त्यांना भावनिक आधाराची गरज असते. आणि ही गरज भागवण्यासाठी हेल्पलाईन आणि समुपदेशन केंद्र कार्यरत आहे. त्याचा नंबर ०२२ - २६१४२१२५ असा असून गरजू व्यक्ती सोमवार ते शनिवार सकाळी १० ते १२ दरम्यान या हेल्पलाईनचा लाभ घेऊ शकतात. ह्या उपक्रमाची सुरुवात १७ ऑगस्ट २०१३ रोजी सुप्रसिद्ध लेखक श्री. अच्युत गोडबोले ह्यांच्या हस्ते झाली आणि गेल्या १५ महिन्यात अनेक ज्येष्ठ नागरिकांनी ह्या सेवांचा लाभ घेतला आहे.

मनमोकळ्या संवादाबरोबरच कायदेशीर बाबी, इच्छापत्र करून देणे, वैद्यकीय सल्ला, कौटुंबिक समस्यांमध्ये सल्ला व समुपदेशन, आर्थिक बाबींमध्ये मार्गदर्शन, वृद्धाश्रमांची माहिती पुरविणे, काळजीवाहू संस्थांनी संपर्क, देहदान, नेत्रदान, त्वचादान व अवयवदान ह्यासंबंधी फॉर्मस् उपलब्ध करून देणे व माहिती पुरविणे, वैयक्तिक सुरक्षेबाबत माहिती देणे अशा अनेक सेवा येथून पुरविल्या जातात.

कायदेशीर बाबींसाठी तसेच वैद्यकीय मदतीसाठी वकील व डॉक्टरांची पॅनल्स येथे तयार केली गेली आहेत. प्रशिक्षित समाजसेवक आणि समुपदेशक ह्या सेवा पुरवीत आहेत. हे केंद्र रोज सकाळी १० ते १२ कार्यरत असते. रोज दोन स्वयंसेवक कार्यकर्ते टेलीफोन घेण्यासाठी सज्ज असतात. त्याचप्रमाणे बरेचसे ज्येष्ठ नागरिक स्वत: केंद्रावर येऊन संवाद साधतात आणि आपल्या विविध समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करतात. येथील सर्वच स्वयंसेवक सेवाभावी व कर्तव्यदक्ष आहेत.

केंद्रातील सर्व सेवा विनामूल्य आहेत. ह्या केंद्रातर्फे महाराष्ट्रातील वृद्धाश्रमांची माहिती देणारी एक पुस्तिका छापून घेतलेली असून कुठल्या वृद्धाश्रमात किती जागा आहेत, त्यांचे शुल्क किती आहे, अनामत रक्कम किती भरावी लागते अशी संपूर्ण माहिती त्या पुस्तिकेत दिलेली आहे. ही पुस्तिका केंद्रात अत्यल्प किमतीत उपलब्ध आहे.

कौटुंबिक समस्या तसेच व्यसनाधीनता या समस्यांवर समुपदेशनासाठी पण बऱ्याच केसेस येथे येत असतात. बरेचसे ज्येष्ठ नागरिक फोनवर संवाद साधतात. हे फोन अगदी रत्नागिरी, मुरूड, कल्याण अशा ठिकाणाहूनसुद्धा येत असतात. तुमच्याशी बोलल्यावर मला खू बरे वाटले. हलके वाटले अशी पोचसुद्धा अनेक जण देत असतात.

लक्षात राहण्यासारख्या अनेक समस्या येतात. एका प्रौढेचा फोन आला होता. ती एकटीच राहात होती. घरचे आप्त निवर्तले होते. एकटेपणा तिला खायला उठला होता. आयुष्य संपवून टाकण्याचे विचार तिच्या मनात सतत येत होते. तिच्या फोनवरच्या बोलण्यावरून तिचा एकाकीपणा स्पष्ट जाणवत होता आणि काळजाला भिडत होता. आमच्या स्वयंसेवक तिच्याशी अर्धा तास बोलत राहिल्या आयुष्य किती सुंदर आहे. मनाची मरगळ झटकून टाकून देऊन सकारात्मक विचार करून आपण किती सुंदरतेने जगू शकतो हे तिला पटवून देण्यात आले आणि फोनवरचे बोलणे संपविताना तिने आयुष्य संपविण्याचे विचार मनातून पूर्णपणे काढून टाकल्याचे सांगितले व केंद्रामध्ये भेट देण्याचे आश्वासन पण दिले. अधुन मधून ती महिला फोन करते. आमचे स्वयंसेवक कार्यकर्ते तिच्याशी मनमोकळा संवाद साधतात. या संपूर्ण प्रक्रियेत त्या स्वयंसेविकेला निखळ आनंद व कुणालातरी मदत केल्याचे समाधान मिळाले.

एक सत्तरीच्या आसपासचे गृहस्थ केंद्रावर आले होते. स्वत:चे राहाते घर विकून मोठे घर घेण्यासाठी सगळी पुंजी मुलाच्या स्वाधीन करून बसले होते. मोठे घर मुलाच्या नावाने घेतल्यानंतर त्यांना जाणवले की मुलगा व सून त्यांची आस्थेने विचारपूस करत नाहीत. पूर्वीचा आदर, मान, जिव्हाळा जाऊन त्यांचा दुस्वास केला जात होता. एका पायपुसण्याचा दर्जा दिल्याची भावना त्यांना जाणवत होती. त्यांचे म्हणणे पूर्ण ऐकल्यानंतर त्यांना सांगण्यात आले की, आपण तुमच्या मुलाला व सुनेला बोलावून घेऊया. त्यांची पण बाजू ऐकून घेऊया. पण त्या गृहस्थांना ह्या सर्वाची भिती वाटत होती. ते म्हणाले की नको, मी फक्त तुमच्याशीच ही गोष्ट बोलतो. त्यामुळे माझे मन मोकळे होते व बरे वाटते. आणि फारच त्रास झाला तर तुम्ही मुलांना बोलवा व समुपदेशन करा.

दिलासा केंद्रामध्ये वयोवृद्धांची मदत करताना,

(पान १०७ वर)

# आठवणींची जाळी!!

-रंजन खंडेराव विजयकर

कधी कधी मूड बनतो, कधी कधी मूड बनतो
आठवणींच्या धाग्यादोरांनी आठवणींचीच जाळी विणतो
धागा दोरा सूत यापैकी काहीही चालते
आठवणींचे सूत धरून सुख स्वप्नांचा स्वर्ग गाठतो
आम्ही सारे साठी पल्याड, पाठी राहिले आठवणींचे गाव
आठव म्हणता आठवत नाही कधीतरी कुणाचे तरी नाव
किस्से मात्र विसरत नाही, मैफल जमली की उफाळून येतात
अविरत लाटांसारखी सुखद फेसाळ फेन सोडून जातात
सणासुदीला गर्दी होते, लहान थोरांची वर्दळ होते
ऐशी पासून आठ महिने सर्व वयांची हजेरी लागते
वाड्यात वाकून पाहता कोठे होन्डा, कोठे एसेक्स फोर, मांझा, वॅगेनार यांची लागते रांग
आठवणीतल्या दिवाळीत मात्र सिनेमा पहावयाला आम्ही पकडतो बेस्टची रांग
गच्चीवरती जेवणे वर्साव चेण्याच्या सहली
सव्वीस जानेवारीची रोषणाई फक्त आठवणीत राहिली
विमानात उडलो दिव्यांची रांगोळी बघण्यात दंग झालो
ओटीवरची रांगोळी, भिंतीवरचा गौरीपट बघता बघता मोठे झालो
बंगला, बाग, गच्ची, वाडा हातात हात धरून फेर घेतात
साठ सत्तर वर्षानंतर कधी मधी स्वप्नी येतात
गेट टूगेदरच्या निमित्ताने सगळे जण एकदम येतो
स्कॉचच्या घोटाबरोबर आठवणींच्या महासागरात यथेच्छ पोहतो
हव्या हव्याशा आठवणी उकरून मनसोक्त हसतो
पुरणपोळी राहते मागे, होळी मधले पैसे मात्र खूप आठवतो
नकला होतात, जुन्या गाण्यांची उजळणी होते, जोक्स रिपीट होतात
आठवणींच्या भिंतीवरचे फोटो पाहता काही चेहरे धूसर दिसतात
आजूबाजू पाहता दोन चेहरे दिसत नाहीत
कारे गेलात भरली मैफल अर्धा डाव सोडून
एक दिवस जात नाही मागे पाहत वळून
तुम्हा दोघांची आठवण येते सतत राहून राहून
आठवणींच्या आरशात चेहऱ्यावर सदा मिश्किल हसू असते
काळ चालला पुढे काळाबरोबर तडजोड करतो
नियतीचा खेळ सारा म्हणून उद्याची वाट बघतो
काळ म्हणतो थांबणार नाही, हात धरून फरफटत नेतो
साखरपुडे, लग्ने, डोहाळे जेवणे, बारशी, संक्रांत, पिठोरी सर्व काही साजरी करतो
नवे चेहरे नवी नाती, आता ग्रुप फोटो छोट्या कॅमेरात मावत नाही

थोडेफार सावरतो पुढे पाहतो, तरी देखिल मागचे काही विसरत नाही
नवा डाव नवी घरे पुन्हा नव्या उमेदिनी सजवतो
दोन अडीच वर्षानंतर नव्या वास्तूत सुखावतो
बंगले फ्लॅट्स गाड्या ही सर्व वरवरची माया
ज्यांचा वारसा घेऊन जगतो त्यांचीच ही सर्व किमया
स्वत:साठी जगले थोडे आमच्यासाठी झटले बहुत
चैन फार केली नाही, म्हणून का आज आम्ही सुखी आहोत?
विरासत पाठी सोडून गेले अपेक्षा काहीच केली नाही
भिंतीवरती फोटो नाहीत कारण आजची ती फॅशन नाही
मनातल्या मनात होतो नतमस्तक
असाच राहू दे सदा वरद हस्त
तुम्हाला संबोधले आई-पापा, आई-डॅडी, आई-बाबा
तुम्हीच आमचे दैवत सदा, तुम्हीच आमचे साई-बाबा
तुम्हीच आमचे साई-बाबा!

*

---

(पान १०५ वरून)
कुठल्याही दृष्टीने तरुण पिढीला बदनाम केले जात नाही की डावलले जात नाही. त्यांचीसुद्धा बाजू समजाऊन घेऊन नात्यामध्ये समन्वय कसा साधता येईल याचाच विचार केला जातो. अशीच एक वृद्धा स्वत: केंद्रात आली होती. पती निधनानंतर मुलाबरोबर रहात होती. एक लग्न झालेली मुलगी पण होती. राहते घर जे त्या वृद्धेच्या नावावर होते व थोडीशी मिळकत होती, ती स्वत:च्या नावावर करून देण्यासाठी मुलगा व सून तगादा लावीत होते. मुलीची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. तिला काहीतरी मदत करावी असे त्या आईला वाटत होते. परंतु उपाय दिसत नव्हता. इच्छापत्र करण्याचा व ते कसे करायचे हा सल्ला तिला देण्यात आला आणि संपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले. तिला इच्छापत्राचा पर्याय ठाऊकच नव्हता. ती दिलासाची ऋणी झाली आणि कार्यकर्त्यांना तिला मदत केल्याचे समाधान मिळाले.

अलिकडे वृद्धांना सांभाळणे ही एक सार्वत्रिक समस्या झाली आहे. पूर्वी वृद्ध माता पित्याची सेवा मुलगा, सून व कुटुंबातील इतर कर्तव्य म्हणून तर; पुण्यकर्म समजूनही करीत असत. परंतु आजच्या भोगवादी व चंगळवादी युगात आजारी वृद्ध म्हणजे जीवनातील समस्याच नाही तर; एक मोठा अडथळा झाला आहे. अनेक वृद्ध दाम्पत्य, एकेकटेच राहतात. मुले परदेशी नाहीतर बाहेरगावी. पती पत्नीपैकी एकाला अल्झायमरसारख्या असाध्य व्याधीने ग्रासले की दुसऱ्याची कुचंबणा होते. उतारवयात सहनशक्ती कमी झालेली असते. शरीराबरोबर मनही थकलेले असते. अशावेळी दिलासा केंद्रातील मुक्त संवाद आणि समुपदेशन मिळाले तर खूप आधार वाटतो. आणि दु:ख सुसह्य होते. दिलासा गुरुवारच्या सत्रातील सहभागातून जीवनातील विविध समस्यांना सामोरे जाण्यासाठी बळही मिळते.

अशा एक नी अनेक केसेस केंद्राकडे येत आहेत. येथील सेवांचा उपयोग अधिकाधिक लोकांनी करून घ्यावा अशी कार्यकारिणीची इच्छा आहे. शेवटी येथे एकच सांगितले जाते. पूर्ण गुप्तता राखून ऐकणे हे आमचे कर्तव्य आहे. तुम्हाला समजून घेणे ही आमची जबाबदारी आहे. तुमच्या परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून तुम्हाला योग्य तो मार्ग दाखविताना तुमची काळजी घेणे हा आमचा उद्देश आहे.

(लेखिका दिलासा हेल्पलाईनच्या समन्वयक आणि मुंबई कौटुंबिक न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश आहेत.)

*

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# पाळणाघर ते वृद्धाश्रम

✶ सुबोध ग. प्रधान ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

राधाबाई हळुहळू पायऱ्या चढून वर आल्या. तेवढ्यात संचालिका वत्सलाबाई पुढे आल्या व हसून म्हणाल्या, ''या... या राधाबाई.. या आलात... कशा आहात?'' तेवढ्यात रवी म्हणाला, ''आई ह्याच त्या संचालिकाबाई बरं का बाई... मी काही दिवसांसाठी बाहेरगावी जात आहे. माझ्या आईला इथं काही दिवस ठेवून जात आहे. तिला काहीही कमी पडू देऊ नका, पैशांची गरज पडली तर लगेच आम्हाला कळवा... आई आणि तूही काही हवं असल्यास लगेच फोन कर हं?'' ''नाही हा तुम्ही अगदी निश्चिंत रहा, हा जरी आमचा आश्रम असला तरी इथलं वातावरण आम्ही अगदी घरच्यासारखं ठेवलंय त्यांना इथं अजिबात परकं वाटणार नाही. तुम्ही काहीही काळजी करू नका.'' वत्सलाबाई म्हणाल्या.

''ठीक आहे,'' रवी म्हणाला, ''आणखी एक. तिला एकटं कुठंही बाहेर पाठवू नका.'

''छे... छे... आम्ही कुणालाच एकटं बाहेर जाऊ देत नाही.'' आणि त्याच वेळेस जयश्री रवीला म्हणाली, ''अहो चला आता. इथंच बोलत बसलात तर मला आणि तुम्हाला दोघांनाही ऑफीसला उशीर होईल.''

''हो... हो चला... आई येतो हं बाय बाय.. टाटा... टाटा'' राधाबाईंनी हात उचलून टाटा केलं आणि हलक्या आवाजात म्हटलं, '' लवकर येशील ना रे'' ''हो... हो... अगं माझं काम झालं की लगेच दोन दिवसात परत येतोच बघ.''

दोघंही गाडीत बसली. गाडीने झोकदार वळण घेतलं आणि वेगात दृष्टीआड झाली. हल्ली असे प्रसंग वरचेवर येत होते. पुष्कळवेळा रवी परत आला तरी त्यांना इथंच ठेवलं जात होतं.. रवी बाहेरगावी जात असे तेव्हा सूनबाई आपल्या माहेरी जाऊन राहात असे. रवी आणि सूनबाई ज्या दिशेने गेले तिकडे राधाबाई शून्य नजरेने पाहात उभ्या राहिल्या.

त्याच्या मनात आठवणींचे भोवरे गरगरत होते. तेच निरोप घेणं, तेच निरोप देणं... तीच जीवघेणी ताटातूट. चित्र बदललं नव्हतं. फक्त पात्रांची अदलाबदल झाली होती.. पायरीवरची माणसं आत होती. आणि आतली माणसं पायरीवर आली होती..

बावीस तेवीस वर्षापूर्वी त्यावेळची तरुण राधिका रवीला पाळणाघरात सोडताना अशीच प्रश्नउत्तरं होत होती. तिला निरोप देताना रवीचे डोळे पाण्याने भरून येत.. तो म्हणे 'आई थांब ना जरा...'' ''नाही रे बाळा, मला उशीर होतो रे. हे बघ संध्याकाळी येताना तुला छानसं चॉकलेट आणीन हं आता सोड बघू माझा पदर...'' मग पाळणा घरातल्या बाईकडे वळून राधिका सांगायची, ''अहो त्याला एकटं बाहेर जाऊ देऊ नका. खिडकीवर चढू देऊ नका. नीट लक्ष ठेवा हं त्याच्याकडे.'' ''नाही... हो.. आम्ही मुलांना बाहेर सोडीतच नाही. तुम्ही काही काळजी करू नका.'' पुन्हा एकदा त्याचा पापा घेताना... मनोहर वैतागून म्हणे... ''चल आटप आता आणखी इथं थांबलीस तर तुलाही ऑफीसला उशीर होईल आणि मलाही...'' आणि भराभर पायऱ्या उतरून रिक्षा पकडून स्टेशनची वाट धरत असे.

... वाटेत मनोहर सांगत असे, ''हे बघ तुला इतकं कठीण वाटत असेल तर तू सरळ नोकरी सोडून दे... मी काही तुला नोकरी करण्यास सांगत नाही.''

''अरे... पण आजच्या ह्या जीवघेण्या स्पर्धेत रवीला चांगले शिक्षण घ्यायचे असेल तर... पैशांची व्यवस्था आतापासून नको का करायला?''

आजही बावीस तेवीस वर्षानंतर वृद्धाश्रमात

असताना राधाबाईंच्या मनात हेच विचार येत होते. ज्या पाळणाघरात त्यांनी रवीला ठेवलं होतं त्या बाईंनी सांगितलं की तुमचा मुलगा आता मोठा झाला आहे त्याला आता आमच्याकडे जागा नाही... आणि पुढच्या वर्षापासून आपण त्याला एका ओळखीच्या बाईकडे ठेवू लागलो... तेव्हा त्या बाई म्हणाल्या होत्या, 'तुमचा मुलगा खूप गुणी आहे' सारखा पाटीवर काहीतरी लिहीत असतो किंवा काहीतरी वाचत असतो. कसला ही हट्ट करीत नाही' आणि ते खरं होतं.. इतर मुलांसारखी त्याने कधी खेळणी मागितली नाहीत. खाऊ मागितला नाही.

वर्ष उलटत होती. रवी मोठा होत होता. आयुष्यभर नोकरीसाठी केलेली धडपड, त्यातच मनोहरचा झालेला अपघात.. आणि आपल्यावर एकल पालकाची पडलेली जबाबदारी. राधाबाईंना एक प्रसंग आठवला. दिवाळीचा पहिला दिवस. त्या दिवशीसुद्धा आपण त्याला पाळणाघरात ठेवले आणि आपण ऑफीसमध्ये गेलो कां? तर त्यावेळेस रजेच्या दिवशी डबल ओव्हर टाईम मिळत असे.. त्या दिवाळीच्या दिवशीही आपण त्याला तेला उटण्याने अभ्यंगस्नान घातले नाही. आयुष्यभर नोकरीसाठी धडपड केली.. सकाळ संध्याकाळ रेल्वेच्या डब्यातून प्रवास केला. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून पैसा जमविला, आणि मुलाला उत्तम तऱ्हेचे शिक्षण दिलं. ॲडमिशनसाठी लाखांच्या घरात खर्च झाला होता आणि रवीने त्याचं सार्थक केलं होतं, प्रत्येक वर्षी मेरीट लिस्टमध्ये त्याचं नाव येत होतं; आणि आपल्याला धन्य वाटत होते, परंतु ही धन्यता फारच अल्पकाळ ठरली होती. आणि ह्यात आपल्याला काय मिळालं? पण काही मिळावं यासाठी हा अट्टाहास नव्हताच मुळी.

पुन्हा तेच विचार त्यांच्या मनात येत होते. राधिकेनं आणि मनोहरने मनात बरेच आडाखे बांधले होते. बरीच मनोराज्यं रंगविली होती. रवी मोठा होईल. शिकून सवरून सुखी होईल. त्याचं लग्न हौसे मौजेने करून द्यायचं. मुलं, नातवंडांनी धर भरून जाईल.. वगैरे वगैरे. पण अशी इच्छा मनात धरणं चूक आहे का? परंतु आपल्या पसंतीच्या मुलीशी लग्न करून पहिल्याच तडाख्यात ते स्वप्न धुळीला मिळालं होतं. नियती आपल्यावर सूड उगवत आहे का? जे बालपण हौसेमजेत बागडण्यात घालवण्याच्या वेळी आपण मुलाला चार भिंतीआड कोंडून ठेवलं.. पण ते त्याच्या सुखासाठीच ना? मग आयुष्य उतरणीला लागल्यावेळी असं वृद्धाश्रमात राहाण्याची वेळ का यावी आपल्यावर?

बालपण हौसेमौजेत घालविण्याच्या वेळी, आणि जेव्हा आईच्या प्रेमाची, उबेची गरज असताना त्याला चार भिंतीत कोंडून ठेवायची वेळ यावी.. पण त्याला काय उपाय होता? चांगलं शिक्षण मिळालं म्हणूनच आज ऐषारामात आयुष्य जगता येतं ना?

प्रश्न? प्रश्न? प्रश्न? ह्यात आपलं काय चुकलं?

खरं म्हणजे आयुष्यभर आपण फक्त गणितं मांडायची असतात. त्यांच्या उत्तरांची किंवा ताळेबंद जुळविण्याच्या फंदात पडायचं नसतं. म्हणजे उत्तर चुकलं तरी मनाला दुःखाची झळ जाणवत नाही. म्हणजे आपण जे गणित मांडले होते ते चुकीचे होते का? की गणित बरोबर असून उत्तर चुकीचे होते? राधाबाई.. त्या विचाराच्या भोवऱ्यात आणखी गुरफटत चालल्या होत्या. आपलं काय चुकलं? आणि रवीचं काय चुकत आहे? की दोघेही आपापल्या ठिकाणी चुकत आहेत?... मग बरोबर कोण? खरं म्हणजे ह्या फंदातच पडायचे नसते.

हीसुद्धा एक योगसाधना आहे. आणि ती साधायला मोठा त्याग करायला लागतो. असं नाही.. फक्त मनाची तयारी असावी लागते.

मुलगा मोठा झाल्यावर... त्याला स्वतःची सुख दुःखं; आवड, निवड, प्रेम, माया, ममता, मुख्य म्हणजे तो स्वतंत्र आहे जबाबदार आहे, ह्याची जाणीव ठेवणे, आपल्या विचारांची त्याच्यावर जबरदस्ती न करणे, हे वेळच्या वेळी उमगणे जाणून घेणे जास्त महत्वाचे आहे. राधाबाईच्या डोक्यात प्रकाश पडत होता. मुलाच्या मार्गात म्हणूच आडवं पडण्याचा आपल्याला अधिकार नाही.... आणि त्याच्या मार्गात आपल्याला आडवं पडायचंच असेल तर दीपगृहाप्रमाणे... जरूरी लागलीच तर मार्गदर्शनासाठी... कारण शेवटी आईचा श्वास ध्यास हा मुलाच्या सुखासाठी, कल्याणासाठीच असतो ना?... म्हटलंच आहे ना?

''घार उडते आकाशी परी लक्ष तिचे पिलांवरती''
परंतु... ''घे जन्म तू फिरूनी येईन मी ही पोटी.''
असं पण कधी मुलाला वाटेल का?

*

## पाठारे प्रभू सोशल समाज

कोजागिरी सहल, नवरात्रौत्सव या संस्थेने साजरा केला. त्याविषयी पुढील अंकी जरूर वाचा.

## पाठारे प्रभू महिला समाज

या संस्थेच्या शतकसोहळ्याची सुरुवात 'शताब्दी एक्स्प्रेस' या नावाने दिनांक २१-९-२०१४ रोजी रवींद्र नाट्य मंदिरात बहारदार झाली. सीमा देव यांच्या हस्ते स्मरणिका प्रकाशन झाले. या कार्यक्रमाचा तपशीलवार वृत्तांत पुढील अंकी.

*

## प्रभुतरुणाची डायरी

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| १६-०९-१४ | श्री. सुरेश गणपतराव प्रधान | वय ८५, | मुलुंड |
| २५-०९-१४ | श्रीमती वीणा (वनमाला) विष्णु विजयकर | वय ९२ | माटुंगा |

*

## हौशी कला मंदिर

दीपावली संमेलनाचा साद्यंत तपशील पुढील अंकी वाचालच. या सर्व संस्थांना मन:पूर्वक शुभेच्छा.

*

## प्रभुतरुणास देणगी

✳ प्रतिमा व्ही. नवलकर याजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ सौ. निशा आणि श्री. प्रदीप शामराव मानकर यांजकडून त्यांना नातू झाल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

✳ सौ. विजयश्री आनंद नवलकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

### चुकीची दुरुस्तीः-

गतांकी जनन सदरात सौ. कृपाली आणि श्री. हेमंत असे वाचावे. श्री. सुभाष विजयकर यांना नातू झाला. 'देणगी' मध्ये ते खुलासेवार आले आहे.




**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८००४४